रविवार
०८
मार्च २०२६

वर्ष १९ वे
अंक - ५८
पाने - १६
किंमत - ०५ रूपये

◆ Web : www.yuvavarta.in/com
◆ Mail : dailyyuvavarta@gmail.com

# दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

◆ RNI No. MAHMAR/2007/24252
◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25
◆ जागतिक महिला दिनाच्या सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा !




मुखपृष्ठ संकल्पना - २०२५ वर्ल्ड कप विजयी टीम, ऑपरेशन सिंदूर मधील विंग कमांडर व्योमिका सिंग आणि कर्नल सोफिया कुरेशी, ज्येष्ठ साहित्यिक, संशोधक आणि लोकसाहित्याच्या गाढ्या अभ्यासक ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर

जयहिंद लोकचळवळ

जयहिंद महिला मंच

आदिशक्ती तू, प्रभूची भक्ती तू ।
झाशीची राणी तू । मावळ्यांची भवानी तू ।
प्रयत्नांना लाभलेली उन्नती तू । आजच्या युगाची प्रगती तू ।


मा. सोनियाजी गांधी
मा. अध्यक्षा, राष्ट्रीय काँग्रेस


सौ. कांचनताई थोरात
सामाजिक कार्यकर्त्या


सौ. दुर्गाताई तांबे
मा. नगराध्यक्षा, संगमनेर नगरपरिषद


सौ. शरयूताई देशमुख
विश्वस्त, अमृतवाहिनी शिक्षण संस्था


डॉ. जयश्रीताई थोरात
अध्यक्ष, संगमनेर ता. युवक काँग्रेस


सौ. मैथिलीताई तांबे
नगराध्यक्षा, संगमनेर नगरपरिषद

तुझ्या उत्तुंग भरारी पुढे गगन ही ठेंगणे भासावे । तुझ्या विशाल पंखाखाली विश्व ते सारे वसावे ।।

संगमनेर शहर व तालुका महिला काँग्रेस

- युवक काँग्रेस
- एन.एस.यु.आय.
- राजवर्धन युथ फाऊंडेशन
- सर्व महिला मंडळे

संगमनेर तालुका काँग्रेस
जयहिंद लोकचळवळ
एकविरा फाऊंडेशन

- संगमनेर शहर काँग्रेस
- जयहिंद महिला मंच
- राजमाता महिला मंडळ
- विविध बचत गट

जागतिक महिला दिनाच्या
॥ मनःपूर्वक शुभेच्छा ॥



## डॉक्टर ते संगमनेरची नगराध्यक्षा - स्वप्नवत प्रवास

# डॉ. मैथिली सत्यजीत तांबे











माझा जन्म चेन्नई येथे झाला, पण माझी मुळे ता. खानापूर, जि. सांगली येथे घट्ट रुजलेली आहेत. दक्षिण भारतातील सांस्कृतिक वातावरण आणि महाराष्ट्राच्या मातीतले संस्कार या दोन्हींचा माझ्या व्यक्तिमत्त्वावर लहानपणापासून प्रभाव राहिला. एका बाजूला विविध भाषांचा, विविध संस्कृतींचा आणि शिस्तबद्ध जीवनशैलीचा अनुभव मिळाला, तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रातील सामाजिक बांधिलकी, परंपरा आणि माणुसकीचा वारसा लाभला. त्यामुळे लोकांशी संवाद साधताना त्यांची भाषा, भावना आणि परिस्थिती समजून घेण्याची संवेदनशीलता आपोआप विकसित झाली. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि तमिळ या चार भाषांमधून संवाद साधता येत असल्यामुळे समाजाच्या विविध स्तरांतील लोकांशी सहज नाते जोडता आले. भाषा ही केवळ अभिव्यक्ती नसून माणसांमधील विश्वासाचे पूल उभारणारे माध्यम आहे, ही जाणीव लहानपणापासून मनात खोलवर रुजली.

दंतचिकित्सक (BDS) म्हणून माझ्या व्यावसायिक आयुष्याची सुरुवात झाली. डॉक्टर म्हणून काम करताना प्रत्येक रुग्णामागे एक वेगळी कथा, वेगळे कुटुंब, वेगळ्या समस्या आणि वेगळ्या अपेक्षा असतात, हे जवळून अनुभवले. रुग्णाला उपचार देणे ही वैद्यकीय प्रक्रिया असली तरी त्याला धीर देणे, त्याचा विश्वास जपणे आणि त्याच्या अडचणी समजून घेणे ही खरी सेवा आहे, हे सतत जाणवत गेले. डॉक्टर म्हणून काम करताना मला समाजातील विविध स्तरांतील लोकांना भेटण्याची संधी मिळाली आणि तेथूनच सेवा ही केवळ व्यावसायिक जबाबदारी नसून सामाजिक बांधिलकी आहे, ही भावना अधिक दृढ झाली.

पुढे व्यवस्थापन आणि नेतृत्व क्षेत्राची आवड वाढू लागली. समाजात दीर्घकालीन बदल घडवायचा असेल तर केवळ वैयक्तिक कौशल्य पुरेसे नसते; त्यासाठी व्यवस्थापन, नियोजन, नेतृत्व आणि परिणामकारक निर्णयक्षमता आवश्यक असते, ही जाणीव झाल्यानंतर मी सिम्बायोसिस इन्स्टिट्यूटमधून Executive MBA पूर्ण केले. त्यानंतर हार्वर्ड बिझनेस स्कूलमधील School Management Leadership हे प्रमाणपत्र घेताना जागतिक स्तरावरील नेतृत्वशैली, संस्थात्मक नियोजन, मानवी संसाधनांचा विकास आणि परिवर्तन व्यवस्थापन यांचा सखोल अभ्यास करण्याची संधी मिळाली. शिक्षणाने विचारांना व्यापक दिशा दिली आणि प्रत्येक निर्णयामागे स्पष्ट दृष्टी असणे किती महत्त्वाचे आहे, हे समजले.

पुण्यातील TAS School India येथे CEO म्हणून काम करताना संस्थात्मक परिवर्तनाची प्रत्यक्ष संधी मिळाली. KRA आधारित मूल्यमापन, शिक्षकांचे सक्षमीकरण, परफॉर्मन्स मॅनेजमेंट सिस्टम, प्रक्रिया सुलभीकरण आणि गुणवत्ता वाढ यांसारख्या अनेक सुधारणा राबवल्या. संस्थेमध्ये काम करताना लक्षात आले की योग्य दृष्टी, सातत्यपूर्ण पुनरावलोकन आणि जबाबदार नेतृत्व असेल तर कोणतीही व्यवस्था अधिक सक्षम बनू शकते. शिक्षण क्षेत्रातील हा अनुभव पुढील सार्वजनिक जीवनात अत्यंत उपयुक्त ठरला.

या प्रवासात मला सतत प्रेरणा देणारी गोष्ट म्हणजे इतिहासातील कर्तृत्ववान स्त्रियांचे कार्य. जिजाबाई या केवळ एका राजमातेचे नाव नाही, तर दूरदृष्टी, संस्कार आणि राष्ट्रनिर्मितीचे प्रतीक आहेत. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना केवळ वाढवले नाही, तर त्यांच्यामध्ये स्वराज्याची जाज्वल्य भावना जागवली. एका आईने आपल्या संस्कारांनी इतिहास घडवू शकतो, याचे ते सर्वोच्च उदाहरण आहे.

सावित्रीबाई फुले यांनी भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून स्त्रीशिक्षणाचा दीप प्रज्वलित केला. समाजातील विरोध, अपमान आणि अडथळे सहन करत त्यांनी मुलींना शिक्षणाची दारे खुली केली. शिक्षण हे परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, हा त्यांचा संदेश आजही प्रेरणादायी आहे. अहिल्याबाई होळकर या कार्यक्षम प्रशासक आणि समाजसुधारक म्हणून आजही आदर्श मानल्या जातात. राज्यकारभारात संवेदनशीलता, विकासदृष्टी आणि लोकाभिमुख निर्णय यांचे उत्कृष्ट उदाहरण त्यांनी घालून दिले. प्रशासन हे केवळ सत्तेचे साधन नसून लोककल्याणाचे माध्यम आहे, हे त्यांच्या कार्यातून स्पष्ट होते. राणी लक्ष्मीबाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात दाखवलेले शौर्य हे भारतीय स्त्रीशक्तीचे तेजस्वी प्रतीक आहे. संकटसमयी नेतृत्व, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठा यांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. रमाबाई आंबेडकर यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी अत्यंत कठीण परिस्थितीत खंबीरपणे उभे राहून मोठा त्याग केला. इतिहासात अनेकदा प्रकाशझोतात न आलेल्या स्त्रियांचे योगदानही तितकेच मोलाचे असते, याची जाणीव त्यांच्या आयुष्यातून होते.

माझे वैवाहिक आयुष्य आमदार सत्यजीत तांबे यांच्यासोबत सुरू झाले आणि त्यानंतर सामाजिक व राजकीय क्षेत्र अधिक जवळून अनुभवण्याची संधी मिळाली. समाजकारणाचा वारसा असलेल्या कुटुंबात आल्यामुळे लोकांच्या अपेक्षा, सार्वजनिक जीवनातील जबाबदाऱ्या आणि निर्णय प्रक्रियेतील सूक्ष्मता समजण्यास मदत झाली. आदरणीय भाऊसाहेब थोरात (दादा) यांच्यापासून सुरू झालेली सेवापरंपरा, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, डॉ. सुधीर तांबे यांचे जनतेशी असलेले जिव्हाळ्याचे नाते आणि स्थानिक प्रशासनातील सेवाभाव या सर्वांनी मला समाजकारणाची खरी दिशा दाखवली.

याच प्रेरणेतून I Love Sangamner आणि जयहिंद लोकचळवळ यांच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवले. महिलांचे बचत गट, युवकांसाठी नेतृत्व उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी कार्यक्रम, खेळाडूंना प्रोत्साहन, लहान मुलांसाठी उपक्रम अशा अनेक माध्यमांतून समाजाशी अधिक जवळून जोडले गेले. महिलांना आर्थिक सक्षमीकरण, युवकांना सकारात्मक दिशा आणि मुलांना संधी देणे हे समाजविकासाचे मूलभूत आधार आहेत, असे मला वाटते.

या उपक्रमांतून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली बदल केवळ विचारांनी होत नाही; त्यासाठी निर्णयक्षमतेची गरज असते. याच जाणिवेतून मी संगमनेर नगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरले. संगमनेर सेवा समितीच्या माध्यमातून निवडणूक लढवली आणि संगमनेरकरांनी माझ्यावर विश्वास ठेवत नगराध्यक्षपदाची जबाबदारी दिली. हा विश्वास माझ्यासाठी पदापेक्षा मोठी जबाबदारी आहे.

आज नगराध्यक्षा म्हणून माझी भूमिका केवळ प्रशासन चालवण्यापुरती मर्यादित नाही, तर शहराच्या भविष्यास दिशा देण्याची आहे. स्वच्छता, पायाभूत सुविधा, महिलांचे सक्षमीकरण, युवकांसाठी संधी, नागरिकाभिमुख सेवा, उत्तरदायी प्रशासन आणि पारदर्शक कार्यपद्धती यावर माझा भर आहे. डॉक्टर म्हणून मिळालेली संवेदनशीलता आणि व्यवस्थापक म्हणून विकसित झालेली कार्यशैली आज प्रशासनात उपयोगी पडत आहे.

संगमनेर हे केवळ वाढते शहर नाही, तर सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या समृद्ध असलेले केंद्र आहे. या शहराला आधुनिकतेसोबत शिस्तबद्ध नागरी रचना देणे आवश्यक आहे. स्वच्छ रस्ते, सक्षम पाणीपुरवठा, सुस्थितीत सार्वजनिक सुविधा, तंत्रज्ञानाधारित प्रशासन आणि नागरिकांना सुलभ सेवा हे शहर विकासाचे मूलभूत घटक आहेत.

महिलांच्या सहभागाशिवाय कोणताही विकास पूर्ण होऊ शकत नाही. महिलांनी केवळ घरापुरत्या मर्यादित न राहता शिक्षण, उद्योग, प्रशासन, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात पुढे आले पाहिजे. महिला सक्षम झाल्या तर कुटुंब सक्षम होते; कुटुंब सक्षम झाले तर समाज सक्षम होतो. माझे स्वप्न आहे आधुनिक, सुसज्ज, तंत्रज्ञानस्नेही आणि नागरिककेंद्रित संगमनेर उभे करणे. प्रत्येक नागरिकाला मूलभूत सुविधा सन्मानाने मिळाव्यात; महिलांना अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात; युवकांसाठी कौशल्य, क्रीडा आणि रोजगाराच्या नव्या वाटा खुल्या व्हाव्यात; प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही मूलभूत तत्त्वे असावीत.

डॉक्टर म्हणून सुरू झालेला माझा प्रवास आज संगमनेरच्या नगराध्यक्षपदापर्यंत पोहोचला आहे. हा प्रवास पद, प्रतिष्ठा किंवा सत्तेचा नसून सेवाभाव, जबाबदारी आणि विकासाच्या वचनबद्धतेचा आहे. स्वच्छ, सुसज्ज, आधुनिक आणि नागरिककेंद्रित संगमनेर घडवणे हेच माझे ध्येय आहे आणि त्या दिशेने मी सदैव कटिबद्ध राहीन.

जागतिक महिला दिन हा केवळ महिलांना शुभेच्छा देण्याचा दिवस नसून त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्याची आणि समाजातील त्यांच्या योगदानाची जाणीव ठेवण्याची संधी आहे. या दिवशी घरातील आई, बहीण, पत्नी, मुलगी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, त्यांच्या कामाची दखल घेणे आणि त्यांना सन्मान देणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे, स्वसंरक्षण प्रशिक्षण, कायदेविषयक मार्गदर्शन आणि आर्थिक सक्षमीकरणावर कार्यक्रम आयोजित करावेत.

महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सत्कार केला जाऊ शकतो. तसेच मुलींच्या शिक्षणाबाबत जनजागृती करणे, करिअर मार्गदर्शन देणे आणि त्यांना आत्मविश्वास वाढवणारे उपक्रम राबवणे महत्त्वाचे आहे. इतिहासातील गळक्षरलरळ (राजमाता जिजाऊ), डर्ीींळीळलरळ झर्हीश्रश (क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले), -हळश्रूलरळ केथ्रज्ञरी (अहिल्याबाई होळकर) आणि ठरपळ डरज्ञीहाळलरळ (राणी लक्ष्मीबाई) यांसारख्या कर्तृत्ववान महिलांची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचवणेही गरजेचे आहे.

महिला दिनाचा खरा उद्देश म्हणजे महिलांना समान संधी, सुरक्षित वातावरण आणि निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान देणे. महिलांचा सन्मान हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता वर्षभराच्या वर्तनातून दिसला पाहिजे.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने एवढेच म्हणावेसे वाटते इतिहासातील कर्तृत्ववान महिलांनी दाखवलेली वाट आजच्या प्रत्येक स्त्रीसाठी प्रेरणेची आहे. स्वप्न पाहण्याचे धैर्य, निर्णय घेण्याची क्षमता आणि समाजासाठी काम करण्याची तयारी असेल, तर प्रत्येक महिला परिवर्तनाची वाहक बनू शकते.



# डॉ. नीलिमा शांताराम निघुते : समर्पण आणि संघर्षाची प्रेरणादायी गाथा

महिला दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नसून समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याचा दिवस आहे. अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे डॉ. नीलिमा निघुते. वैद्यकीय क्षेत्रातील यशस्वी डॉक्टर, संवेदनशील समाजसेविका, शिक्षणक्षेत्रातील दूरदृष्टी असलेली कार्यकर्ती, प्रगतिशील शेतकरी, कवयित्री आणि आध्यात्मिक विचार जपणारी व्यक्ती म्हणून त्यांनी ग्रामीण भागात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मोठ्या शहरांत उज्ज्वल संधी उपलब्ध असतानाही त्यांनी ग्रामीण भागात सेवा देण्याचा मार्ग निवडला. मर्यादित साधने, अपुरी वैद्यकीय सुविधा आणि ग्रामीण भागातील आरोग्यविषयक अडचणी अशा अनेक आव्हानांमध्ये त्यांनी Nighute Hospital या रुग्णालयाची उभारणी केली. सुरुवातीच्या काळात दिवस-रात्र रुग्णसेवा, आपत्कालीन परिस्थितीत तत्पर निर्णय आणि महिलांमध्ये आरोग्यजागृती यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यांच्या सेवाभावामुळे हे रुग्णालय ग्रामीण भागात विश्वासाचे केंद्र बनले आहे.

डॉ. निघुते यांच्या दृष्टीने रुग्णसेवा ही केवळ व्यवसाय नसून सामाजिक जबाबदारी आहे. महिलांचे आरोग्य, मातृत्व काळातील काळजी, बालआरोग्य आणि सामान्य उपचार यामध्ये त्यांनी विशेष योगदान दिले आहे. गरजू रुग्णांना सवलती, आरोग्य शिबिरे आणि गावागावांत आरोग्यविषयक जनजागृती या माध्यमांतून त्यांनी समाजाशी घट्ट नाते निर्माण केले आहे. प्रत्येक रुग्णाशी आत्मीयतेने संवाद साधणे ही त्यांच्या कार्यपद्धतीची विशेष ओळख आहे.

आरोग्यसेवेबरोबरच शिक्षणाची गरज त्यांनी लवकर ओळखली. ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतूने वडगाव पान येथे Lotus English Medium School ची स्थापना करण्यात आली. आज ही संस्था केवळ शाळा नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र बनली आहे. आधुनिक अध्यापन, संस्कारप्रधान वातावरण, क्रीडा, विज्ञान, सांस्कृतिक उपक्रम आणि व्यक्तिमत्त्व विकास या सर्वांचा सुंदर समतोल येथे दिसतो. मागील वर्षापासून कनिष्ठ महाविद्यालयही सुरू झाल्यामुळे विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर पुढील शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. शैक्षणिक क्षेत्रातील या कामाची राज्यस्तरावर दखल घेतली गेली आहे. शाळेला महाराष्ट्र शासनाचा स्वच्छ शाळा पुरस्कार प्राप्त झाला असून नामांकित शाळा योजनेतही संस्थेची निवड झाली आहे. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना विविध सन्मान मिळाले आहेत. हे यश केवळ पुरस्कारांपुरते मर्यादित नसून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उभ्या राहिलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी त्यांनी संगमनेरमध्ये वस्त्रनिर्मिती केंद्र उभे राहण्यासाठी विशेष प्रयत्न केले. या उपक्रमामुळे अनेक महिलांना स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध झाला. घर आणि काम यांचा समतोल राखत महिलांना स्वावलंबी होण्याची संधी मिळाली. ग्रामीण महिलांना आर्थिक बळ मिळणे म्हणजे संपूर्ण कुटुंबाला स्थैर्य मिळणे, हा त्यामागील व्यापक विचार आहे. डॉ. निघुते या प्रगतिशील शेतकरीही आहेत. शेतीत विविध प्रयोग करत त्यांनी डाळिंब, केळी आणि आले यांसारख्या पिकांचे यशस्वी उत्पादन घेतले आहे. हवामानातील बदल, बाजारपेठेतील चढउतार आणि शेतीतील जोखमी असूनही त्यांनी शेतीशी असलेले नाते कायम ठेवले आहे. त्यांच्या मते शेती ही केवळ व्यवसाय नसून जीवनाशी जोडलेली संस्कृती आहे.

आध्यात्मिकतेकडेही त्यांचा विशेष कल आहे. सहजयोगाच्या माध्यमातून त्यांनी ध्यानधारणेचे महत्त्व समाजात पोहोचवले. मानसिक शांतता, सकारात्मक विचार आणि संतुलित जीवनासाठी ध्यान आवश्यक असल्याचा संदेश त्या सातत्याने देतात. शाळेत विद्यार्थ्यांकडून नियमित ध्यान करून घेतले जाते, ज्यामुळे लहान वयातच एकाग्रता आणि मानसिक स्थैर्य विकसित होते. याशिवाय त्या एक संवेदनशील कवयित्री म्हणूनही परिचित आहेत. विविध काव्यसंमेलनांतून त्यांनी स्त्रीमन, समाजजीवन आणि ग्रामीण वास्तव यांचे प्रभावी चित्रण केले आहे. वैद्यकीय, शैक्षणिक आणि सामाजिक जबाबदाऱ्यांसोबत साहित्याशी असलेले त्यांचे नाते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक समृद्ध बनवते.

महिला दिनाच्या निमित्ताने डॉ. नीलिमा निघुते यांची जीवनयात्रा एक महत्त्वाचा संदेश देते-ध्येय स्पष्ट असेल, जिद्द मजबूत असेल आणि समाजासाठी काहीतरी करण्याची तयारी असेल, तर एक स्त्री अनेक क्षेत्रांत परिवर्तन घडवू शकते. आरोग्य, शिक्षण, शेती, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक जाणीव यांचा सुंदर संगम त्यांच्या कार्यात दिसतो. अशा कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वाला महिला दिनानिमित्त मनःपूर्वक सलाम.






महिला दिन उजाडला की नव्या आशांचा दीप पेटतो।
स्त्रीशक्तीच्या कर्तृत्वाला आज मनापासून मान मिळतो।
आईच्या हातातील माया जगण्याला अर्थ देते।
तिच्या शब्दांतून संस्कारांची पहाट उगवते।
तिच्या कष्टांनी घराघरांत सुखाची पालवी फुटते।
जिजामाता यांच्या कुशीत स्वराज्याचा विचार वाढला।
शिवबाच्या मनात धैर्याचा दीप त्यांनीच लावला।
संस्कारातून घडतो इतिहास, हे जिजाऊंनी दाखवले।
आईच्या नजरेतून राष्ट्राचे स्वप्न उजळले।
सह्याद्रीने त्यांच्या धैर्याला वंदन केले।
अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायाने जनतेला आधार दिला।
राजकारभारात करुणेचा सुंदर सुगंध फुलला।
घाट, मंदिरे, धर्मशाळा उभारून सेवा केली।
लोकहिताची दिशा त्यांनी जगाला दिली।
कर्तृत्वाचा आदर्श आजही त्यांच्यात दिसतो।
सावित्रीबाई फुले हातात पुस्तक घेऊन पुढे चालल्या।
अंधारलेल्या समाजात ज्ञानदीप त्यांनी पेटवला।
दगड सहन करूनही शिक्षणाचा मार्ग धरला।
मुलींच्या डोळ्यांत नवविश्वास त्यांनी भरला।
शिक्षणातून स्त्रीच्या उंच भरारीची सुरुवात झाली।
रमाबाई आंबेडकर शांत त्यागाची मूर्ती ठरल्या।
संघर्षाच्या वाटेवर खंबीर साथ देत राहिल्या।
इतिहासात कमी शब्द, पण कार्य मोठे राहिले।
त्यांच्या धैर्याने परिवर्तनाला बळ मिळाले।
समर्पणातूनही समाज उजळतो हे त्यांनी शिकवले।
सिंधुताई सपकाळ हजारो लेकरांची आई बनल्या।
अनाथांच्या डोळ्यांत त्यांनी माया भरल्या।
स्वतःचे दुःख बाजूला ठेवून जगण्याला अर्थ दिला।
माणुसकीचा दीप त्यांनी सतत जिवंत ठेवला।
मातृत्वाचा विस्तार त्यांच्या रूपात दिसला।
महिला दिन म्हणजे तिच्या संघर्षाला प्रणाम।
तिच्या स्वप्नांना द्यावा नवा उज्ज्वल आयाम।
समान संधीचा प्रत्येक घरात होवो ध्यास।
स्त्रीच्या सन्मानातूनच घडेल समाज खास।
तिच्या कर्तृत्वाने उजळत राहो महाराष्ट्राचा श्वास।

**डॉ. नीलिमा शांताराम निघुते**









**जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सर्वत्र सन्मान होत आहे. संगमनेरातील डॉ. निलिमा निघुते यांनी अतिशय संघर्षातून आरोग्य व शिक्षण क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. त्यांचा महिला दिनानिमित्त अल्प परिचय ...**

## डॉ. नीलिमा शांताराम निघुते

✻ **जन्मतारीख** : ०१/०५/१९६६
✻ **शिक्षण** : डिप्लोमा इन होमिओपॅथिक medicine and surgery
✻ **वडील** : बबनराव पवार-पाटील (दिवंगत कामगार नेते, श्रीरामपूर)
✻ **पती** : डॉ. श्री. शांताराम सी. निघुते (प्रथितयश स्त्रीरोगतज्ज्ञ)
✻ **मुलगा** : डॉ. श्री. सत्यजित निघुते, (एमडी मेडिसीन)
✻ **मुलगी** : डॉ. सौ. सौदामिनी निघुते-वांगीकर (नेत्ररोग तज्ज्ञ)
✻ **जावई** : अभियंता श्री.आशिष वांगीकर (रिअल इस्टेट डेव्हलपर)

**✻ सध्या कार्यरत असलेल्या प्रवासाबद्दल ✻**

**अध्यक्षा** : मातोश्री भागीरथी सीताराम निघुते मेमोरियल फाउंडेशन
**विश्वस्त** : लोटस इंग्लिश मिडियम स्कूल ण्ड ज्युनिअर कॉलेज वडगावपान, ता. संगमनेर
**विश्वस्त** : निघुते मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, संगमनेर

**✻ कार्याची सुरुवात ✻**

गत २५ वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्रात स्त्रीरोग चिकित्सक म्हणून कार्यरत असताना कृषी, शिक्षण, महिलांचे आरोग्य, रोजगार आदी क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान.

**✻ अविस्मरणीय कार्याबद्दल**

महिला सबलीकरण याकरिता राज्य शासनाच्या क्लस्टर योजनेतून संगमनेर गारमेंट फाउंडेशन या उपक्रमात सहभाग घेऊन अनेक महिलांसाठी रोजगार निर्मिती.
शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देत इंग्रजी माध्यमाची शाळा, कनिष्ठ महाविद्यालय असून येथे शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्या शिक्षणाची, निवासाची व्यवस्था. वैद्यकीय व्यवसाय त्यासोबतच शिक्षण क्षेत्र, कृषी क्षेत्र, उद्योग व्यवसाय यात देखील भरीव कामगिरी.

**✻ उज्ज्वल कामगिरी, मिळालेले पुरस्कार ✻**

लोटस इंग्लिश मिडियम स्कूलचा महाराष्ट्र शासनाची इंग्रजी माध्यमाची नामांकित निवासी शाळा या योजनेत निवड, गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचा स्वच्छ विद्यालय पुरस्कार अंतर्गत जिल्हास्तरीय फाईव्ह स्टार नामांकन

**✻ आवडते व्यक्तिमत्व ✻**

कर्मवीर भाऊराव पाटील

**✻ येणाऱ्या काळात तुम्ही या क्षेत्रात काय करणार आहात ✻**

शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी करण्याचा मानस आहे, लोटस इंग्लिश मिडियम स्कूल ण्ड ज्युनिअर कॉलेज भव्य असे शैक्षणिक संकुल साकारणार. आध्यात्मिक बैठक असलेली पिढी घडविणे तसेच रोजगार निर्माण करण्याबरोबरच रोजगार देणारे असंख्य हात निर्माण करणे.

**✻ तुम्ही या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्यांना काय संदेश द्याल ✻**

उच्च ध्येयाने प्रेरित होऊन स्वताला झोकून देऊन काम करा, निस्वार्थ भावनेने काम करायची इच्छा असेल तर कुठल्याही क्षेत्रात यशस्वी होता येते.

**✻ तुमच्या यशाचे रहस्य काय ✻**

अध्यात्मिक पाया असलेली जीवनशैली, सकारात्मक दृष्टीकोन कायम ठेवला तसेच संघर्ष हा करावाच लागतो, हे मनाशी ठरविले आणि अवघड वाटत असलेले हळूहळू सोपे होत गेले.

**✻ येत्या काळात स्वताला कोठे पाहतात ✻**

भव्य शैक्षणिक संकुलाची निर्मिती

**✻ तुम्ही केलेली प्रेरणादायी कामगिरी ✻**

कृषी क्षेत्रात आवड असल्याने आतापर्यंत विविध यशस्वी प्रयोग केले, त्यासोबत वैद्यकीय क्षेत्र आणि त्यासोबतच शिक्षण, उद्योग व्यवसाय यामाध्यमातून निर्माण झालेला रोजगार

**✻ तुम्हाला घडविण्यात कोणाचा वाटा आहे ✻**

श्री माताजी निर्मला देवी , आई-वडिल आणि पती

**✻ अनमोल संदेश ✻**

आध्यात्मिक जीवनशैली, मजबूत हौसला, उच्च ध्येयासक्ती, आव्हाने स्वीकारण्याची जिद्द ही चतुःसूत्री

**✻ तुमचे ब्रीदवाक्य ✻**

सत्य परेशान हो सकता है पराजित नहीं



# स्त्रीशक्तीचा गौरव, संघर्षाचा सन्मान आणि नव्या स्वप्नांचा संकल्प

**सौ. नीलमताई अमोल खताळ**









महिला दिन हा केवळ शुभेच्छांचा दिवस नाही; तो स्त्रीच्या सामर्थ्याला, तिच्या जिद्दीला, तिच्या त्यागाला आणि तिच्या कर्तृत्वाला मनापासून सलाम करण्याचा दिवस आहे. समाजाच्या प्रत्येक स्तरावर स्त्रीने निभावलेली भूमिका इतकी व्यापक आहे की तिच्याशिवाय कुटुंब, संस्कृती, अर्थव्यवस्था आणि राष्ट्राची उभारणी पूर्ण होऊ शकत नाही. भारतीय संस्कृतीत स्त्रीला केवळ व्यक्ती म्हणून नव्हे, तर शक्तीच्या मूर्तीच्या रूपात पाहिले जाते. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता' ही आपल्या संस्कृतीची मूलभूत भावना आहे. स्त्री म्हणजे माया, करुणा, कष्ट, संयम आणि आवश्यक वेळी पराक्रमाचे प्रतीक. म्हणूनच महिला दिन हा केवळ उत्सव नसून स्त्रीच्या योगदानाचे चिंतन करण्याचा दिवस आहे. जागतिक महिला दिन साजरा करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे महिलांच्या हक्कांसाठी, समान संधींसाठी, सुरक्षिततेसाठी आणि समाजातील त्यांच्या योगदानाच्या सन्मानासाठी जागरूकता निर्माण करणे. जगभरातील महिलांनी शिक्षण, काम, मतदानाचा हक्क, समान वेतन आणि सन्मानासाठी केलेल्या संघर्षाची आठवण या दिवसातून जिवंत ठेवली जाते.

आपल्या भारतभूमीला अशा अनेक महान स्त्रियांचा प्रेरणादायी वारसा लाभला आहे ज्यांनी इतिहास घडवला आणि पुढील पिढ्यांना दिशा दिली. राजमाता जिजाऊ म्हणजे दूरदृष्टी, राष्ट्रभान आणि संस्कार यांचे सर्वोच्च उदाहरण. त्यांनी बाल शिवबाला पराक्रम, स्वाभिमान, न्यायबुद्धी आणि स्वराज्याचे संस्कार दिले. एका आईच्या संस्कारातून राष्ट्रपुरुष घडू शकतो, हे जिजाऊंच्या जीवनातून स्पष्ट होते. आजही प्रत्येक आईने आपल्या मुलांमध्ये जबाबदारी, शिस्त आणि राष्ट्रप्रेम रुजवण्याची प्रेरणा त्यांच्याकडून घ्यावी.

अहिल्याबाई होळकर यांनी राज्यकारभारात संवेदनशीलता, न्याय आणि विकास यांचा आदर्श घालून दिला. त्यांनी मंदिरे, घाट, धर्मशाळा उभारून समाजजीवन समृद्ध केले. प्रशासनात दृष्टी, निर्णयक्षमता आणि लोकहिताची भूमिका कशी असावी, हे त्यांच्या कार्यातून दिसते. एक स्त्री केवळ घरच नव्हे तर संपूर्ण राज्य समर्थपणे सांभाळू शकते, हे त्यांनी सिद्ध केले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी भारतातील स्त्रीशिक्षणाचा पाया घातला. ज्या काळात मुलींना शिक्षण नाकारले जात होते, त्या काळात त्यांनी पहिली मुलींची शाळा सुरू करून समाजपरिवर्तनाचा नवा अध्याय लिहिला. समाजातील विरोध, अपमान, अडथळे सहन करत त्यांनी हजारो महिलांना शिक्षण, स्वाभिमान आणि आत्मविश्वासाची दिशा दिली. शिक्षण हे महिलांच्या उन्नतीचे सर्वात मोठे साधन आहे, हे त्यांचे कार्य सांगते.

राणी लक्ष्मीबाई यांनी रणांगणात तलवार हातात घेऊन स्वाभिमानासाठी प्राणाची आहुती दिली. त्यांच्या धैर्याने जगाला दाखवून दिले की स्त्रीशक्तीला मर्यादा नाहीत. संकटसमयी नेतृत्व आणि राष्ट्रनिष्ठा यांचे तेजस्वी उदाहरण म्हणजे राणी लक्ष्मीबाई. रमाबाई आंबेडकर यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून मोठा त्याग केला. समाज परिवर्तनामागे अनेकदा शांतपणे उभ्या असणाऱ्या स्त्रियांचे योगदान इतिहासात कमी दिसते, पण त्यांचे कार्य तितकेच मोठे असते. स्वातंत्र्योत्तर काळातही महिलांनी देशाचे नेतृत्व समर्थपणे केले. प्रतिभाताई पाटील यांनी राष्ट्रपतीपद भूषवून महिलांच्या नेतृत्वक्षमतेची नोंद जागतिक पातळीवर करून दिली. किरण बेदी यांनी प्रशासनात कठोर आणि परिणामकारक कामाचा आदर्श घालून दिला. आज द्रौपदी मुर्मू राष्ट्रपती म्हणून देशाच्या सर्वोच्च पदावर कार्यरत आहेत. हे सर्व महिलांच्या आत्मविश्वासाला बळ देणारे आहे.

आज महिला केवळ राजकारणात नाही तर विज्ञान, तंत्रज्ञान, संरक्षण, उद्योग, शेती, क्रीडा, साहित्य, वैद्यकीय, अभियांत्रिकी, बँकिंग, न्यायव्यवस्था आणि प्रशासन या सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. कल्पना चावला यांनी अवकाश संशोधनात भारतीय महिलांचे नाव जागतिक स्तरावर पोहोचवले. सुनिता विल्यम्स यांनी विज्ञान क्षेत्रातील नवे आदर्श निर्माण केले. क्रीडा क्षेत्रात पी. व्ही. सिंधू, मेरी कोम, साक्षी मलिक यांनी भारताचा झेंडा उंचावला.

महाराष्ट्रातील महिलांनीही विविध क्षेत्रांत विशेष कामगिरी केली आहे. सामाजिक क्षेत्रात सिंधुताई सपकाळ यांनी अनाथ मुलांना आईचे ममत्व देत हजारो मुलांचे आयुष्य घडवले. त्यांचे कार्य हे समाजसेवेचे जिवंत उदाहरण आहे. मेधा पाटकर यांनी समाजातील वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा दिला. ग्रामीण महिलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या अनेक स्वयंसेवी संघटनांमध्ये महाराष्ट्रातील महिला सक्रिय आहेत.

क्रीडा क्षेत्रात अंजली भागवत यांनी नेमबाजीमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले. राही सरनोबत यांनी नेमबाजीमध्ये देशाला मान मिळवून दिला. स्मृती मानधना यांनी महिला क्रिकेटमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करत नव्या पिढीला प्रेरणा दिली.

व्यावसायिक क्षेत्रात महाराष्ट्रातील अनेक महिला उद्योग उभारत आहेत. लघुउद्योग, अन्नप्रक्रिया, वस्त्रनिर्मिती, सेवा व्यवसाय, तंत्रज्ञान क्षेत्र आणि सहकारी चळवळीमध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे. ग्रामीण भागातील बचत गटांमधून अनेक महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत. स्वतःचे उत्पादन तयार करून बाजारपेठ मिळवणाऱ्या महिलांनी आर्थिक स्वावलंबनाचा आदर्श निर्माण केला आहे.

मी एक शिंदे घराण्याची मुलगी आणि खताळ घराण्याची सून म्हणून मनापासून अभिमान बाळगते. मुलगी म्हणून संस्कार मिळाले, सून म्हणून जबाबदाऱ्या समजल्या आणि पत्नी म्हणून कुटुंबासोबत खंबीर उभे राहण्याची ताकद मिळाली. एका सामान्य घरातील स्त्री म्हणून माझे आयुष्य सुरू झाले; परंतु लोकप्रतिनिधींच्या कुटुंबात आल्यानंतर समाजातील प्रश्न अधिक जवळून पाहण्याची संधी मिळाली. संगमनेर तालुक्यातील वाड्या-वस्त्यांवरील महिलांचे जीवन, त्यांचे श्रम, त्यांची स्वप्ने आणि त्यांची संघर्षशक्ती मी जवळून अनुभवली आहे. उन्हातान्हात शेतात राबणारी शेतकरी महिला, घर सांभाळणारी आई, शिक्षणासाठी झटणारी मुलगी, कुटुंबाचा आधार असलेली सून, पतीला खंबीर साथ देणारी पत्नी या सर्व स्त्रिया आपल्या समाजाची खरी ताकद आहेत. त्यांच्या श्रमामुळे घर टिकते, कुटुंब टिकते आणि समाज उभा राहतो. ग्रामीण भागातील महिलांनी आज बचत गट, दुग्धव्यवसाय, लघुउद्योग, शेतीपूरक व्यवसाय यामध्ये उल्लेखनीय प्रगती केली आहे. आज आपल्या तालुक्यातील अनेक महिला शिक्षण, व्यवसाय,

शेती,

समाजकारण आणि स्थानिक नेतृत्वात पुढे येत आहेत. महिलांच्या समस्या ऐकून घेणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन मिळवून देणे ही काळाची गरज आहे. महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण, बचत गटांना बाजारपेठ, आरोग्य सुविधा, मुलींच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध झाले पाहिजे.

महिलांसाठी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे आरोग्य. अनेक महिला कुटुंबासाठी झटताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. नियमित आरोग्य तपासणी, संतुलित आहार, मानसिक आरोग्याची काळजी, विश्रांती आणि वेळेवर उपचार यांची जाणीव आवश्यक आहे. स्त्री शारीरिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असेल तरच कुटुंब अधिक सक्षम राहते.

महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होणेही तितकेच आवश्यक आहे. स्वतःच्या उत्पन्नाचे नियोजन, बचत, बँक व्यवहार, विमा, संगणकीय व्यवहार यांची माहिती प्रत्येक महिलेला असावी. आत्मनिर्भरता आत्मविश्वास वाढवते. शिक्षणाबरोबर आर्थिक साक्षरता हीदेखील आवश्यक आहे. महिला दिनाच्या निमित्ताने माझा एक संकल्प आहे. आपल्या तालुक्यातील प्रत्येक महिला आत्मनिर्भर,

आत्मविश्वासी आणि सक्षम व्हावी. त्यांच्या शिक्षणासाठी, स्वावलंबनासाठी, आरोग्यासाठी आणि सन्मानासाठी जे काही शक्य आहे ते करण्याचा मी नक्की प्रयत्न करेन. कारण जेव्हा एक महिला पुढे जाते, तेव्हा तिच्यासोबत संपूर्ण कुटुंब, समाज आणि पुढची पिढीही पुढे जाते.आज महिला भारतात नेतृत्व करत आहेत, निर्णय घेत आहेत, उद्योग उभारत आहेत, प्रशासन चालवत आहेत, संशोधन करत आहेत, देशाचे संरक्षण करत आहेत आणि समाजात परिवर्तन घडवत आहेत. त्यामुळे महिला दिन हा केवळ अभिनंदनाचा दिवस नसून महिलांना अधिक संधी देण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे.

चला, या महिला दिनी आपण सर्वांनी एकत्र येऊन स्त्रीचा सन्मान करूया, तिच्या स्वप्नांना बळ देऊया, तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवूया आणि आपल्या संस्कृतीचे मूल्य जपत सकारात्मक बदल घडवूया. सर्व भगिनींना महिला दिनाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.





# संस्कार, शिस्त आणि अध्यात्माचा सुवर्णस्पर्श - सुवर्णाताई मालपाणी





जगातील विविध क्षेत्रांमध्ये कर्तृत्व गाजवलेल्या महिलांच्या कर्तृत्वाला आणि कार्याला अभिवादन करण्याचा दिवस... परंतु याचसोबत आपल्या आजूबाजूलाही अशा अनेक कर्तृत्ववान स्त्रिया असतात ज्यामुळे अनेकांचे जीवन संस्कारांनी समृद्ध होते. असंच संगमनेरमधील एक अत्यंत प्रभावशाली व्यक्तिमत्व म्हणजे श्रीमती सुवर्णाताई माधवलालजी मालपाणी...

शिक्षण आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडवून अनेक पिढ्यांवर अनेक पिढ्या संस्कार करणाऱ्या मालपाणी परिवारातील 'सुवर्णाकाकी' या आज मालपाणी परिवारासमवेत गीता परिवार आणि त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी सुद्धा 'सुवर्णाकाकीच' बनून राहिल्या आहेत.

निर्माणो के पावनयुग मे
हम चरित्र निर्माण न भूले ।।
स्वार्थ साधना की आंधी मे
वसुधा का कल्याण न भूले ।। या ओळी ताईंच्या साऱ्या जीवन कार्याचं सार सांगतात.

**शिक्षण व्यवस्थापनात मायेचा स्पर्श –**

स्वर्गीय ओंकारनाथजी मालपाणी यांनी शिक्षणासोबत चरित्र आणि चारित्र्य घडवणारी शाळा म्हणून शारदा शिक्षण संस्थेचा पाया रचला.

आज या संस्कारमयी शाळेच्या कार्याध्यक्ष म्हणून सुवर्णाताई मालपाणी तोच आदर्श जपत आहे. त्यांनी या संस्थेतील प्रशासनाला फक्त व्यवस्थापनाचे स्वरूप दिलं नाही, तर त्यासोबतच एका प्रेमळ मातेचा स्पर्शही दिला आहे.

ताईंच्या अध्यक्षपदाच्या काळामध्ये शारदा शिक्षण संस्थेची लक्षणीय प्रगती झालेली दिसून येते. या काळामध्ये इमारतीचा तिसरा मजला बांधला गेला.कॉर्पोरेट सेक्टरलाही लाजवेल असं अद्ययावत स्टाफ रूम, भव्य संगणक कक्ष, अद्ययावत अटल लॅबची निर्मिती झाली. विद्यालयामध्ये शिक्षकांची भरती करताना शिक्षकाची गुणवत्ता हा एकच निकष ताई लावतात. अत्यंत हुशार व गुणी शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत ताई नेहमीच आग्रही राहिल्या. विद्यालयाच्या इंग्रजी, संस्कृत, मराठी, वक्तृत्व, सामान्य ज्ञान, स्वच्छता अशा अनेकवीध स्पर्धांमध्ये राज्य पातळीवर विद्यालयाने भरघोस पुरस्कार मिळवले. विद्यालयाचे खेळाचे संघ राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये देखील यश मिळवताना दिसून येत आहेत. शाळेचा दहावीचा निकाल, बाह्य परीक्षांचे निकाल यामध्ये देखील यशाची परंपरा निर्माण झाली.

व्यायाम, प्राणायाम, प्रणवोच्चार, ध्यान यावर ताईंचा विशेष भर असतो. ताई स्वतः डडध म्हणजेच 'सायन्स ऑफ सायलेंट योगा' च्या साधक आहेत. एखाद्या कुटुंबप्रमुखाच्या मायेने आणि प्रेमळ आग्रहाने ताई आमच्यापर्यंत हे सगळं पोहोचवत असतात.

ताईंचा संस्थेमध्ये एक आदरयुक्त धाक आहे. इतक्या मोठ्या संस्थेच्या संस्थाचालक असूनही ताई जातीने स्वतः प्रत्येक विद्यार्थ्यांचा अभ्यास बघण्याबाबतीत आग्रही असतात. त्यामध्ये शुद्धवाचन, शुद्धलेखन, स्पेलिंग पाठांतर, पाढे पाठांतर हा शिक्षणातील पाया शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याचा पक्का असलाच पाहिजे असा ताईंचा ठाम आग्रह असतो.

मुलांना सोप्या पद्धतीने कसे शिकवायचं यामध्ये देखील ताईंचे हातोटी आहे. अनावश्यक तिथे अजिबात खर्च करायचा नाही, याबाबतीत ताई काटकसरी आहेत. परंतु जिथे संस्थेचा विद्यार्थ्यांचा विकास होणार आहे, तिथे मात्र ताई सढळ हाताने मदत करताना दिसतात, खर्च करताना दिसतात. यातून विकासासाठी संपत्तीचा उपयोग कसा करावा याचा समतोल आम्हाला शिकायला मिळतो.

**भाषाशुद्धतेचा जागर –**

मराठी, इंग्रजी, संस्कृत तिन्ही भाषेचा ताईंचा सखोल अभ्यास आहे. तिन्ही भाषांमधून शुद्धलेखन,शुद्ध उच्चारण, शुद्ध वाचन हा शुद्ध आचरण आणि शुद्ध चारित्र्याचा पाया आहे असे त्यांचे ठाम मत आहे. आपल्या भाषणातील, बोलण्यातील शब्दांचे शुद्ध उच्चार आपल्या व्यक्तिमत्त्वाची उत्तम अशी छाप समोरच्यावर पाडून जातात.. अशी शिकवण ताईंकडून आम्हाला नेहमीच मिळते आणि त्यामुळेच अनेक शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्वाची गोडी निर्माण झाली आहे. अगदी पहिलीच्या मुलांच्या बोबड्या भाषणापासून तर दहावीच्या मुलांच्या उत्तम वक्तृत्वापर्यंत प्रत्येकाची भाषणे ऐकण्याची ताईंना खूप आवड आहे. विद्यार्थी उत्तम पाठांतर करून आणि योग्य त्या समजूतदारीने स्वतः बोलतात याचं ताईंना नेहमीच कौतुक असतं...

**पालकांना प्रभावी मार्गदर्शनाची परंपरा –**

ताईंच्या शैक्षणिक कार्यातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पालकांना प्रभावी मार्गदर्शन...

अनेक वर्षांपासून विद्यालयाच्या माध्यमातून ताई स्वतः पालक मेळावे घेत आहेत. या संवादातून अगदी सहज रोजच्या वागण्या- बोलण्यातून विद्यार्थ्यांना उत्तम अभ्यासाच्या सवयी कशा लावाव्यात, त्यांना गोष्टी सांगता सांगता त्यांचं व्यक्तिमत्व कसं घडवावं... अगदी अल्प शिक्षितपासून तर उच्चशिक्षित पालकांपर्यंत प्रत्येकाने आपल्या मुलाला कसं घडवावं... याचं उत्तम मार्गदर्शन ताई करतात.

यासोबत ताई एक उत्तम समुपदेशक देखील आहेत.

विद्यार्थी हेच आपले आणि देशाचेही भवितव्य आहे या सजग जाणिवेतून मुलांच्या प्रगती कडे पाहायला हवे असे ताईंना वाटते. अशा पालक मेळाव्यांमधून पालक म्हणूनही आपण समृद्ध होत आहोत, अशी प्रतिक्रिया नेहमीच ऐकायला मिळते.

**गीता प्रचारातील अखंड साधना –**

परमपूज्य स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या प्रेरणेतून आणि मार्गदर्शनातून सुरू झालेल्या गीता परिवार या संस्थेमध्ये गेली ३५ वर्षे भगवद्गीता व इतर संस्कृत स्तोत्र,पद्य,गीते यांची संथा देण्याचे कार्य सुवर्णाताई करत आहेत.

भगवद्गीता ऑनलाईन शिकवण्यास सुरुवात झाल्यापासून ताईंनी हजारो प्रशिक्षक घडवले आहेत. संस्कृतसारखी अवघड भाषा सोपी करून शिकवण्याच्या खास हातोटीमुळे ज्यांचा संस्कृतभाषेशी कधीही संपर्क आला नाही अशा कोणत्याही वयोगटातील स्त्री-पुरुषांना संस्कृत उच्चारण सोपं वाटू लागलं. या कार्याचा गौरव म्हणून गीता परिवाराचे संस्थापक, श्रीराम मंदिर ट्रस्टचे कोषाध्यक्ष पूज्य श्री गोविंद देवगिरी जी महाराज आणि योगगुरु बाबा रामदेव यांच्या शुभहस्ते 'गीता पारंगत' या पदवीने सन्मानित केले आहे. तसेच राजमाता जिजाऊ सन्मानासह इतर अनेक पुरस्कारांनी ताईंना गौरविले आहे.

कर्मण्येवाधिकारस्ते,मा फलेषु कदाचन ।

या निष्काम कर्मभावनेने गेली अनेक वर्षे,अनेक पिढ्या संस्कारित करण्याचे कार्य ताई करीत आहेत.

**चिंतन ग्रंथ निर्मिती आणि सामाजिक योगदान –**

भगवद्गीतेची संथा देता देता, ताईंनी भगवद्गीतेवर चिंतन आणि मननही केले आणि त्यातूनच तयार झाली, गीता चिंतन ही व्याख्यानमाला... आकाशवाणीवरून सलग ४५ दिवस गीता चिंतन या व्याख्यानमालेचे प्रसारण करण्यात आले. त्याचबरोबर श्रोत्यांच्या आग्रहास्तव याच व्याख्यानमालेचे पुनःप्रसारण करण्यात आले. हीच व्याख्याने दैनंदिन जीवनात गीता या पुस्तकाच्या रूपातही प्रकाशित झालेली आहे.

ताईंच्या सुमधुर आवाजामध्ये गीता परिवार च्या स्तोत्र व पद्यांची ध्वनिमुद्रित झालेली कॅसेट अतिशय लोकप्रिय झाली व त्यानंतर ते कार्य ताई आजतागायत करीत आहेत. गीता परिवार द्वारे प्रकाशित होणाऱ्या लिखित साहित्याचे मुद्रित शोधन अर्थात प्रूफ रीडिंग करण्या ची महत्वपूर्ण जबाबदारी ताई सांभाळतात. गीता परिवार च्या राष्ट्रीय कार्यकारणी मार्गदर्शक मंडळाच्या सदस्या, संस्कृत संवर्धन मंडळाच्या कार्यकारणी सदस्य, संगमनेर साहित्य परिषद, विविध महिला मंडळे अशा संस्थांच्या माध्यमातून ताई कार्य करीत आहेत.

त्याचबरोबर मालपाणी चॅरिटेबल ट्रस्ट या माध्यमातून ताई अनेक गरजवंतांना मदतीचा हात देत आहेत.

**जीवनाचा कलात्मक आस्वाद –**

ताईंना गीत गायनाची आवड असणाऱ्या ताईंना असंख्य गाणी तोंडपाठ आहेत. त्यांचा आवाजही खूप मधुर आहे. योग्य त्या प्रसंगी योग्य त्या अर्थाचं चपखल गाणं ताई म्हणून दाखवतात आणि कार्यक्रमाची उंची वाढवतात. रसिक व कलासक्त व्यक्तिमत्व असणाऱ्या ताईंचा व्याकरण,नाट्यकला, संगीत यामध्येही गाढा व्यासंग आहे. औपचारिक शिक्षणानंतर देखील त्यांची अभ्यासाची ओढ आणि विद्यार्थीवृत्ती कधीच संपली नाही. चालू घडामोडी आणि अनेक विषयांवरच सामान्य ज्ञान यावरील ताईंचे प्रभुत्व वाखाण्याजोग आहे. या वयातही आनंद साजरा करताना ताई छान छान गाणी म्हणत सहज ताल धरतात आणि समोरच्याला देखील त्यामध्ये रंगवून टाकतात. अगदी कवी दत्ता हलसगीकर म्हणतात त्याप्रमाणे

ज्यांची बाग फुलून आली
त्यांनी दोन फुले द्यावीत,
ज्यांचे सूर जुळून आले
त्यांनी दोन गाणी द्यावीत.

स्वतः जवळचा आनंद ताई नेहमी वाटत असतात आणि संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला आनंदी करतात.

त्यांच्या प्रचंड मोठ्या कामाच्या व्यापातून देखील ताईंना निसर्गा विषयी प्रेम जपलं आहे. ओल्या कचऱ्यातून खत बनवून सुंदर अशी परसबाग ताईंनी फुलवली आहे. प्लास्टिक पिशवी वापर ताई कटाक्षाने टाळतात. त्यांचं हे पर्यावरण प्रेम ताईंच्या प्रत्येक संस्थेत आणि कर्मचाऱ्यातही रुजलं आहे. घर कुटुंब, संस्था आणि समाज या सर्व पातळीवर प्रेम,शिस्त आणि संवेदनशीलता याचा सुंदर समतोल ताईंनी साधला आहे. केवळ कुटुंबाचीच आई न राहता आपल्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाचीच त्या माऊली बनल्या आहेत. या मातेने सर्वांना शिस्तही लावली, शिक्षणही दिलं, संस्कार रुजवले, माया ही केली आणि प्रसंगी खंबीर आधार म्हणून पाठीशी उभ्या देखील राहिलेल्या आहेत. अशा शारदा शिक्षण संस्थेच्या आधारवड असलेल्या आदरणीय सुवर्णाताई मालपाणी... त्यांच्या समर्पित कार्यासाठी स्वतः मात्र एकच शब्द वापरतात तो म्हणजे श्रीकृष्णार्पणमस्तु..

**शब्दांकन – प्रज्ञा डांगे म्हाळस,**
उपाध्यापिका,
मा.रु.दा. मालपाणी विद्यालय संगमनेर.

# महिलांच्या प्रश्नांना आवाज देणारे प्रभावी नेतृत्व - साक्षी सूर्यवंशी

## स्वप्न अधिकारी होण्याचे मात्र वाट समाजकारणाची









उच्च शिक्षण घेतलेली, प्रशासकीय सेवेत जाऊन समाजासाठी काहीतरी मोठे करण्याचे स्वप्न डोळ्यांत साठवलेली एक धाडसी तरुणी

आणि आज त्याच स्वप्नांना नवा अर्थ देत संगमनेर नगरपालिकेतील सर्वात तरुण, सक्षम आणि अभ्यासू नगरसेविका म्हणून कार्यरत असलेले नाव – साक्षी विनोद सूर्यवंशी.

माहेरची कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना समाजकारणाची वाट निवडणे हे सोपे नव्हते. पण पती विनोद सूर्यवंशी यांच्यासोबत राजकीय व सामाजिक कार्य करताना समाजातील प्रश्न जवळून पाहण्याची संधी मिळाली. विशेषतः महिलांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी, त्यांची न बोललेली वेदना आणि छोट्या-छोट्या अपेक्षा हे सर्व तीव्रतेने जाणवू लागले.

जर आपण त्यांच्या एखाद्या छोट्या समस्येचेही निराकरण करू शकलो, तर त्यापेक्षा मोठे समाधान कोणते? – या जाणिवेनेच सार्वजनिक जीवनात पाऊल टाकण्याचा निर्धार झाला.

पतीच्या पुढाकाराने आणि आमदार अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणुकीला सामोरे जाताना जबाबदारीची जाणीव अधिक प्रकर्षाने झाली. प्रभागातील सर्वसामान्य महिला, युवक आणि नागरिकांनी दाखवलेला विश्वास हेच खरे बळ ठरले आणि मोठ्या मताधिक्याने नगरपालिकेत निवड झाली.

**संघर्षातून उभा राहिलेला नेतृत्वाचा प्रवास**

**नगरपालिकेत एकमेव विरोधी नगरसेविका**

**पहिलाच कार्यकाळ**

**अनुभव कमी, पण आत्मविश्वास अफाट!**

सासरकडील माजी नगरसेविका स्व. पारूबाई सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन, पतींचे राजकीय अनुभव आणि कुटुंबाचे भक्कम पाठबळ यामुळे हे शिवधनुष्य समर्थपणे पेलणे शक्य झाले. आज विविध विषय समित्यांची सदस्या म्हणून त्या जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आहेत.

सत्ताधाऱ्यांनी नागरिकांवर टाकलेला कररूपी आर्थिक भार असो किंवा अतिक्रमणाच्या नावाखाली गोरगरिबांवर झालेली कारवाई, साक्षी सूर्यवंशी यांनी ठामपणे विरोध करत पहिले पुनर्वसन, मग कारवाई हे धोरण राबवण्यास भाग पाडले.

हातावर पोट असलेल्या व्यावसायिकांना दिलासा मिळवून देणे हा त्यांच्यासाठीच खरा आशीर्वाद आहे.

**स्वप्न अजूनही जिवंत आहे**



उच्च शिक्षण घेऊन अधिकारी बनून जनतेची सेवा करण्याचा संकल्प आजही कायम आहे. परंतु राजकारणाच्या माध्यमातून जनतेच्या थेट प्रश्नांवर काम करण्याची संधी लाभली, हेच भाग्य समजून त्या प्रभागातील प्रत्येक छोट्या-मोठ्या समस्येवर सातत्याने काम करत आहेत.

**महिला अबला नाही, सबला आहे!**

भारतीय राज्यघटनेने महिलांना समान अधिकार दिले आहेत. आज महिला प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत – प्रशासन, उद्योग, शिक्षण, राजकारण, संरक्षण सर्वत्र! म्हणून महिलांबद्दल सहानुभूती दाखवण्यापेक्षा त्यांना संधी आणि साथ देण्याची गरज आहे. त्या प्रत्येक संधीचे सोने करण्याची क्षमता आणि हिंमत ठेवतात.

महिलांना देवीचा दर्जा देणाऱ्या आपल्या संस्कृतीत आजही काही ठिकाणी त्यांची विटंबना होते, ही वेदनादायी बाब आहे. अशा समाजकंटकांवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर महिलांनीही आपल्या सामर्थ्याची जाणीव ठेवून सक्षमपणे समाज आणि कुटुंबाच्या कल्याणासाठी कार्यरत राहणे आवश्यक आहे.

**महिला दिनाचा खरा संदेश**

महिला दिन म्हणजे केवळ शुभेच्छांचा दिवस नाही

तो आहे सन्मानाचा, संधीचा, विश्वासाचा आणि पाठबळाचा दिवस! महिलांना मान द्या, संधी द्या, त्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवा.

हीच खरी महिला दिनाच्या शुभेच्छा!

साक्षी विनोद सूर्यवंशी यांचा प्रवास हा प्रत्येक तरुणीसाठी प्रेरणादायी आहे. स्वप्न पाहा, संघर्ष करा, उभे रहा कारण आजची महिला अबला नाही, ती सबला आहे!




दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव
22 कॅरेट हॉलमार्क दागिणे = 1, 45, 600/-
20 कॅरेट मणी = 1, 32, 370/-
18 कॅरेट रोज गोल्ड = 1, 19, 120/-
16 कॅरेट मुरणी = 1, 05, 890/-
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777






# फेरीवाल्यांना न्याय, नागरीकांना मोकळा श्वास

## १५ दिवसांत पर्यायी जागा, महिला सुरक्षेसाठी विशेष पथक - आ. तांबे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपालिकेच्या वतीने शहरात सुरू असलेली अतिक्रमण हटाव मोहीम पुढील काळातही कायम राहणार असून, या कारवाईत विस्थापित झालेल्या फेरीवाल्यांना पुढील १५ दिवसांत शाश्वत जागा उपलब्ध करून दिली जाईल, असे आश्वासन आमदार सत्यजित तांबे यांनी दिले.



शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे उपस्थित होत्या. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अतिक्रमण हटविणे आवश्यक असल्याचा निर्णय सर्वांनी एकमताने घेतला असल्याचे आमदार तांबे यांनी स्पष्ट केले. गोरगरीब फेरीवाल्यांना त्रास देण्याचा आमचा हेतू नाही. मात्र शहरात केवळ ८८० अधिकृत हॉकर्स असताना सुमारे अडीच हजारांहून अधिक फेरीवाले अतिक्रमित जागांवर व्यवसाय करत असल्याचे वास्तव आहे, असे त्यांनी सांगितले. महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देत येत्या ८ मार्च, महिला दिनापासून ११ जणांचे विशेष सुरक्षा पथक नियुक्त करण्यात येणार आहे. या पथकात महिलांचाही समावेश असेल. पोलिसांच्या सहकार्याने हे पथक रात्रंदिवस गस्त घालणार आहे. असा उपक्रम राबवणारी संगमनेर नगरपालिका राज्यातील पहिली नगरपालिका ठरेल, असा विश्वासही आमदार तांबे यांनी व्यक्त केला.

नगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, सत्तेवर येण्यापूर्वी पालिकेच्या निधीत केवळ तीन लाख रुपये शिल्लक होते. देशातील बहुतांश नगरपालिकांची आर्थिक स्थिती बिकट असल्याने पालिकेचे उत्पन्न वाढविण्यावर भर दिला जात आहे. शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी नागरिकांकडून अभिप्राय मागवण्यात आले असून, कला संचालनालयाची परवानगी मिळाल्यानंतर एसटी स्टँडसमोर हे स्मारक उभारले जाणार आहे. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकांसह स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणार्थ शंभर फुटी तिरंग्यासह भव्य शहीद स्मारक उभारण्याचा मानसही व्यक्त करण्यात आला.

शहरातील कचऱ्यापासून जैविक कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प सुरू करण्यात आला असून, त्यातून पालिकेला उत्पन्न मिळण्यास मदत होणार आहे. तसेच शासकीय कार्यालयांकडील सुमारे १५ कोटी रुपयांची थकबाकी वसुलीसाठी यंत्रणा मजबूत करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. याशिवाय जन्म-मृत्यूचे सुमारे १५०० दाखले घरपोच देण्याची सुविधा पालिकेने सुरू केली आहे. निवासी भागात सुरू असलेल्या रुग्णालयांना पार्किंग व्यवस्थेबाबत सूचना देण्यात आल्या असून, (पान ६ वर)

# २४ तासात इराण नष्ट करणार अमेरिकेचा गर्भित इशारा

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धाचा आज आठवा दिवस आहे. दरम्यान, रशिया युद्धादरम्यान इराणला गुप्तचर मदत देत असल्याची बातमी आहे. मॉस्कोने इराणला मध्यपूर्वेतील अमेरिकन युद्धनौका आणि लष्करी विमानांच्या स्थानाशी संबंधित माहिती पुरवली.



वॉशिंग्टन पोस्टने तीन अमेरिकन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने सांगितले आहे की, रशिया इराणला अशी लक्ष्यीकरण गुप्तचर माहिती देत आहे, ज्यामुळे तो अमेरिकन लष्करी तळांना लक्ष्य करू शकेल. अहवालात म्हटले आहे की, गेल्या आठवड्यात अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर इराणी सैन्याची अमेरिकन तळांचा शोध घेण्याची क्षमता कमकुवत झाली आहे. त्यानंतर तो रशियाची मदत घेत आहे.

दुसरीकडे, मॉस्कोनेही म्हटले आहे की इराण आणि रशियाचे अधिकारी संपर्कात आहेत, तथापि, रशिया तेहरानला गुप्तचर किंवा लष्करी मदत देत आहे की नाही याबद्दल काहीही सांगितले नाही. इराणची एक युद्धनौका आयआरआयएस लावन भारताच्या कोची बंदरावर थांबली आहे. एएनआयने सरकारी सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, २८ फेब्रुवारी रोजी तांत्रिक बिघाड झाल्यानंतर इराणने भारताकडे मदत मागितली होती. भारताने १ मार्च रोजी जहाजाला कोचीमध्ये डॉक करण्याची परवानगी दिली आणि त्यानंतर ४ मार्च रोजी ते बंदरगाहवर पोहोचले. जहाजाचे १८३ क्रू सदस्य सध्या कोचीमधील भारतीय नौदलाच्या सुविधांमध्ये थांबले आहेत.

आयआरआयएस लावन अलीकडेच भारतात आयोजित इंटरनॅशनल फ्लीट रिव्ह्यू २०२६ आणि मिलान २०२६ या नौदल सरावात सहभागी झाला होता, जे १५ ते २५ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आले होते.

# संगमनेर नगरपरिषदेच्या वतीने मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या वसुलीसाठी धडक मोहीम

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपरिषद यांच्यावतीने शहरातील मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या वसुली साठी धडक मोहीम सुरू करण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी दिली आहे.



**संगमनेर नगरपरिषदेने मालमत्ता कराची वसुली मोहिम तीव्र केली असून पालिकेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे कर्मचाऱ्यांसह स्वत ; या पथकात सहभागी झाले आहे.**

संगमनेर नगर परिषदेच्या वतीने पाणीपट्टी व मालमत्ता कराच्या वसुलीसाठी विशेष वसुली मोहीम राबविण्यात येत असून कराच्या वसुलीसाठी स्वतः मुख्याधिकारी हे प्रयत्नशील असून थकबाकीदारांवर कर भरण्याकरता स्वतः पुढाकार घेत आहे . शहरातील विविध भागात मोठी थकबाकी असणाऱ्या मालमत्ता कर धारकांकडे स्वतः भेट घेऊन कर भरण्याकरता आवाहन करीत आहे. या मोहिमेंतर्गत शहरातील मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या थकबाकीदारांना यापूर्वीच जप्तीच्या व नळ कनेक्शन कट करण्याच्या नोटिसा देण्यात आलेल्या असून या मोहिमेंतर्गत शहरातील विविध भागातील कर न भरणाऱ्या मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या थकबाकीपोटी सुमारे बावीस कनेक्शन बंद करण्यात आले असल्याची माहिती मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी दिली आहे.

सध्या मार्च अखेर असल्याने वसुली विभागाच्या कर अधिकारी श्वेता शिंदे, कर निरीक्षक बाजीराव नवले यांसह वसुली विभागातील सर्व कर्मचारी तसेच मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या थकबाकी दारांवर कारवाई करणाऱ्या इतर विभागातील अधिकारी व कर्मचारी प्रयत्न करीत आहे.

शहरातील विविध विभागातील कराची थकबाकी असणाऱ्या मालमत्ता धारकांना नोटीस देण्यात आलेल्या असून यापुढील काळात कोणतीही पूर्व सूचना न देता जप्तीची धडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी सांगितले. विशेष वसुली मोहिमेंतर्गत या पुढील काळात दुकाने गाळे सीलबंद व रहिवासी मालमत्ता जप्ती, नळ कनेक्शन खंडित करणे, पेपर, बॅनर वर प्रसिद्धी तसेच जप्त झालेल्या मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्यात येणार आहे . यापुढील काळात थकबाकीदारांवर करण्यात येणारी कारवाई तीव्र स्वरूपात करण्यात येणार असून थकबाकीदारांनी आपल्या कराचा वेळेत भरणा करावा व आपल्यावर होणारी संभाव्य कारवाई टाळावी व नगरपरिषदेस सहकार्य करण्याचे आवाहन नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख सर्व नगरसेवक नगरसेविका तसेच मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी केले आहे.



# राजापूर येथे हुतात्मा स्मारक अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले राजापूरचे हुतात्मा स्मारकास दरवर्षी ९ मार्च रोजी अभिवादन केले जाते. ९ मार्च १९५० रोजी सरकारच्या विरोधात केलेल्या आंदोलनामुळे पोलिसांनी गोळीबार केला व या गोळीबारात तीन हुतात्मे शहीद झाले राजापूर ग्रामस्थांनी १९५० साली या तीन हुतात्म्यांचे स्मारक उभारले आणि त्यांच्या त्यागाची आठवण म्हणून प्रतीवर्षी त्यांना सलामी देऊन अभिवादन केले जाते. मागील वर्षी राजापूर हुतात्मा स्मारकास ७५ वर्षे पुर्ण झाल्याने संयोजकांच्या वतीने मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणाऱ्या आ. सत्यजीत तांबे यांनी सांगितले होते की, या स्मारकाचे सुशोभीकरण करण्यात यावे त्यासाठी माझ्याकडून भरीव सहकार्य केले जाईल. त्यानुसार आ. सत्यजीत तांबे यांनी या स्मारकासाठी मदत निधी जाहीर केल्याने स्मारकाची अधुनिक प्रतिकृती तयार करण्यात आली असून खर्च १७ लाख रूपये आहे. राजापूर पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी हुतात्मा स्मारक समितीने नाशिक येथील श्री. श्रीरंग किसनलाल सारडा ट्रस्टच्या माऊली अभ्यासिका सुरू केली आहे. या अभ्यासिकेचे उद्घाटनही मान्यवरांच्या शुभ हस्ते होणार आहे. राजापूर हुतात्मा स्मारक समितीने स्मारक परिसराचे विविध विकास कामांचा प्रकल्प आराखडा तयार करून राजापूरमधील बाहेरगावी असणाऱ्या राजापूरकरांना ग्रामसंस्था व ग्रामस्थांना देणगीचे आवाहन करण्यात आले. त्यानुसार स्वातंत्र सेनानी कॉ. रामभाऊ नागरे यांचा अतिशय सुंदर पुतळा शिवाजी कचरू नागरे, मा. प्राचार्य के. पी. बैरागी व बाळासाहेब भिकाजी हासे यांनी तयार केला असून त्याचे अनावरणही या प्रसंगी होणार आहे. राजापूरचे भुमीपुत्र माजी प्राचार्य गणपतराव सोनवणे यांच्या स्मरणार्थ सोनवणे परिवाराकडून सुंदर कमान व गेट हुतात्मा स्मारकास देण्याचे जाहीर केले आहे. राजापूरचे माजी सरपंच कॉ. आनंदा नाना हासे यांचे स्मरणार्थ ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र, सह्याद्री ॲग्रोव्हेट उद्योग समुहाच्या वतीने देण्याचे जाहीर केले आहे. हुतात्मा स्मारक परिसरास वॉल कंपाऊंड व विद्युत रोषणाईचे कार्य प्रस्तावित आहे.

९ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे, माजी नगराध्यक्ष सौ. दुर्गाताई तांबे, माऊली अभ्यासिकेचे रामदासजी जाधव, कॉ. राधेश्याम गुंजाळ, कॉ. आर. डी. चौधरी, कॉ. कारभारी उगले यांचेसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, कम्युनिस्ट चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत अशी माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली.







# घरगुती सिलिंडरचे दर ६० रुपयांनी वाढले

मुबई (वृत्तसंस्था)

केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलिंडर ६० रुपयांनी महाग केले आहे. दिल्लीत १४.२ किलोचा एलपीजी गॅस आता ९१३ रुपयांना मिळेल. आधी तो ८५३ रुपयांना मिळत होता. तर, १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरमध्ये ११५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. तो आता १८८३ रुपयांना मिळेल. वाढलेल्या किमती ७ मार्चपासून लागू होतील.



अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील युद्धामुळे देशात गॅस तुटवड्याची शक्यता वर्तवली जात असतानाच सरकारने गॅसच्या दरात वाढ केली आहे. या परिस्थितीचा विचार करून, सरकारने आपत्कालीन अधिकारांचा वापर करत देशातील सर्व तेल रिफायनरी कंपन्यांना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले आहेत.

मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. हा धोका लक्षात घेऊन सरकारने हे आदेश जारी केले आहेत. यात म्हटले आहे की, आता रिफायनरीज प्रोपेन आणि ब्युटेनचा वापर केवळ स्वयंपाकाचा गॅस बनवण्यासाठी करतील.केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलिंडर ६० रुपयांनी महाग केले आहे.

# अर्थसंकल्प प्रतिक्रिया

## सरकारने शेतकरी कर्ज विळख्यातून मुक्त करावा - माजी मंत्री थोरात

संगमनेर -राज्य सरकारने जाहीर केलेला अर्थसंकल्प हा सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांची निराशा करणारा आहे. मोठमोठी आश्वासने असणाऱ्या या अर्थसंकल्पातून कर्जमाफीची जी घोषणा झाली आहे ती अगदी तुटपुंजी आहे. सरकारने राज्यातील शेतकऱ्यांना कर्ज विळख्यातून मुक्त करताना सरसकट कर्जमाफी करणे आवश्यक असल्याची मागणी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी महसूल व कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे. काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांनी अर्थसंकल्पावर बोलताना म्हटले आहे की, महाविकास आघाडी सरकारने विनाअट शेतकऱ्यांना २ लाख रुपयांची कर्जमाफी व नियमित कर्ज भरणाऱ्यांना ५० हजारांचे अनुदान दिले होते. यामध्ये कोणत्याही अटी नव्हत्या सहजतेने त्या शेतकऱ्यांना मिळाल्या. त्यानंतर पाच सहा वर्षांचा काळ लोटला आहे. शेतकरी हा अडचणीत आहे. शेतकऱ्यांना दोन लाखाच्या कर्जमाफीने काही होणार नसून शेतकरी पूर्णपणे कर्जाच्या विळख्यातून बाहेर येईल यासाठी सरकारने ठोस पावले उचलण्याची गरज होती. याकरता सरसकट कर्जमाफी करणे आवश्यक असून नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना १ लाख रुपयांचे अनुदान दिले पाहिजे अशी मागणी केली. तर सध्या आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे शेतकरी आणि फळ उत्पादक अडचणीत आले आहे. द्राक्ष आणि डाळिंब या पिकांच्या बरोबर इतर फळबागांकरिता सरकार काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महिला, शेतकरी आणि युवकांना बळ देणारा अर्थसंकल्प - आ. खताळ

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेला हा अर्थसंकल्प दूरदृष्टी असलेला आणि महत्त्वाकांक्षी आहे. स्व. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना समर्पित करत, त्यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडवण्याचा निर्धार या अर्थसंकल्पातून स्पष्टपणे जाणवतो. शेतकरी, महिला आणि युवकांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न या अर्थसंकल्पात दिसतो. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेद्वारे बळीराजाला दिलासा देण्यात आला आहे. लाडकी बहीण योजना सुरू ठेवण्याचा निर्णय लाखो महिलांसाठी आधाराचा स्तंभ ठरणारा आहे. २७ लाख लखपती दीदी घडवण्याचे यश आणि पुढे आणखी २५ लाख लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट हे महिला सक्षमीकरणाचे उत्तम उदाहरण आहे.

तंत्रज्ञान आणि एआय च्या माध्यमातून शेती, आरोग्य आणि ग्रामीण विकास साधण्याचा संकल्प अत्यंत स्वागतार्ह आहे. ७५ गावांतील एआय पथदर्शी प्रकल्प, महाविस्तार एआय, EduCity यासारख्या उपक्रमांमुळे महाराष्ट्र देशात आघाडीवर राहील यात शंका नाही. स्टार्टअप आणि युनिकॉर्नमध्ये महाराष्ट्र आधीच नंबर १ आहे. पुढील ५ वर्षांत १.२५ लाख नवे उद्योजक घडवण्याचे स्वप्न युवकांना नक्कीच प्रेरणा देणारे आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, संत गाडगेबाबा, डॉ. आंबेडकर, छ. शिवाजी महाराज यांच्या स्मृतींना उजाळा देत २०२६-२७ हे वर्ष सामाजिक समता आणि समरसता वर्ष म्हणून साजरे करण्याचा निर्णय अभिमानास्पद आहे.

## उत्तर महाराष्ट्रासाठी अर्थसंकल्प निराशाजनक - आमदार तांबे

राज्य सरकारने सादर केलेला यंदाचा अर्थसंकल्प काही बाबतीत सकारात्मक असला तरी एकंदरीत तो अपूर्ण आणि अनेक भागांसाठी निराशाजनक वाटतो, अशी प्रतिक्रिया आमदार डर्ीूरक्षशशीं ढालश यांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री -क्षळीं झरुरी यांच्या आकस्मिक निधनामुळे हा अर्थसंकल्प मांडताना एक मोठी पोकळी जाणवत असल्याची भावना देखील त्यांनी व्यक्त केली. राज्याच्या अर्थकारणावर ठसा उमटवणारे आणि अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांमध्ये मोलाची भूमिका बजावणारे अजितदादा यांच्या अनुपस्थितीत सादर झालेला हा अर्थसंकल्प अपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. आ. तांबे म्हणाले की, राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थसंकल्प हा महत्त्वाचा दस्तऐवज असतो. त्यामध्ये विविध विभागांसाठी, प्रदेशांसाठी आणि विकासाच्या योजनांसाठी ठोस तरतुदी अपेक्षित असतात. मात्र यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये उत्तर महाराष्ट्राच्या विकासासाठी कोणतीही ठोस आर्थिक तरतूद दिसून येत नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे. उत्तर महाराष्ट्र हा शेती, उद्योग आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रदेश असूनही त्याकडे अपेक्षित लक्ष दिले गेलेले नाही. उत्तर महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा, सिंचन प्रकल्प, रस्ते, शिक्षण, उद्योग आणि रोजगारनिर्मिती या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर काम करण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पातून या भागासाठी ठोस योजनांची घोषणा होईल, अशी अपेक्षा होती. मात्र त्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले असून या प्रदेशातील नागरिकांमध्ये नाराजीची भावना निर्माण होण्याची शक्यता असल्याचे तांबे यांनी नमूद केले.

## अटींशिवाय संपूर्ण कर्जमाफी करा किसान सभेचा सरकारला इशारा

अर्थसंकल्प मांडत असताना देवेंद्र फडणवीस साहेब यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली. किसान सभेच्या वतीने आम्ही कर्जमाफीच्या घोषणेचे स्वागत करत आहोत. कर्जमाफी करेंगे लेकिन तारीख नही बतायेंगे हा जो सरकारचा बाणा होता तो खोडून काढण्यासाठी विदर्भामध्ये शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन झाले. आंदोलनाच्या वेळी ३० जून २०२६ च्या आत आम्ही कर्जमाफी करू असे आश्वासन सरकारच्या वतीने देण्यात आले. यानुसार आज कर्जमाफीची घोषणा झाली असल्यामुळे काही प्रमाणात दिलासा शेतकऱ्यांना मिळाला आहे.

मात्र ही घोषणा करताना सप्टेंबर २०२५ च्या आत थकीत असणाऱ्या शेतकऱ्यांचे २ लाख मर्यादेपर्यंतचे कर्ज माफ करण्याची घोषणा करण्यात आली आहे. परिणामी ज्या शेतकऱ्यांकडे २ लाखापेक्षा जास्त कर्ज आहे ते या कर्जमाफीतून वगळले जाणार आहेत. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ व्हावा यासाठी ३० जून २०२६ पर्यंतचे कर्ज माफ केले जावे ही किसान सभेची मागणी होती. मात्र ३० जून २०२६ ऐवजी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतच कर्ज माफ केलं जाणार असल्यामुळे अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफीतून वंचित राहावे लागण्याची शक्यता आहे. कर्जमाफी केवळ थकीत कर्जदारांची होणार असल्याने व नियमित कर्जदारांची ५० हजार रुपये अनुदानावर बोळवण केली गेली असल्याने या कर्जमाफीतही नियमित कर्जदारांवर अन्याय करण्यात आलेला आहे. नियमित कर्जदार हे सुद्धा शेती संकटाने ग्रस्त असलेले शेतकरी आहेत.

# गुटखा माफियांना अभय देणाऱ्या पोलिसांवर कारवाई

## दोन अंमलदारांची मुख्यालयात उचलबांगडी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- अहिल्यानगर जिल्ह्यात फोफावलेल्या अवैध गुटखा विक्रीला पोलीस प्रशासनातीलच काही बड्या माशांचे अभय असल्याचा गंभीर आरोप आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत नावानिशी केल्यानंतर अखेर प्रशासनाला हालचाल करावी लागली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार हृदय घोडके आणि अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयातील शंकर चौधरी या दोघांचीही तातडीने पोलीस मुख्यालयात उचलबांगडी करण्यात आली आहे.

आमदार खताळ यांनी हिवाळी अधिवेशनापासून जिल्ह्यातील या भ्रष्ट साखळीवर सातत्याने आवाज उठवला होता. जिल्ह्यात परराज्यातून मोठ्या प्रमाणात गुटखा येत असून हा अवैध व्यवसाय सुरळीत सुरू राहावा यासाठी 'सिस्टीम'च्या नावाखाली दरमहा सुमारे ९० लाख रुपयांची वसुली होत असल्याचा धक्कादायक आरोप त्यांनी केला होता. केवळ आरोपांवर न थांबता या वसुलीत सहभागी असलेल्या काही पोलीस कर्मचाऱ्यांची नावेही त्यांनी थेट विधानसभेच्या पटलावर घेतली होती.

खताळ यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र चौकशीच्या नावाखाली विलंब होत असल्याचे लक्षात येताच खताळ यांनी आपला पाठपुरावा अधिक तीव्र केला. काही पोलीस कर्मचारी थेट गुटखा माफियांच्या संपर्कात असून गुन्हे लपवण्यासाठी त्यांना मदत करत असल्याचा आरोपही त्यांनी केला होता.

या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी तातडीने आदेश काढत हृदय घोडके आणि शंकर चौधरी यांची पोलीस मुख्यालयात बदली केली. त्यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांची आता सखोल विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, या कारवाईमुळे पोलीस दलातील त्या गटाला मोठा धक्का बसला आहे, जो वर्षानुवर्षे गुन्हेगारांशी संगनमत करून स्वतःची पोळी भाजत होता. यापूर्वी अमली पदार्थ विक्री प्रकरणात अंमलदार श्यामसुंदर गुजर याला बडतर्फ करण्यात आले होते. त्याच धर्तीवर आता घोडके आणि चौधरी यांच्यावरही कडक कारवाई व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

आमदार अमोल खताळ यांनी उपस्थित केलेला हा मुद्दा केवळ एका विभागापुरता मर्यादित नसून जिल्ह्यातील तरुण पिढीला उद्ध्वस्त करणाऱ्या गुटखा माफियांना मिळणारे राजकीय आणि प्रशासकीय कवच फोडण्याचा प्रयत्न असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा मुद्दा पुन्हा गाजण्याची शक्यता निर्माण झाल्याने त्यापूर्वीच प्रशासनाने ही कारवाई करून आपली भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा आहे. या घटनेमुळे जिल्ह्यातील इतरही भ्रष्ट कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

तथापि, केवळ बदली करून कारवाई आटोपल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. संबंधित कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच चौकशी सुरू असताना त्यांना जिल्हा मुख्यालयातच नियुक्ती देण्याऐवजी जिल्ह्याबाहेर बदली करणे आवश्यक होते, असा सूरही नागरिकांमधून उमटत आहे.

## मद्य मुक्तीसाठी रविवारी कार्यक्रम

संगमनेर - मागील सुमारे ९० वर्षांहून अधिक तसेच १९० पेक्षा अधिक देशांमध्ये मद्यपींना मद्यमुक्त जीवन मिळावे यासाठी अल्कोहोलीक्स अनोलिमस ही विश्वव्यापी संघटना काम करत आहे. या संस्थेचा एक भाग असणाऱ्या ए. ए. स्वीकार समूह संगमनेर यांच्या वतीने रविवार दिनांक ८ मार्च रोजी सायं. ४ वाजता सह्याद्री कॉलेज येथे कम्युनिकेशन विथ प्रोफेशनल कम्युनिटीज या विषयावर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी शहरातील वैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिकांना विशेष निमंत्रित करण्यात आले आहे. सर्वसामान्य नागरिकांनाही या कार्यक्रमाचा लाभ घेता येणार आहे. या विशेष सभेला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# राज्यस्तरीय 'स्कूल संसद' उपक्रमात वेदांती फटांगरेचा उल्लेखनीय सहभाग

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथील विद्यार्थिनी वेदांती संदीप फटांगरे हिने दीपस्तंभ चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित स्कूल संसद विंटर सेशन २०२५-२६ या राज्यस्तरीय उपक्रमात उल्लेखनीय सहभाग नोंदवत आपल्या प्रतिभेची प्रभावी छाप उमटवली आहे.

विद्यार्थ्यांना लोकशाही व्यवस्था, संसदीय कामकाज आणि सामाजिक प्रश्नांवरील विचारप्रक्रिया समजावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात राज्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. प्राथमिक फेरी नाशिक येथे झाली. या फेरीत लेखी परीक्षा, वक्तृत्व चाचणी, प्रश्नोत्तर सत्र आणि विश्लेषण क्षमतेची परीक्षा घेण्यात आली.

वेदांतीची निवड तिच्या उत्कृष्ट वक्तृत्वकला, सार्वजनिक बोलण्यातील आत्मविश्वास, नागरीशास्त्रावरील भक्कम ज्ञान, विश्लेषणशक्ती आणि नेतृत्वक्षमतेच्या आधारे अंतिम फेरीसाठी करण्यात आली. परीक्षकांसमोर तिने दिलेले भाषण आणि त्यानंतरच्या प्रश्नांना दिलेली अचूक व प्रभावी उत्तरे विशेष ठरली. अंतिम अधिवेशन पुणे येथे पार पडले. प्रत्यक्ष लोकसभेच्या धर्तीवर शपथविधी, संसदीय चर्चा, ठराव मांडणी, पत्रकार परिषद आणि मतदान प्रक्रिया यांचे आयोजन करण्यात आले होते. विविध पक्षांमध्ये विभागलेल्या विद्यार्थ्यांनी संसदीय शिस्त पाळत चर्चेत सहभाग घेतला. वेदांतीने या सर्व प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेत परिपक्व मांडणीचे दर्शन घडविले.

या अनुभवातून शासनव्यवस्था, अर्थसंकल्पाचे नियोजन, लोकप्रतिनिधींची जबाबदारी आणि लोकहितासाठी निर्णय कसे घेतले जातात याची प्रत्यक्ष समज मिळाल्याचे वेदांतीने सांगितले. विविध पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसोबत काम करताना समन्वय, संवादकौशल्य आणि एकात्मतेचे महत्त्वही तिला अनुभवता आले.




वेदांतीच्या या यशाबद्दल शाळेचे शिक्षक, तिचे वडील उद्योजक संदीप लक्ष्मण फटांगरे, आई प्रतिभा फटांगरे आणि सहविद्यार्थी यांच्याकडून तिचे अभिनंदन करण्यात येत असून, तिच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत तिला पक्ष प्रवक्ता बनण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून १४४ मुलांची निवड करण्यात आली होती आणि या मुलांना आता मुंबईला मंत्रालयातील कामकाज कसे चालते हे पाहण्याची संधी मिळणार आहे

# संगमनेर मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये रोबोटिक टोटल नी रिप्लेसमेंट सुविधा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- बदलती जीवनशैली, वाढते वय, ऑस्टिओआर्थरायटिस, दुखापती तसेच वाढते वजन यांमुळे गुडघेदुखीच्या समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. चालताना त्रास होणे, जिने चढताना अडचण येणे, बसून उठताना तीव्र वेदना होणे आणि रात्री झोप न लागणे अशा समस्यांमुळे अनेक रुग्णांचे दैनंदिन जीवन प्रभावित होते. अशा रुग्णांसाठी टोटल नी रिप्लेसमेंट ही शस्त्रक्रिया प्रभावी आणि कायमस्वरूपी उपाय ठरत आहे.

टोटल नी रिप्लेसमेंटमध्ये झिजलेला किंवा खराब झालेला गुडघ्याचा सांधा काढून त्याच्या जागी कृत्रिम सांधा बसविण्यात येतो. सध्या रोबोटिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने गुडघा प्रत्यारोपण अधिक अचूकतेने केले जाते. रुग्णाच्या गुडघ्याचे ३-डी मॉडेल तयार करून शस्त्रक्रियेचे अचूक



नियोजन केले जाते. त्यामुळे इम्प्लांट योग्य पद्धतीने बसवता येतो, रक्तस्राव व वेदना कमी होतात आणि रुग्ण लवकर बरा होण्यास मदत होते. तसेच शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना लवकर चालणे व दैनंदिन कामकाज सुरू करणे शक्य होते.

यासोबतच हिपच्या समस्यांसाठी टोटल हिप रिप्लेसमेंट Anterior Approach पद्धतीने शस्त्रक्रिया देखील उपलब्ध आहे. या आधुनिक पद्धतीमुळे शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना मांडी घालून बसणे तसेच दैनंदिन जीवनातील



हालचाली सहज करता येतात. कोविडनंतर कमी वयातील रुग्णांमध्ये देखील हिप रिप्लेसमेंटचे प्रमाण वाढताना दिसत असून अशा रुग्णांच्या भविष्यातील जीवनशैली लक्षात घेऊन ही पद्धत अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

याबाबत डॉ. निखिल रहांगडाले, कन्सल्टंट ऑर्थोपेडिक सर्जन व हिप आणि नी रिप्लेसमेंट तज्ज्ञ, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, संगमनेर यांनी सांगितले की, गुडघेदुखी किंवा हिपच्या वेदना वर्षानुवर्षे सहन करण्याची गरज नाही. योग्य वेळी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेतल्यास टोटल नी किंवा हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेमुळे रुग्ण वेदनामुक्त आणि सक्रिय जीवन जगू शकतो.

मेडिकव्हर हॉस्पिटल्स, संगमनेरच्या सेंटर हेड डॉ. स्नेहल गायके यांनी सांगितले की, गुडघा व हिप रिप्लेसमेंटसारख्या अत्याधुनिक शस्त्रक्रियांसाठी रुग्णांना आता नाशिक किंवा पुण्यासारख्या शहरात जाण्याची गरज नाही. संगमनेरमधील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्येच ही आधुनिक सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटल्स, संगमनेर येथे अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, अनुभवी डॉक्टरांची टीम, प्रगत आयसीयू सुविधा तसेच संपूर्ण पुनर्वसनासाठी फिजिओथेरपी सेवा उपलब्ध आहेत. गुडघा किंवा हिपच्या तीव्र वेदनांनी त्रस्त असलेल्या रुग्णांनी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## अमृतवाहिनीच्या डॉ. सुनिल शेवाळे यांना पीएच. डी. पदवी प्राप्त

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर

कोल्हेवाडी (ता. संगमनेर) येथील कै. शिवाजी काशिनाथ शेवाळे यांचे चिरंजीव डॉ. सुनिल शिवाजी शेवाळे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथून भौतिकशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन करून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



डॉ. शेवाळे यांनी आर्द्रता संवेदन अनुप्रयोगांसाठी $AB_2 O_4$ संरचनेच्या ऑक्सोस्पायनेल्स आणि त्यांच्या नॅनो-कॉम्पोझिट्सच्या भौतिक-रासायनिक व विद्युत गुणधर्मांचा अभ्यास या विषयावर सखोल संशोधन प्रबंध सादर केला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या आर्द्रता संवेदन क्षेत्रात त्यांनी केलेले संशोधन उपयुक्त ठरणार असून या संशोधनासाठी त्यांना प्रा. डॉ. प्रणव प्रमोदराव बर्दापूरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संशोधन कार्यादरम्यान त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानांकित जर्नलमध्ये एकूण १० संशोधन निबंध प्रकाशित करून शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. सध्या डॉ. सुनिल शेवाळे हे अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेत प्राध्यापक म्हणून कार्यरत असून अध्यापन व संशोधन क्षेत्रात ते सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांच्या या शैक्षणिक यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक व संशोधन परंपरेत भर पडली आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, वरिष्ठ ट्रस्टी डॉ. सुधीरजी तांबे, ट्रस्टी शरयू देशमुख, सीईओ अनिलजी शिंदे, अकॅडमिक डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव तसेच प्राचार्य व विभागप्रमुख यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व संशोधन वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. डॉ. शेवाळे यांच्या या यशामुळे परिसरात अभिमानाची भावना व्यक्त होत असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# संभाजी महाराजांच्या अंत्यविधीबाबत इतिहासात उल्लेख नाही

## संभाजी कादंबरीतील अनेक पात्रे काल्पनिक; लेखक विश्वास पाटील यांची कबुली

मुंबई (वृत्तसंस्था)

छत्रपती संभाजी महाराज यांच्या अंत्यसंस्काराबाबत कोणत्याही ऐतिहासिक दस्तऐवजात स्पष्ट उल्लेख आढळत नसल्याचे लेखक विश्वास पाटील यांनी कोरेगाव भीमा चौकशी आयोगासमोर कबूल केले आहे. त्यांच्या संभाजी या कादंबरीतील काही पात्रे आणि घटनांचे वर्णन हे ऐतिहासिक तथ्य नसून कल्पनेवर आधारित असल्याचेही त्यांनी उलटतपासणीत मान्य केले. विशेषतः जना परीटिण, गोविंद नाक, दामाजी पाटील आणि पाटलीण ही पात्रे पूर्णपणे काल्पनिक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे संभाजी महाराजांच्या अंत्यविधीबाबत निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर या विधानाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

कोरेगाव भीमा प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या आयोगासमोर शुक्रवारी दिवसभर सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान राज्य सरकारचे विशेष सरकारी वकील ॲड. शिशिर हिरे यांनी लेखक विश्वास पाटील यांची सविस्तर उलटतपासणी घेतली. विविध मुद्द्यांवर प्रश्न विचारताना कादंबरीतील संदर्भ, ऐतिहासिक आधार आणि त्या लिखाणाचा समाजावर होणारा परिणाम यावरही चर्चा झाली. या वेळी उत्तर देताना पाटील यांनी त्यांच्या कादंबरीतील काही उल्लेख काल्पनिक स्वरूपाचे असल्याचे मान्य केले, अशी माहिती ॲड. हिरे यांनी दिली.



संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'संभाजी' या कादंबरीत त्यांच्या अंत्यसंस्काराविषयी उल्लेख करण्यात आला होता. या कथनावरून महाराष्ट्रात काही वर्षांपूर्वी वाद निर्माण झाला होता. काही गटांनी कादंबरीतील कथनाचा आधार घेत संभाजी महाराजांचा अंत्यविधी विशिष्ट व्यक्तीने केल्याचा दावा केला होता. या दाव्यांमुळे दोन समाजांमध्ये मतभेद वाढल्याचेही सांगितले गेले. या पार्श्वभूमीवर १ जानेवारी २०१८ रोजी पुणे जिल्ह्यातील कोरेगाव येथे दंगलसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्या घटनेची चौकशी सध्या आयोगाकडून सुरू आहे.

उलटतपासणीदरम्यान ॲड. शिशिर हिरे यांनी संभाजी महाराजांच्या अंत्यसंस्काराबाबत ऐतिहासिक पुरावे आहेत का, असा प्रश्न विचारला. त्यावर उत्तर देताना विश्वास पाटील यांनी स्पष्ट केले की, संभाजी महाराजांच्या अंत्यविधीबाबत कोणत्याही ऐतिहासिक दस्तऐवजात स्पष्ट उल्लेख सापडत नाही. तसेच संभाजी, ही कादंबरी काही ऐतिहासिक तथ्ये आणि भौगोलिक संदर्भ यांच्या आधारे तयार केलेला कल्पनाविलास असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे कादंबरीतील काही घटना आणि पात्रे पूर्णपणे काल्पनिक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line : 7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त भाजप शहर मंडलाकडून अभिवादन



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** छत्रपतींच्या पराक्रम, स्वराज्याच्या ध्यास आणि राष्ट्रभक्तीच्या प्रेरणेने प्रेरित होऊन आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी संगमनेर शहर मंडलाच्या वतीने पक्ष कार्यालय, संगमनेर येथे अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी शहराध्यक्ष पायल ताजणे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला देखील पुष्पहार अर्पण करून त्यांच्या अद्वितीय शौर्य, पराक्रम व स्वराज्य स्थापनेच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. याचबरोबर भारताच्या संविधानाचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास देखील पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित कार्यकर्ते ज्योती भोर, निता मोहरीकर, रूपाली उंडे, कांचन मोंढे, अरुणा पवार, अंजली शिंदे, मनीषा कांबळे, प्रभावती करपे, मदुरा पोळ, दिपाली कोळपकर, भारत गवळी, विशाल एनगंदुल, शुभम लहामगे, किरपाल डंग, किशोर कालडा, शिवकुमार भंगीरे, अरुण कुलकर्णी, श्याम कोळपकर, आकाश सहाणे, अविनाश फटांगरे, सागर भोईर, गिरीश ससाने, वैभव आडांगळे, विकास गुळवे, सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार व आदर्श अंगीकारून समाजकार्य व राष्ट्रसेवेचे कार्य अधिक जोमाने करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# शिवस्मृती मोबाईल शॉपीमध्ये सॅमसंगच्या नव्या मॉडेलचे लाँचिंग

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** संगमनेर शहरातील मोबाईल डॉक्टर नावाने ओळख असलेले शिवस्मृती मोबाईल शॉपी चे संचालक संदीप गुंजाळ यांच्या मोबाईल शॉपीमध्ये आज सॅमसंगचा नवीन लाँच झालेल्या मोबाईलची दिमाखात लाँचिंग झाली आहे. सॅमसंगच्या या नवीन मॉडेलच्या लाँचिंगसाठी स्वतः संगमनेर शहरच्या नगराध्यक्ष डॉ. मैथिली ताई तांबे यांनी उपस्थिती दाखवली आणि सर्व कस्टमरला शिवस्मृती मोबाईल शॉपीमधून मोबाईल घेण्याचे आवाहन केले.




डॉ. मैथिलीताई बोलताना सांगितले की, आपल्या संगमनेर शहराच्या वैभवामध्ये या दुकानाचे एक विशिष्ट आणि चांगले नाव गेल्या ३० वर्षांपासून आहे. कारण त्यांच्याकडे दोघेही नवरा-बायको मोबाईल रिपेरिंग करत आहेत आणि पूर्ण नगर जिल्ह्यामध्ये त्यांचे नाव घेतले जाते.

सर्व कस्टमरला रिझनेबल रेटमध्ये व प्रामाणिक सर्व्हिस देण्याचे यांचे काम असते आणि हे स्वतः कस्टमरला सर्व्हिस देण्यासाठी खूप प्रयत्न करत असतात. तसेच त्यांच्या शोरूममध्ये मोबाईल सेल्स, सर्व्हिस, रिपेरिंग, एक्स्चेंज, क्सेसरीज अशा विविध प्रकारच्या गोष्टी एका छताखाली भेटतात.

याप्रसंगी शिवस्मृती मोबाईल शॉपी चे संचालक संदीप गुंजाळ तसेच मोबाईल डॉक्टर सुप्रिया गुंजाळ, सॅमसंगचे ऑथोराइज डिस्ट्रीब्यूटर श्रीपाल शेठ शहा, कंपनीचे सर्व अधिकारी आणि खूप मोठ्या प्रमाणात कस्टमर वर्ग उपस्थित होता.

शिवस्मृती मोबाईल शॉपी चे संचालक संदीप गुंजाळ यांनी त्यांच्या मनोगतामध्ये नवीन आलेल्या मोबाईलचे महत्त्वाचे फीचर सांगितले आहे. ते असे म्हटले की, आलेला नवीन मोबाईल हा सर्व कस्टमर साठी खूप कामाचा ठरणार आहे. कारण त्यामध्ये डिस्प्ले प्रायव्हसी दिलेली आहे, त्यामुळे आजूबाजूला असणाऱ्या कोणालाही त्या मोबाईलमधले काही दिसणार नाही. तसेच तो मोबाईल कॅमेरा मध्ये द बेस्ट बनवण्यात आलेला आहे. बॅटरी तिची खूप मोठी आहे आणि सर्वात सर्व ब्रँडला टक्कर देणार हा मोबाईल त्यांनी काढलेला आहे.

ते पुढे असे म्हटले की, हा मोबाईल खरेदी करताना ऑथोराइज दुकानांमधूनच खरेदी करा. कारण मार्केटमध्ये डुप्लिकेट मोबाईल विकण्याचा खूप मोठा सुळसुळाट आहे. ते ओळखण्याची सोपी पद्धत त्यांनी सांगितली आहे की, तुम्ही जो मोबाईल घेता त्याच्यावरती कंपनीचे आणि डिस्ट्रीब्यूटर चे ओरिजनल स्टिकर लावलेले असते. फक्त ते पाहूनच मोबाईल खरेदी केला पाहिजे, नाहीतर कस्टमरची खूप मोठ्या प्रमाणात फसवणूक होते.

सर्व कस्टमरने मोबाईल खरेदी करून शिवस्मृती मोबाईल शॉपीला त्यांची पहिली पसंती

# छ. शिवाजी महाराजांचे विचार जगासाठी प्रेरणादायी - माजी मंत्री थोरात

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त स्वाभिमानी संगमनेर शहर व तालुका समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा येथे आई तुळजाभवानीचा भव्य देखावा साकारला असून याला नागरिकांची मोठी पसंती मिळाली आहे. याच बरोबर मिरवणुकीमध्ये किल्ले शिवनेरी ढोल ताशा पथक, डी.जे., फुलांची व फटाक्यांची झालेली आतिषबाजी, झालेली छत्रपती शिवाजी महाराजांची आरती आणि देखाव्याचे उद्घाटन हा संस्मरणीय सोहळा ठरला. मानवताधर्म, लोकशाही व सुराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण जगासाठी सदैव प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.

छाया– प्रसाद सुतार




स्वाभिमानी संगमनेर शहर व तालुका शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने आयोजित महाराजांच्या जयंतीनिमित्त भव्य व आकर्षक आई तुळजाभवानी देखाव्याचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा येथे मोठ्या उत्साहात झाले. यावेळी संगमनेरमधील शिवजयंती समिती, राष्ट्रवादी शरद पवार पक्ष, शिवसेना, शिवजयंती युवक उत्सव समिती, विविध व्यापारी संघटना, सेवाभावी संघटना, बजरंग दल, यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, नागरिक, महिला व तरुणाई मोठ्या संख्येने उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या पाठीमागे आई तुळजाभवानीचा भव्य आकर्षक देखावा साकारण्यात आला आहे. फुलांची सजावट, विद्युत रोषणाई, प्रसन्न मूर्ती, महाराजांचे स्मारक हा विलोभनीय दृश्य सोहळा पाहण्यासाठी शहरातील हजारो नागरिकांनी मोठी गर्दी केली. यावेळी किल्ले शिवनेरी ढोल ताशा पथकाने सादर केलेला कार्यक्रम, याचबरोबर तरुणांनी मर्दानी खेळाचे दाखवलेले प्रात्यक्षिक आणि फुलांची व फटाक्यांची झालेली आतिषबाजी संस्मरणीय ठरली. प्रचंड जयघोषात तुळजाभवानीची आणि छत्रपती शिवाजी महाराजांची झालेली आरती आणि त्यानंतर झालेल्या शिवघोषाच्या निनादाने संगमनेर शिवमय झाले.

आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, माजी मंत्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर बस स्थानकासमोर महाराजांचे भव्य स्मारक होणार आहे. आई तुळजाभवानीचा आशीर्वाद महाराष्ट्राला आणि महाराजांना होता. हा देखावा अत्यंत भव्य दिव्य असून आपणास सर्वांना आईचा आशीर्वाद आहे. आ. डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी ही सर्वप्रथम महात्मा फुले यांनी शोधली. महाराज हे एका जाती धर्माचे नव्हते, तर बहुजनांचे राजे होते. महाराजांचे विचार प्रेरणादायी असून सर्वांनी एकत्रित येऊन समाजासाठी काम करावे. डॉ. जयश्री थोरात म्हणाल्या की, महाराजांच्या महाराष्ट्रात सध्या शेतकरी आत्महत्या करतो आहे, महिलांची दुर्दशा आहे, तरुणांची बेरोजगारी आहे. हे अत्यंत दुर्दैवी असून आपला तालुका विचारांचा आणि परंपरेचा तालुका आहे. जपण्यासाठी सर्व तरुणांनी आता अधिक जोमाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे स्वागत शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे यांनी केले. प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष विश्वासराव मुर्तडक यांनी केले, तर युवक काँग्रेस शहराध्यक्ष निखिल पापडेजा यांनी आभार मानले. यावेळी शहरातील नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धर्मवीर संभाजी मित्र मंडळाकडून छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी




**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** धर्मवीर संभाजी मित्र मंडळाच्या वतीने गेल्या अनेक वर्षांप्रमाणे यंदाही छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी आमदार सत्यजित तांबे व नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि स्वराज्य स्थापनेतील कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमानंतर फटाक्यांची आतिषबाजी करून शिवजयंतीचा उत्सव साजरा करण्यात आला.

या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष सतीश आहेर यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. कार्यक्रमाला मंडळाचे खजिनदार विशाल रागीर, उपाध्यक्ष सुमित वाघमारे यांच्यासह मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच नगरसेवक गजानन अभंग, नितीन अभंग, शिवभक्त संतोष मुर्तडक, निखिल पापडेजा, जॅकी मिलाणी, श्याम करपे आणि परिसरातील अनेक शिवभक्त व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून मंडळाचे अध्यक्ष सतीश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंती उत्सव साजरा केला जात असून नवीन पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य व विचार समजावेत यासाठी मंडळ सातत्याने प्रयत्न करत आहे. शिवजयंती निमित्त संपूर्ण परिसरात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

# विशाल मंडलिक यांना "विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड"च्यावतीने ऑनर्स सर्टिफिकेटचे सन्मानपत्र

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** ग्लोबल शिवसृष्टी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. विशाल सुनिल मंडलिक यांनी चित्रमय शिवसृष्टी हिंदवी स्वराज्याची तेजोमय विजयगाथा या पुस्तकात शिवचरित्रातील विविध घटनांवर अनेक रंगीत प्रसंगचित्रे, विविध गडकिल्ले, समाध्या, शिवकालीन शस्त्रास्त्रे इ. ची छायाचित्रे व माहिती देऊन शिवचरित्राची ऐतिहासिक अनुभूती देणारा भारतातील एक वैशिष्टयपूर्ण चित्रमय ग्रंथराज बनविला आहे.



तसेच श्री. विशाल मंडलिक व त्यांच्या नेतृत्वाखालील टीमने देहू ते पंढरपूर संत तुकाराम महाराज पालखी सोहळा २०२४ ही पायी वारी केली. या प्रवासात संपूर्ण पंढरपूर वारीच्या काढलेल्या हजारो छायाचित्रांमधील अनेक रंगीत छायाचित्रे व वारीच्या अभ्यासपूर्ण माहितीवर आधारित पालखी फोटोबायोग्राफी ऑफ पंढरपूर वारी हा पंढरपूर वारीची अध्यात्मिक अनुभूती देणारा भारतातील वैशिष्टयपूर्ण छायाचित्रमय ग्रंथराज लेखक विशाल मंडलिक यांनी बनविला आहे.

महाराष्ट्रातील भक्ती शक्तीचे समग्र दर्शन दाखविणारे वरील दोन्ही ग्रंथ लिहिल्याबद्दल आणि पंढरपूर वारीत हजारो छायाचित्रे व व्हिडिओ काढण्याचा विक्रम केल्याबद्दल तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली २०२५ मध्ये पंढरपूर ते दिल्ली साहित्य ग्रंथदिंडी सोहळ्याचे मुख्य आयोजन केल्याबद्दल श्री. विशाल सुनिल मंडलिक यांना दिनांक २७/०२/२०२६ रोजी मराठी भाषा गौरवदिनी विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे चेअरमन मिस इंडिया डॉ. ईशा अगरवाल व १८४ वर्ल्ड रेकॉर्ड करणारे पहिले भारतीय डॉ. दिपक हरके यांच्या हस्ते पुणे येथे विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या वतीने ऑनर्स सर्टिफिकेटचे विशेष सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# घरकुल, रोजगार हमी व 'लाडकी बहीण' योजनेचे हप्ते तात्काळ द्या; अन्यथा आंदोलन – अशोक सातपुते

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** राज्य सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे लाभ लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. घरकुल योजनेचे प्रलंबित हप्ते, रोजगार हमी योजनेची थकबाकी तसेच 'लाडकी बहीण' योजनेतील अपूर्ण लाभ याबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा लाभार्थ्यांना सोबत घेऊन आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेना पक्षाचे माजी पंचायत समिती सदस्य तथा उपजिल्हाप्रमुख अशोक सातपुते यांनी दिला आहे.



याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात सातपुते यांनी पालकमंत्री, जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनंती केली आहे की, शासनाच्या विविध योजना पूर्ण क्षमतेने आणि नियोजनबद्ध राबविणे आवश्यक आहे. सध्या घरकुल योजनेअंतर्गत काही लाभार्थ्यांना पहिला हप्ता म्हणजे १५ हजार रुपये मिळाला असला तरी अनेकांना दुसरा हप्ता अद्याप मिळालेला नाही. तरीही ग्रामसेवकांकडून घरकुल बांधकाम तातडीने सुरू करा, अन्यथा घरकुल रद्द होईल किंवा पैसे परत करा, अशा नोटिसा देऊन लाभार्थ्यांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

काही गरीब लाभार्थ्यांनी कष्ट करून घरकुल पूर्ण केले आहे, तर अनेकांनी आर्थिक अडचणीमुळे काम अर्धवट ठेवले आहे. अशा परिस्थितीत शासनाने उर्वरित हप्ते तातडीने देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर अद्याप एक रुपयाही मजुरांना मिळालेला नाही. शेतकऱ्यांनी केलेले गोठे, वृक्षलागवड, घरकुल बांधकामातील कामे यांचेही पैसे प्रलंबित आहेत. वाढत्या महागाईमुळे नागरिक आधीच अडचणीत असताना योजनांचे अनुदान वेळेवर न मिळाल्याने त्यांची अडचण अधिक वाढत असल्याचेही सातपुते यांनी सांगितले.

'लाडकी बहीण' योजनेबाबतही तालुक्यात फक्त ४० ते ४५ टक्के महिलांनाच लाभ मिळत असल्याचा दावा करत त्यांनी शासनाने सर्व पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळेल यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी केली.

दरम्यान, येत्या काळात घरकुल, विमा तसेच इतर योजनांचे हप्ते लाभार्थ्यांच्या खात्यात जमा न झाल्यास शिवसेना पक्षाच्या वतीने लाभार्थ्यांना सोबत घेऊन तहसील कार्यालय, प्रांत कार्यालय आणि पंचायत समितीसमोर घंटानाद आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही अशोक सातपुते यांनी दिला आहे. या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर राहील, असे त्यांनी

# महाराजांनी स्वकर्तृत्वाने छत्रपती पद प्राप्त केले – आमदार तांबे



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** छत्रपती शिवाजी महाराजांनी बहुजन समाज तसेच अठरापगड बारा बलुतेदारांना सोबत घेऊन रयतेसाठी स्वराज्य उभे केले. बहुजनांचा राजा कसा असावा याचे आदर्श उदाहरण म्हणजे शिवाजी महाराज होय. त्यांच्या राज्याभिषेकालाही त्या काळात अनेक अडथळे निर्माण करण्यात आले होते. मात्र आपल्या कार्याच्या बळावर त्यांनी छत्रपती पद प्राप्त करुन इतिहासात अजरामर स्थान मिळविले. चारशे वर्षांनंतरही देशभरात प्रथम क्रमांकाने उच्चारले जाणारे नाव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज असून त्यांचे विचार आजही प्रेरणा देणारे आहेत, असे मत आमदार सत्यजीत तांबे यांनी व्यक्त केले.

यावेळी माजी शहर प्रमुख तसेच होय हिंदू ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र कानकाटे यांनी सांगितले की, गेल्या शिवजयंतीनिमित्त सतराअठरा दुग्धाभिषेकाची वर्षांपासून परंपरा अखंडितपणे सुरु असून छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य व विचार हेच आमच्यासाठी प्रेरणास्थान आहेत. कार्यक्रमाला संपर्क प्रमुख दिलीप साळगट, जिल्हा प्रमुख अमीत चव्हाण, माजी नगरसेवक कैलास वाघचौरे, विनायक गरुडकर, कैलास गायके आदी मान्यवर उपस्थित होते.

# संपादकीय...

## रंगांच्या उत्सवातून सामाजिक एकात्मतेचा संदेश

भारतीय संस्कृतीत सण-उत्सवांना केवळ धार्मिक परंपरा म्हणून पाहिले जात नाही, तर ते समाजातील एकोपा, आनंद आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानले जातात. अशाच उत्साहाने साजरा केला जाणारा सण म्हणजे रंगपंचमी. फाल्गुन महिन्यातील होळीच्या पाचव्या दिवशी रंगपंचमी साजरी केली जाते. या दिवशी रंगांची उधळण करून आनंद व्यक्त केला जातो. रंगांच्या या उत्सवामध्ये केवळ खेळकरपणा नसून समाजातील भेदभाव दूर करून एकात्मतेचा संदेश देण्याची परंपरा आहे. रंगपंचमीचा उगम भारतीय परंपरेत अत्यंत प्राचीन मानला जातो. होळीच्या दिवशी वाईट प्रवृत्तींचा नाश आणि चांगुलपणाचा विजय याचे प्रतीक म्हणून होलिका दहन केले जाते. त्यानंतर पाच दिवसांनी रंगपंचमी साजरी केली जाते. या दिवशी एकमेकांना रंग लावून आनंद साजरा केला जातो. प्राचीन काळापासून रंगांच्या माध्यमातून मैत्री, प्रेम आणि बंधुभाव व्यक्त करण्याची ही परंपरा चालत आलेली आहे. समाजातील सर्व स्तरातील लोक या दिवशी एकत्र येऊन आनंदाने रंग खेळतात. महाराष्ट्रात रंगपंचमीला विशेष महत्त्व आहे. अनेक गावांमध्ये आणि शहरांमध्ये या दिवशी रंगांची उधळण, ढोल-ताशांचे कार्यक्रम आणि विविध सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले जातात. विशेषतः तरुणाईमध्ये या सणाबद्दल प्रचंड उत्साह दिसून येतो. मित्रमंडळी, कुटुंबीय आणि शेजारीपाजारी एकत्र येऊन रंगांची उधळण करतात. त्यामुळे समाजात एकात्मतेचे वातावरण निर्माण होते. रंगपंचमी हा केवळ रंगांचा सण नाही, तर तो मानवी जीवनातील सकारात्मकतेचे प्रतीक आहे. रंगांचे मानसशास्त्रीय महत्त्वही मोठे आहे. विविध रंग मानवाच्या मनावर वेगवेगळा परिणाम करतात. लाल रंग उत्साह आणि ऊर्जा देतो, पिवळा रंग आनंद आणि आशावाद निर्माण करतो, तर हिरवा रंग शांतता आणि समतोलाचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे रंगांच्या माध्यमातून आनंद आणि सकारात्मकता पसरविण्याची परंपरा भारतीय संस्कृतीने जपली आहे. पूर्वीच्या काळात रंगपंचमी नैसर्गिक रंगांद्वारे साजरी केली जात असे. फुलांपासून, औषधी वनस्पतींपासून आणि नैसर्गिक पदार्थांपासून रंग तयार केले जात. त्यामुळे आरोग्याला कोणताही अपाय होत नसे. परंतु आधुनिक काळात रासायनिक रंगांचा वापर वाढल्यामुळे त्वचेचे विकार, डोळ्यांचे आजार आणि पर्यावरणाचे नुकसान होण्याची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे सध्याच्या काळात रंगपंचमी साजरी करताना पर्यावरणपूरक आणि सुरक्षित रंगांचा वापर करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. रंगपंचमीच्या निमित्ताने समाजातील मतभेद विसरून एकमेकांशी मैत्रीचे नाते दृढ करण्याची संधी मिळते. अनेकदा दैनंदिन जीवनातील तणाव, स्पर्धा आणि मतभेद यामुळे लोकांमध्ये दुरावा निर्माण होतो. अशा वेळी सण-उत्सव समाजाला पुन्हा एकत्र आणण्याचे काम करतात. रंगपंचमीच्या दिवशी लोक एकमेकांना रंग लावून आनंद व्यक्त करतात आणि भूतकाळातील कटुता विसरण्याचा प्रयत्न करतात. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात सण-उत्सवांचे महत्त्व अधिक वाढले आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे माणूस अधिक व्यस्त झाला आहे, परंतु त्याचवेळी मानवी संबंधांमध्ये दुरावा वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत रंगपंचमीसारखे सण समाजाला एकत्र आणण्याचे आणि आनंदाचे क्षण निर्माण करण्याचे कार्य करतात. कुटुंबातील सदस्य, मित्र आणि समाजातील लोक एकत्र येऊन सण साजरा करतात, त्यामुळे सामाजिक बंध अधिक मजबूत होतात. रंगपंचमी साजरी करताना काही गोष्टींची काळजी घेणे देखील आवश्यक आहे. जबरदस्तीने कोणालाही रंग लावणे टाळावे, लहान मुलांच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी आणि पाण्याचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच पर्यावरणपूरक रंगांचा वापर करून हा सण साजरा केल्यास आरोग्य आणि पर्यावरण दोन्ही सुरक्षित राहतील. भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सणामागे एक सकारात्मक संदेश दडलेला आहे. रंगपंचमी हा सणही आनंद, मैत्री, बंधुभाव आणि एकात्मतेचा संदेश देतो. रंगांच्या या उत्सवातून जीवनात आनंद, उत्साह आणि सकारात्मकता निर्माण करण्याची प्रेरणा मिळते. म्हणूनच रंगपंचमी हा केवळ रंगांचा सण नसून समाजातील नातेसंबंध अधिक दृढ करणारा आणि जीवनाला नवचैतन्य देणारा एक महत्त्वाचा सांस्कृतिक उत्सव आहे.

---

CorelDRAW Ps Ai Id

WE ARE HIRING
JOIN OUR TEAM

GRAPHIC DESIGNER

Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

---

**महाराष्ट्र शासन**
जलसंपदा विभाग
कार्यकारी अभियंता,
कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१.
नारायणगाव, ता. जुन्नर, जि.पुणे

ई-मेल पत्ता:- eekid1narayangaongmail.com — दूरध्वनी क्र. ०२१३२-२४२०१६

### ई- निविदा सूचना क्र. २१ सन २०२५-२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१. नारायणगाव, ता. जुन्नर, जि.पुणे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निवीदाकारांकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निवीदा सूचना व ई-निवीदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आह

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१. नारायणगाव, ता. जुन्नर, जि.पुणे यांनी राखून ठेवला आहे, अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निवीदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल,

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत (रु.) |
|---|---|---|
| १ | कुकडी सिंचन शाखा निघोज वसाहती मधील विश्रामगृहाचे नुतनीकरण करणे. | १६,९८,१०१/- |

१) ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ०९/०३/२०२६ ते १६/०३/२०२६
२) ई-निविदा उघडणे :- दिनांक १८/०३/२०२६ रोजी शक्य असल्यास किवा त्यापुढे

जा.क्र. कुपावि-१/लेशा/निविदा/७९७/२०२६
कुकडी पाटबंधारे विभाग क्र. १, नारायणगाव,
ता. जुन्नर, जि. पुणे, दि. २५/०२/२०२६

जिमाका/नगर/जाहि/२८४/२०२६

**(जी. बी. नान्नोर)**
कार्यकारी अभियंता
कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१,
नारायणगाव

---

## कर्जत व जामखेड तालुक्यातील चार धार्मिक स्थळांना ‘ ब ’ वर्गाचा दर्जा

**अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)–** शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील चार धार्मिक स्थळांना ‘ब’ वर्गाचा दर्जा देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे हा निर्णय घेण्यात आला असून यामुळे या ठिकाणांच्या विकासाला अधिक गती मिळणार आहे.

शासनाच्या ग्रामविकास विभागाने ५ मार्च २०२६ रोजी याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयानुसार कर्जत तालुक्यातील श्री खंडोबा देवस्थान, शेगुड, श्री लालगिर बुवा मठ ट्रस्ट, मांदळी, तसेच श्री क्षेत्र जगदंबा मंदिर देवस्थान, कुलधरण आणि जामखेड तालुक्यातील श्री जवळेश्वर देवस्थान, जवळा या यात्रास्थळांना ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत ‘ब’वर्गाचा दर्जा देण्यात आला आहे.

या दर्जामुळे संबंधित यात्रास्थळांच्या परिसरात मूलभूत सुविधा, रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, सुशोभीकरण यासह इतर विकासकामांसाठी निधी उपलब्ध होणार असून भाविकांना अधिक चांगल्या सुविधा मिळणार आहेत.

प्रा. राम शिंदे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या धार्मिक स्थळांच्या विकासासाठी शासनस्तरावर महत्त्वाचा निर्णय झाला असून स्थानिक नागरिक व भाविकांमध्ये या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

---

READ E- NEWS ON
Yuvavarta.in

---

**कासारे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि.**
**कासारे ता. संगमनेर, जि. अहमदनगर**

**निविदा सुचना**

कासारे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. कासारे ता. संगमनेर, जि. अहमदनगर चेअरमन /व्हा. चेअरमन/ सचिव कासारे सोसायटी हे निर्देशित केलेल्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार /पुरवठादार यांच्याकडुन जाहिररित्या उल्लेखित कामासाठी सिलबंद निविदा दरपत्रके मागवित आहेत.

| कामाचे नाव | निविदा रक्कम | बयाना रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| मौजे कासारे येथील सोसायटी इमारत बांधकाम करणे | ३७.७० लाख | ५० हजार | ९ महिने | मजुर संस्था |

कोरी निविदा किमंत हि सर्व कामासाठी ३५०० रु. असेल.
१) निविदा फाईल व माहीती पत्रक दि. ०९/०३/२०२६ ते १८/०३/२०२६ (शासकिय सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत कासारे सोसायटी कार्यालय लोहारे येथे कार्यालयीन वेळेत मिळेल २) सीलबंद निविदा दिनांक १८/०३/२०२६ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. ३) निविदा उघडण्याची दिनांक वेळ व ठिकाण हे निविदा सादर करणारास फोनवर कळविण्यात येइल. ४) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार चेअरमन / व्हा चेअरमन यांनी राखुन ठेवलेला आहे. ५) सदर निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द अथवा सुरु ठेवण्याचा संपुर्ण अधिकार चेअरमन व्हा चेअरमन यांनी राखुन ठेवलेला आहे.

**सचिव**
**कासारे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. कासारे**

**चेअरमन**
**कासारे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. कासारे**

---

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर
स्टोअर मॅनेजर
फ्लोअर मॅनेजर
हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ | १२ ते ९
9511238422

---

**NAME CHANGE**
I. **MOINUDDIN HUSANODDIN SHAIKH** DECLARED THAT I HAVE CHANGED MY OLD NAME FOR PASSPORT PURPOSE, **MOYODDIN HUSANODDIN SHAIKH** CHANGE TO NEW NAME AS - **MOINUDDIN HUSANODDIN SHAIKH** ADDRESS - JUNA JORVE ROAD. JAM JAM COLONY, ALKA NAGAR, SANGAMNER, AHMEDNAGAR (MH)PIN-422605

**NAME CHANGE**
I, **NAJMABI CHAND MISTARI** DECLARED THAT I HAVE CHANGED MY OLD NAME FOR PASSPORT PURPOSE(BEFORE MARRIAGE)OLD NAME: **NAJMUNNISA CHANDBHAI PATHAN** CHANGE TO (AFTER MARRIAGE)NEW NAME AS **NAJMABI CHAND MISTARI** ADDRESS - MALIWADA, A/P. SAKUR TAL. SANGAMNER, AHMEDNAGAR (MH)PIN-422622

**NAME CHANGE**
I. **Munnabi Ismail Shaikh** declared that I have changed My Old Name for Passport Purpose(Before Marriage) Old Name: **Munnabai Abbas Mistari** change to (After Marriage) New Name as **Munnabi Ismail Shaikh** Address -Ban Mala. Post. Sakur Tal. Sangamner, Ahmednagar (MH) Pin-422622

---

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397

---

**पाहिजेत**
नामांकित साऊथ इंडीयन कॅफेसाठी
कॅशियर | हेल्पर
साऊथ इंडीयन कुक
१ ते २ वर्षांचा कामाचा अनुभव आवश्यक
संगमनेर
9518722868

---

**पाहिजेत**
अकाऊंटट - २ जागा
( टॅली कोर्स )
ड्रायव्हर - ३ जागा
संपर्क – डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर
9370071717
9822791484

---

**पाहिजेत**
अनुभवी व गरजू
साईट सुपरवायझर
साईट इंजिनियर
१ ते २ वर्षांचा अनुभव आवश्यक
चिंतामणी डेव्हलपर्स, संगमनेर
7741057560

---

**पाहिजेत**
होलसेल दुकानासाठी मुले/ मुली पाहिजेत
अनुभवास प्राधान्य
हेल्पर – २
सेल्समन – २
7020585298
9422905155

---

**पाहिजेत**
कन्स्ट्रक्शन सुपरवाईजर
डिप्लोमा/ डिग्री इंजिनिअर
अनुभवास प्राधान्य
संपर्क - करवा एजन्सीज बस स्टँड मागे, संगमनेर
9422762700

---

**बौद्ध वधू पाहिजे**
वर वय ३७, प्रोफेसर, गोरा, उंच आकर्षक व्यक्तीमत्व, घटस्फोटीत (अपत्य नाही)
अपेक्षा - अविवाहित वधुला प्राधान्य, विवाहित (अपत्य नसलेली) गृहिणी धार्मिक शाकाहारी, जातीची अट नाही.
अनुरूप पाहिजे
9922221693
घुलेवाडी, ता. संगमनेर

---

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

---

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसिन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

---

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

त्वरीत पाहिजेत
सेल्सपर्सन ०६ जागा
(अनुभवी पुरुष / महिला) आकर्षक पगार व सवलती
संपर्क - 75882 49849, 9860444881
जानकीराम गंगाधर काजळे (ज्वेलर्स)
मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर, ०२४२५, ७५८८२४९८४९

---

सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर,
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील **जागा भरणे आहे**
सेल्स एक्झीक्युटिव -१ (एमबीए असल्यास प्राधान्य)
ऑफिस असिस्टंट -१ (कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक)
कार ड्रायव्हर - १ (अनुभव असल्यास प्राधान्य)
घरकाम करणारी महिला- १ (सर्व घरकाम)
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

---

**पाहिजेत** सह्याद्री अॅग्रोव्हेट कंपनीसाठी
मशीन ऑपरेटर/ हेल्पर नेमणे आहे
वेतन – २०,००० ते २५,०००
शिक्षणाची अट नाही
२ वेळा अल्पोपहाराची सोय
PF आणि ESIC सुविधांसह
पत्ता– प्लॉट नं. ४२, औद्योगिक वसाहत, पाण्याच्या टाकी जवळ, संगमनेर, एम.आय.डी.सी.
संपर्क - 8484046463, 9527426464

---

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

---

**पाहिजेत**
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

---

**सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्सकरिता पाहिजेत**
सेल्स पर्सन - १० पदे
१ ते २ वर्षांचा ज्वेलरी/रिटेल क्षेत्रातील अनुभव
शिक्षण - १२ वी उत्तीर्ण
8237510210
9890499699

---

**ड्रायव्हर पाहिजे**
घरगुती ऑटोमॅटिक गाडीवर निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

---

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१
अॅडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटट - ०१
टॅलीचे ज्ञान आवश्यक
किमान ०१ वर्षाचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

---

**ड्रायव्हर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे
पत्ता– मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

---

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

---

**अभय ट्रेडिंग कंपनी करिता त्वरीत पाहिजे**
कॉम्प्युटर ऑपरेटर – ०२
सेल्समन – ०२
ड्रायव्हर – ०२
दुकान काम व शोरुमसाठी – ०२ जागा
महिला कामगार – ०२
9822097904

---




---

MALPANI
卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित

**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर

- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

**सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा**

नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक

**विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!**

संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर

श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

---

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन ........ 05
सेल्सगर्ल........ 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........ 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# संगमनेरचा डंका; ऋतूजा गायकवाड आयएएस तर धनंजय दिघे आयपीएस अधिकारी निवड





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- केंद्रीय लोकसेवा आयोगाने (युपीएससी) शुक्रवारी नागरी सेवा परिक्षेचा निकाल जाहीर केला. या निकालात संगमनेर तालुक्याचा डंका वाजला असून तालुक्यातील नान्नज दुमाला येथील ऋतुजा गायकवाड यांनी १०६ वी रँक मिळवत तालुक्यातील पहिली महिला आयएएस होण्याचा मान मिळवला आहे. तर तालुक्यातील जोर्वे येथील शेतकऱ्याचा मुलगा असलेला धनंजय दिघे यांनी ५२९ वी रँक मिळवत आयपीएस होण्याचा मान मिळवला आहे. या यशाबद्दल दोघांचेही विविध स्थरातून अभिनंदन होत आहे.

तालुक्यातील नान्नज दुमाला येथील प्राथमिक शिक्षक अशोक गायकवाड यांची कन्या ऋतुजा गायकवाड हिने जिल्हाधिकारी पदाला गवसणी घातली आहे. तिचे हे यश ग्रामीण भागातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. ऋतुजा गायकवाड हिने कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत १०६ वी रँक मिळवत जिल्हाधिकारी पदाला गवसणी घातली आहे. लहानपणापासून अभ्यासू आणि मेहनती असलेल्या ऋतुजांने शिक्षणात सातत्याने उत्तम यश मिळवले. वडील शिक्षक असल्यामुळे घरातच शिक्षणाचे वातावरण मिळाले.

त्याच प्रेरणेतून तिने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवली. अनेक अडचणीवर मात करत तिने अखेर हे पद मिळवून आपल्या कष्टाचे चीज केले. प्रा. गुलाब गायकवाड, मनीषा गायकवाड, प्रा. दिलीप गायकवाड, केंद्रप्रमुख यु.के गायकवाड, बाजीराव गायकवाड, विठ्ठल गायकवाड, बाबासाहेब गायकवाड, मच्छिंद्र गायकवाड या सर्व शिक्षकांची ऋतुजा ही पुतणी आहे.

तसेच जोर्वे गावातील प्रगतशील शेतकरी संजय रावसाहेब दिघे यांचे चिरंजीव धनंजय दिघे यांनी लोकसेवा आयोग परीक्षेत ५२९ वा रँक मिळवून भारतीय पोलिस सेवा अधिकारी होण्याचा मान मिळवला आहे. धनंजय संजय दिघे यांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन करत आपल्या कुटुंबाचा, जोर्वे गावाचा आणि संगमनेर तालुक्याचा लौकिक उंचावला आहे.

उच्चशिक्षित असूनही शेतीशी नाळ जपणारे आणि शेतीत नवनवीन प्रयोग करणारे प्रगतिशील शेतकरी संजय दिघे यांनी आपल्या मुलाला दिलेले संस्कार आणि शिक्षण या यशाच्या रूपाने फळाला आले आहे ही खरोखरच अभिमानाची बाब आहे. ऋतूजा गायकवाड व धनंजय दिघे या दोघांचेही दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने अभिनंदन

# सरकारी मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय मागे घ्या : छात्रभारतीचा इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यात कमी पटसंख्येचे कारण देत सरकारी मराठी शाळा बंद करण्याच्या निर्णयाविरोधात छात्रभारतीच्या वतीने संगमनेर बस स्थानक समोर निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी शासनाने घेतलेल्या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले. विधानसभेच्या अधिवेशनादरम्यान शालेय शिक्षण मंत्र्यांनी राज्यातील २५८ शाळा बंद करण्याबाबत माहिती दिली होती. या पार्श्वभूमीवर छात्र भारतीने हा निर्णय अन्यायकारक व विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणारा आहे.सरकारी शाळांमध्ये प्रामुख्याने गोरगरीब, दलित, आदिवासी व वंचित समाजघटकांतील विद्यार्थी शिक्षण घेतात. खाजगी शिक्षणाचा वाढता खर्च सर्वसामान्य कुटुंबांना परवडणारा नाही.ही वस्तुस्थिती असताना शाळा बंद करण्याचा निर्णय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर ढकलणारा ठरेल.

अनेक ठिकाणी सरकारी शाळांची अवस्था दयनीय असून पायाभूत सुविधा, शिक्षकांची कमतरता, शैक्षणिक साधनांची अनुपलब्धता या समस्या गंभीर आहेत. मात्र या समस्या सोडविण्याऐवजी शाळा बंद करणे हा पर्याय चुकीचा असल्याचे छात्र भारतीने स्पष्ट केले. मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अन्यथा छात्रभारतीच्या वतीने महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

या आंदोलनात अनिकेत घुले (राज्याध्यक्ष), विशाल शिंदे (राज्य संघटक), छात्रभारतीचे संगमनेरचे अध्यक्ष मोहम्मद तांबोळी, यश सानप, साई वर्पे, ऋतिक जोंधळे, सोहम घुले अनिकेत खरात, अभिषेक वैराळ, मसिरा तांबोळी, वैष्णवी सोनुले, पायल कानवडे, भरत सोनवणे, किरण मेढे, अपेक्षा हांडे, खरात अनुष्का, आकांशा जमधडे, प्रणाली फटांगरे, आरती क्षीरसागर, स्नेहा शिरसाठ, सुरज पवार, मयूर घुले, दत्ता ढगे, रजत अवसक, राम अरगडे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

## फेरीवाल्यांना न्याय, नागरीकांना ...

पान १ वरून -

वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्यास कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. शहर प्रशासन अधिक पारदर्शक व वेगवान करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असून, संगमनेर नगरपालिकेचे नवीन मोबाईल ॲप सुरू करण्यात आले आहे. या पद्धारे नागरिकांना त्यांच्या परिसरातील समस्या व तक्रारी थेट नगरपालिकेकडे नोंदवता येणार आहेत. रस्त्यांवरील खड्डे, पाणीपुरवठा, स्वच्छता, लाईट व्यवस्था आदी समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे तांबे यांनी सांगितले. नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांनी सांगितले की, शहराच्या विकासासाठी निधीची गरज लक्षात घेऊन त्यांनी स्वत:चे मानधन नाकारण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच सर्व नगरसेवकांनीही शहराच्या हितासाठी मानधन न घेण्याचा विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी संगमनेर परिसरातील रेल्वे प्रकल्पाच्या विषयावरही चर्चा झाली. या भागाच्या विकासासाठी रेल्वे सुविधा अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत, भविष्यात रेल्वे प्रकल्पांसाठी राज्य व केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला जाणार असल्याचे आमदार तांबे यांनी स्पष्ट केले. रेल्वे सुविधा उपलब्ध झाल्यास व्यापार, उद्योग आणि रोजगाराच्या संधींना मोठी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. एकूणच, संगमनेर शहराचा सर्वांगीण विकास, पारदर्शक प्रशासन आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग या तीन बाबींवर भर देत पुढील काळात काम करण्याचा संकल्प या पत्रकार परिषदेत व्यक्त करण्यात आला.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालय समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका!
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
❊ कर्ज रक्कम वाढ | ❊ कर्ज व्याजदर कमी | ❊ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
• 24x7 Technician
• One Time Blood Tubing Use
• Modern Dialysis Centre
• Nephrologist, AVF Surgery
• Renal Dialysis
• Dialysis Catheter Insertion
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ञ) MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४०६२ ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) अपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
तुमच्या सौंदर्याला उठाव देणारी
नवे सेल होलसेल सेल
लेडीज वेअर
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय रोग परिहाराय
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25



# सेवा, समर्पण आणि संवेदनशीलतेची प्रेरणादायी यशोगाथा - डॉ. उज्वला जठार



जागतिक महिला दिन हा केवळ शुभेच्छांचा दिवस नाही, तर कर्तृत्व, जिद्द आणि समर्पण यांना मानाचा मुजरा करण्याचा दिवस आहे. अशा वेळी संगमनेरच्या वैद्यकीय क्षेत्रात आपली वेगळी आणि भक्कम ओळख निर्माण करणाऱ्या डॉ. उज्वला जठार यांचे नाव आदराने घ्यावे लागते. गेल्या २२ वर्षांपासून बालरोग तज्ञ म्हणून त्या बालकांच्या आरोग्यासाठी झटत आहेत. त्यांच्या कुशल उपचारांमुळे अनेक बालकांना नवजीवन मिळाले आहे. केवळ आजारांवर उपचार करणे इतक्यावरच त्यांचे कार्य मर्यादित नाही; तर मुलांचे पोषण, मानसिक व शारीरिक विकास, पालकांचे मार्गदर्शन यावरही त्या तितक्याच आत्मीयतेने लक्ष देतात.

**सेवा आणि व्यवस्थापन यांचा सुंदर संगम**

डॉ. जठार यांच्या चैतन्य हॉस्पिटल या रुग्णालयाच्या माध्यमातून त्या केवळ डॉक्टर म्हणूनच नव्हे, तर एक सक्षम प्रशासक म्हणूनही काम पाहतात. पती डॉ. नितीन जठार यांच्या साथीने त्या संपूर्ण रुग्णालय व्यवस्थापनाची धुरा समर्थपणे सांभाळत आहेत.

रुग्णालयात अद्ययावत सुविधा उपलब्ध करून देण्यामागे त्यांची दूरदृष्टी स्पष्ट दिसते. आधुनिक ऑपरेशन थिएटर, व्हेंटिलेटर, डिफिब्रिलेटर, बायपॅप, हाय-फ्लो ऑक्सिजन प्रणाली, डायलेसिस मशीन यांसारखी आधुनिक उपकरणे उपलब्ध करून त्यांनी संगमनेर आणि परिसरातील रुग्णांना मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागू नये, त्यांना आर्थिक व मानसिक त्रास होऊ नये याची काळजी घेतली आहे.

ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव ठेवून माफक दरात दर्जेदार उपचार देण्यावर त्यांचा विशेष भर असतो.

**शासकीय योजनांचा प्रभावी वापर**

रुग्णांना आर्थिक दिलासा मिळावा यासाठी रुग्णालयात विविध शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध आहे, जसे -महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, पंतप्रधान आयुष्मान भारत योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर वैद्यकीय आर्थिक सहायता योजना, विविध आरोग्य विमा योजना व कॅशलेस उपचार सुविधा या सर्व योजनांचा लाभ प्रत्येक पात्र रुग्णापर्यंत पोहोचावा, यासाठी त्या स्वतः बारकाईने लक्ष ठेवतात.

डॉ. जठार यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची मृदू भाषा, आत्मीय संवाद आणि पालकांना धीर देण्याची शैली. लहान मुलांशी संवाद साधताना त्यांची आपुलकी स्पष्ट जाणवते. रुग्णालयातील डॉक्टर, नर्स, स्वच्छता कर्मचारी, प्रशासन अधिकारी यांच्यात समन्वय राहावा, सर्वांनी एक कुटुंब म्हणून काम करावे यासाठी त्या सातत्याने प्रेरणा देतात. विशेषतः महिला कर्मचाऱ्यांना काम करताना कोणतीही अडचण येऊ नये, त्यांच्यावर अनावश्यक ताण पडू नये याची त्या एक महिला म्हणून विशेष काळजी घेतात.

वैद्यकीय क्षेत्रासारख्या आव्हानात्मक क्षेत्रात काम करत असताना त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. कर्तृत्व, संवेदनशीलता आणि व्यवस्थापन कौशल्य यांचा सुंदर संगम म्हणजे डॉ. उज्वला जठार. आज संगमनेरकरांसाठी चैतन्य हॉस्पिटल हे केवळ रुग्णालय नाही, तर एक विश्वासाचे आणि आरोग्याचे आधारकेंद्र बनले आहे आणि त्या विश्वासामागे डॉ. जठार यांचे अथक परिश्रम आणि समर्पण आहे. महिला दिनाच्या निमित्ताने, केवळ स्तुतीपर शब्द न वापरता, समाजासाठी झटणाऱ्या अशा कर्तृत्ववान महिलांच्या कार्याची दखल घेणे हीच खरी त्यांच्याप्रती कृतज्ञता ठरेल.

डॉ. उज्वला जठार यांची ही यशोगाथा प्रत्येक तरुणीला सांगते की... स्वप्न पाहा, जिद्दीने काम करा आणि समाजासाठी काहीतरी अर्थपूर्ण घडवा! स्वप्नांचा पाठपुरावा करताना प्रसंगी येणाऱ्या आव्हानांचा सामना करण्याची जिद्द ठेवा. आपल्या देशाला अनेक कर्तृत्ववान महिलांचा इतिहास आहे, त्यागाचा इतिहास आहे. या महिलांचा आदर्श हीच आपल्या सोबत मोठी शिदोरी आहे.

डॉक्टर जठार दाम्पत्यांनी रुग्णसेवेचा वारसा जपत प्रामाणिक आरोग्य सेवा दिली. डॉ. उज्वला जठार यांनी हॉस्पिटलची जबाबदारी पार पाडत असताना कुटुंबाकडे देखील तेवढेच लक्ष दिले. त्यामुळेच आज त्यांची मुलगी रावी व मुलगा निमेश हे उच्च वैद्यकीय शिक्षण घेत असून ते देखील लवकरच हा जनसेवेचा वारसा पुढे चालवतील यात शंका नाही.

विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या आणि क्षितिजापलिकडे झेप घेऊ पहाणाऱ्या सर्व धाडसी महिलांना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!




## उद्योजक आणि तरुणांमध्ये नोकरीच्या संधीचा पूल उभारणाऱ्या - पूनम सागर हासे



संगमनेरमध्ये अकाउंटिंग आणि टॅक्सेशन क्षेत्रात विश्वासार्ह नाव म्हणून ओळखली जाणारी SLH Advisors Pvt Ltd ही कंपनी मागील सुमारे १७ वर्षांपासून यशस्वीपणे कार्यरत आहे. या कंपनीच्या डायरेक्टर Poonam Sagar Hase यांनी व्यवसायासोबतच समाजाभिमुख उपक्रम राबवत स्थानिक तरुणांना करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे.

संगमनेर परिसरातील अनेक उद्योगपतींची एक तक्रार वारंवार ऐकायला मिळत होती. व्यवसाय वाढत असताना कुशल आणि प्रत्यक्ष अनुभव असलेले अकाउंटंट मिळणे कठीण जात होते. दुसरीकडे बी.कॉम, एम.कॉम, एमबीए किंवा इतर वाणिज्य शाखेतील विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून बाहेर पडत होते, परंतु प्रत्यक्ष उद्योगातील Accounting Taxation कामाचा अनुभव नसल्यामुळे त्यांना चांगली नोकरी मिळण्यात अडचणी येत होत्या. याच समस्येवर उपाय म्हणून पूनम हासे यांनी एक दूरदृष्टीपूर्ण उपक्रम सुरू केला. उद्योजक आणि पदवीधर विद्यार्थी यांच्यामध्ये एक मजबूत पूल निर्माण करण्याच्या उद्देशाने डज्ञळश्रश्र चरीीं हा प्रकल्प सुरू करण्यात आला.

या प्रकल्पांतर्गत तीन महिन्यांचा प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स तयार करण्यात आला आहे. या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना टॅलीमध्ये अकाउंटिंग करणे, जीएसटी रिटर्न फाइल करणे, जीएसटी रजिस्ट्रेशन प्रक्रिया, इनकम टॅक्स कॅल्क्युलेशन, बँक रीकन्सिलिएशन, बँक कॅश क्रेडिटसाठी लागणारे डॉक्युमेंटेशन तयार करणे यांसारख्या उद्योगात प्रत्यक्ष वापरल्या जाणाऱ्या कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते.

या प्रशिक्षणाची एक विशेष बाब म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान देण्यावर भर नसून त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव दिला जातो. SLH Advisors Pvt Ltd या कंपनीकडे १२०० पेक्षा अधिक क्लायंट्स असून कंपनीमध्ये ३० पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. या कंपनीमध्ये जीएसटी, इनकम टॅक्स, अकाउंटिंग, रिटर्न फाइलिंग आणि विविध टॅक्सेशन संबंधित कामे नियमितपणे चालतात. या प्रत्यक्ष कामांवर Skill Mart मधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी दिली जाते. त्यामुळे त्यांना उद्योगातील वास्तविक कामाचा अनुभव मिळतो आणि ते अधिक सक्षम अकाउंटंट म्हणून तयार होतात.

या उपक्रमातून आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे आणि त्यापैकी अनेकांची विविध कंपन्यांमध्ये नोकरीसाठी निवड झाली आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या प्रकल्पातून नोकरी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये महिलांची संख्या लक्षणीय प्रमाणात अधिक आहे. त्यामुळे अनेक महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याची आणि व्यावसायिक क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करण्याची संधी मिळाली आहे. नोकरी मिळाल्यानंतरही या विद्यार्थ्यांशी संपर्क कायम ठेवून त्यांना काम करताना येणाऱ्या अडचणींवर मार्गदर्शन दिले जाते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते आपल्या क्षेत्रात अधिक प्रगती करू शकतात.

संगमनेर सारख्या शहरात उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आणि तरुणांना योग्य कौशल्यांसह रोजगाराच्या संधी मिळवून देणे, या दोन्ही गोष्टी साध्य करणारा हा उपक्रम ठरला आहे. पूनम सागर हासे यांनी दाखवून दिले आहे की उद्योजकता ही केवळ व्यवसायापुरती मर्यादित नसून समाजाच्या विकासाशी जोडलेली असू शकते.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त अशा प्रेरणादायी कार्यासाठी पूनम सागर हासे यांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांच्या या उपक्रमातून अनेक तरुण आणि विशेषतः महिलांना नव्या संधी मिळत राहोत, हीच अपेक्षा.

## दांपत्याला लग्नाच्या ८ वर्षांनंतर नैसर्गिक उपचारातून कन्यारत्न

# डॉ. श्रद्धा वाणी यांचे यश; महिला दिनाच्या निमित्ताने वाणी हॉस्पिटलमध्ये मुलीच्या जन्माचे उत्साहात स्वागत





आजच्या स्पर्धात्मक युगात महिलांचे शिक्षण, करिअर आणि स्वप्नांची उंच भरारी हे अत्यंत सकारात्मक चित्र आहे. मात्र या धावपळीच्या जीवनशैलीमुळे आरोग्याच्या काही गंभीर समस्या निर्माण होत असल्याचेही दिसून येत आहे. उशिरा होणारे विवाह, करिअरच्या धावपळीत पुढे ढकलले जाणारे कुटुंब नियोजन, त्यासोबतच प्रोसेस्ड फूड, फास्ट फूड, व्यायामाचा अभाव, वाढता ताणतणाव आणि अपुरी झोप यामुळे महिलांमध्ये पाळीचे विकार, पीसीओडी, वाढते वजन तसेच गर्भाशय, पोट आणि स्तनातील गाठी यांसारख्या समस्या वाढताना दिसत आहेत. परिणामी स्त्री वंध्यत्वाचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढत आहे.

अशाच परिस्थितीत मनोली (ता. संगमनेर) येथील शिंदे दांपत्याला लग्नानंतर तब्बल आठ वर्षे अपत्यप्राप्ती झाली नव्हती. अनेक ठिकाणी उपचार घेतले, आययूआय व आयव्हीएफसारख्या आधुनिक पद्धतींचाही अवलंब केला; मात्र अपेक्षित यश मिळाले नाही. अखेर इतर रुग्णांच्या सल्ल्यानुसार त्यांनी संगमनेर येथील नवीन नगर रोडवरील वाणी हॉस्पिटल येथे स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. श्रद्धा वाणी यांच्याकडे उपचार सुरू केले. डॉ. वाणी यांनी आवश्यक तपासण्या करून रुग्णाला नैसर्गिक उपचार पद्धतीसोबत आयुर्वेदिक पंचकर्म उपचार दिले. या उपचारांना अवघ्या एका महिन्यातच सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि रुग्णाला गर्भधारणा झाली. पुढील नऊ महिने नियमित वैद्यकीय मार्गदर्शनाखाली उपचार सुरू ठेवण्यात आले. अखेर ६ मार्च २०२६ रोजी वाणी हॉस्पिटलमध्ये या दांपत्याला गोंडस कन्यारत्नाची प्राप्ती झाली. विशेष म्हणजे जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या कन्यारत्नाच्या जन्माचे कुटुंबीयांसह वाणी हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनीही मोठ्या आनंदात स्वागत केले. मुलीच्या जन्माचा आनंद साजरा करताना महिला सशक्तीकरणाचा संदेश देण्यात आला.

यावेळी डॉ. श्रद्धा वाणी यांनी महिलांना महत्त्वाचा संदेश देताना सांगितले की, 'मुलगी शिकली, प्रगती झाली' हे जितके खरे आहे, तितकेच करिअरसोबत योग्य वयात विवाह आणि योग्य वयात गर्भधारणा यालाही महिलांनी प्राधान्य देणे तितकेच आवश्यक आहे.

**महिला दिनानिमित्त डॉ. श्रद्धा वाणी यांचा महिलांसाठी आरोग्य सल्ला**

महिलांनी निरोगी आणि संतुलित आयुष्य जगण्यासाठी खालील गोष्टींची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे :

* वजन नियंत्रणात ठेवा : घरचे, सेंद्रिय आणि पौष्टिक अन्न खा. बाहेरील तळलेले, फ्रोजन, अतिमसालेदार, जंक फूड, पॅकेज्ड पदार्थ आणि कोल्ड ड्रिंक टाळा.
* संतुलित आहार घ्या : कमी जीआय, जास्त फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजांनी युक्त आहार घ्या. अनावश्यक उपवास टाळा; फळे व फलाहाराचा समावेश करा.
* ताणतणावावर नियंत्रण ठेवा : योगासने, प्राणायाम आणि ध्यान (मेडिटेशन) केल्याने शरीरातील कॉर्टिसॉलचे प्रमाण कमी होते.
* आनंदी राहा : मैत्रिणींसोबत भेटीगाठी, सहली, चर्चा सत्र, छंद जोपासणे यामुळे मानसिक आरोग्य चांगले राहते. व्यसनांपासून दूर राहा.
* कर्करोगाचा धोका कमी करा : फ्रीजमधील जुने पदार्थ, साखरेचे अति सेवन, प्लास्टिकचा वापर कमी करा. मोबाईल व स्क्रीन टाइम मर्यादित ठेवा आणि सौंदर्यप्रसाधनांचा अति वापर टाळा.
* नियमित व्यायाम करा : दररोज किमान ४५ मिनिटे चालणे, योगा किंवा इतर व्यायाम करा.
* नियमित आरोग्य तपासणी करा : हार्मोन तपासणी, कोलेस्टेरॉल, रक्तातील साखर तपासणे आवश्यक आहे. सतत पांढरे जाण्याची तक्रार असल्यास पॅप स्मिअर टेस्ट आणि गरज असल्यास पोटाची सोनोग्राफी करणे महत्त्वाचे आहे.

**- डॉ. श्रद्धा प्रतीक वाणी**
एम.डी., स्त्रीरोग तज्ज्ञ
वाणी हॉस्पिटल, नवीन नगर रोड,
संगमनेर, मोबा. **7776022777**

# सौ. अरुणा रमेश घोलप : महिलांच्या सक्षमीकरणासाठी समर्पित सामाजिक कार्यकर्त्या



संगमनेर परिसरात सामाजिक कार्याच्या माध्यमातून महिलांना नवी दिशा देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून सौ. अरुणा रमेश घोलप यांचे नाव आदराने घेतले जाते. त्या डॉ. अरुणा घोलप स्वामिनी फाउंडेशनच्या अध्यक्षा तसेच स्वामिनी लिनेस क्लब, संगमनेरच्या संस्थापक असून गेल्या काही वर्षांपासून त्या महिलांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत आहेत. महिलांना संघटित करणे, त्यांना आत्मनिर्भर बनवणे आणि समाजात त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण करून देणे या उद्दिष्टाने त्या काम करत आहेत.

सौ. घोलप यांना विश्वास आहे की, महिलांना योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाले तर त्या कोणत्याही क्षेत्रात मोठे यश मिळवू शकतात. या विचारातूनच त्यांनी स्वामिनी लिनेस क्लबच्या माध्यमातून महिलांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी करून घेतले आहे. व्यवसाय, लघुउद्योग, कौशल्यविकास, तसेच स्वावलंबनासाठी आवश्यक मार्गदर्शन देऊन महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम त्या करत आहेत. अनेक महिलांना छोट्या उद्योगांसाठी प्रोत्साहन देणे, त्यांना नेटवर्क उपलब्ध करून देणे आणि आत्मविश्वास वाढवणे यावर त्या विशेष भर देतात.

त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना समाजात नवी ओळख मिळाली आहे. आपण कुठेही कमी नाही हा आत्मविश्वास प्रत्येक महिलेमध्ये निर्माण व्हावा, हा त्यांच्या कार्यामागचा मुख्य हेतू आहे. महिलांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक



क्षेत्रातही पुढे यावे, अशी त्यांची सातत्याने प्रेरणा असते.

सौ. अरुणा घोलप यांच्या या सामाजिक कार्याची दखल विविध स्तरावर घेण्यात आली आहे. जनकल्याण सामाजिक सेवा संस्था, कोल्हापूर यांच्या वतीने त्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच डॉ. सुरेश राठोड फाउंडेशन, कोल्हापूर यांच्या कडून त्यांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. याशिवाय विविध संस्थांकडून त्यांना अनेक सन्मान आणि पुरस्कार देण्यात आले आहेत. हे पुरस्कार त्यांच्या कार्याची समाजाने घेतलेली दखल आणि त्यांच्यावरील विश्वास दर्शवतात.

जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर सौ. घोलप यांचे विचारही प्रेरणादायी आहेत. त्यांच्या मते स्त्री ही प्रेम, त्याग, सहनशीलता आणि सामर्थ्य यांचे सुंदर प्रतीक आहे. आई, बहीण, पत्नी आणि मुलगी अशा अनेक रूपांतून ती कुटुंबाला आधार देते आणि समाजाला दिशा देते. महिलांचे स्वप्न, आत्मविश्वास आणि ध्येय यांवरच उज्ज्वल भविष्य उभे राहते, असे त्या सांगतात.

महिलांना समाजात सन्मान, समानता आणि सुरक्षितता मिळणे ही खरी प्रगती असल्याचे त्या ठामपणे मांडतात. प्रत्येक स्त्रीच्या सामर्थ्याला योग्य व्यासपीठ मिळाले, तर समाजाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो, असा त्यांचा विश्वास आहे. त्यामुळे महिलांनी स्वतःवर विश्वास ठेवून पुढे यावे, शिक्षण आणि स्वावलंबनाच्या माध्यमातून आपली ओळख निर्माण करावी, असे आवाहन त्या करतात.

आज सौ. अरुणा रमेश घोलप या केवळ सामाजिक कार्यकर्त्या म्हणूनच नव्हे, तर अनेक महिलांसाठी प्रेरणा बनल्या आहेत. त्यांच्या कार्यामुळे अनेक



महिलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून आला आहे. महिलांना सक्षम, स्वाभिमानी आणि आत्मनिर्भर बनवण्याच्या त्यांच्या ध्यासामुळे त्या संगमनेर परिसरातील सामाजिक क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरल्या आहेत.

जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिलांना त्यांनी हार्दिक शुभेच्छा देत प्रत्येक स्त्रीच्या सामर्थ्याला मानाचा मुजरा केला आहे.



# आधुनिक काळातील सेवाभावी नेतृत्वाचे समर्पित व्यक्तिमत्त्व - डॉ. सोनालीताई कुटे



जागतिक महिला दिन हा समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्याचा दिवस आहे. आपल्या देशाच्या इतिहासात अनेक महिलांनी धैर्य, समर्पण, नेतृत्व आणि सेवाभावाच्या बळावर समाजाला नवी दिशा दिली. राणी लक्ष्मीबाई यांचे शौर्य, सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणासाठीचे योगदान हे स्त्रीशक्तीच्या सामर्थ्याचे तेजस्वी उदाहरण आहे. त्याच प्रेरणेतून आजच्या काळातही अनेक महिला आपल्या कार्यातून समाजात ठसा उमटवत आहेत. संगमनेर परिसरात वैद्यकीय सेवा, सामाजिक संवेदनशीलता आणि साधेपणातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. सोनालीताई कुटे.

डॉ. सोनालीताई कुटे यांचा जन्म ४ सप्टेंबर १९८१ रोजी नाशिक येथे झाला. माजी खासदार माधवराव बळवंत पाटील यांच्या राजकीय आणि सामाजिक परंपरा असलेल्या कुटुंबात त्यांचे बालपण घडले. घरातील सामाजिक जाणीव, सार्वजनिक प्रश्नांकडे पाहण्याची दृष्टी आणि लोकांशी जोडले जाण्याची वृत्ती यामुळे लहानपणापासूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वात संवेदनशीलता निर्माण झाली. बालवयातच वैद्यकीय क्षेत्रात कार्य करण्याचा निर्धार त्यांनी केला आणि त्यासाठी त्यांनी सातत्यपूर्ण परिश्रम घेतले.

वैद्यकीय शिक्षणासाठी त्यांनी NDMVP Samaj Medical College येथे वैद्यकीय पदवी पूर्ण केली. पुढे भूलतज्ज्ञ म्हणून विशेष शिक्षण घेत त्यांनी SION HOSPITAL येथे पदविका प्राप्त केली. वैद्यकीय शिक्षणाच्या काळात त्यांनी केवळ तांत्रिक कौशल्यच मिळवले नाही, तर रुग्णांशी आत्मीयतेने संवाद साधण्याची वृत्तीही जोपासली. डॉक्टर होणे म्हणजे केवळ उपचार करणे नव्हे, तर रुग्णाच्या मनातील भीती दूर करून विश्वास निर्माण करणे, हा दृष्टिकोन त्यांनी कायम जपला.

२७ जानेवारी २००८ रोजी त्यांचा विवाह संगमनेर तालुक्यातील सुकेवाडी येथील डॉ. प्रदीप कुटे यांच्याशी झाला. सहकार, सामाजिक बांधिलकी आणि सार्वजनिक जीवनाचा मजबूत वारसा असलेल्या कुटुंबात त्या सून म्हणून आल्या. माहेर आणि सासर या दोन्ही घरातील सामाजिक संस्कारांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. विवाहानंतरही त्यांनी वैद्यकीय क्षेत्रातील आपली बांधिलकी कायम ठेवत समाजसेवेची दिशा अधिक व्यापक केली.

मोठ्या शहरांत वैद्यकीय व्यवसायासाठी चांगल्या संधी उपलब्ध असतानाही ग्रामीण आणि निमशहरी भागातील रुग्णांना गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळावी या हेतूने त्यांनी संगमनेरमध्येच कार्य करण्याचा निर्णय घेतला. १३ जून २०१० रोजी Kute Hospital and Laparoscopy Centre ची स्थापना करण्यात आली आणि त्यातून सर्वसामान्यांसाठी विश्वासार्ह वैद्यकीय सेवा सुरू झाली. आज हे रुग्णालय संगमनेर तालुक्यातीलच नव्हे तर जिल्ह्यातील अनेक कुटुंबांसाठी आपले, जवळचे आणि विश्वासाचे रुग्णालय म्हणून ओळखले जाते.

रुग्णालयात सर्वसामान्य रुग्णांना सुलभ सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी विविध आरोग्य योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात आला आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना उपचार मिळण्यात अडचण येऊ नये यासाठी आरोग्य योजनांच्या माध्यमातून अनेक रुग्णांना शस्त्रक्रिया आणि उपचारांचा लाभ मिळाला आहे. मुतखडा, अपेंडिक्स, हर्निया, अस्थिरोग, कर्करोगाशी संबंधित शस्त्रक्रिया, बालरोग उपचार आणि इतर गंभीर आजारांवरील उपचार या माध्यमातून हजारो रुग्णांना नवजीवन मिळाले आहे. डॉ. सोनालीताई कुटे यांच्या कार्यातील सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यांचा सेवाभाव. भूलतज्ज्ञ म्हणून त्यांनी हजारो रुग्णांना यशस्वीपणे भूल देत शस्त्रक्रिया प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. प्रत्येक रुग्णाच्या सुरक्षिततेबाबत अत्यंत जागरूकता, शस्त्रक्रियेपूर्व तयारीतील काटेकोरपणा आणि तणावग्रस्त कुटुंबाला दिलासा देणारा संवाद यामुळे त्यांच्याविषयी रुग्णांमध्ये विशेष विश्वास निर्माण झाला आहे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा आणि माणुसकी विशेष जाणवते. आर्थिक अडचणीत असलेल्या कुटुंबांना मदत करणे, गरजू महिलांना उपचारात सवलत देणे, अनाथ मुलांसाठी मदतीचे उपक्रम राबवणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून वैयक्तिक आनंदाचे क्षणही समाजाशी जोडणे ही त्यांची खास कार्यशैली आहे. वाढदिवस किंवा कौटुंबिक विशेष दिवस सामाजिक उपयोगाच्या कार्यातून साजरे करण्याची त्यांची परंपरा अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

रुग्णालयातील सर्व कर्मचारीवर्गाशी त्यांचे नातेही जिव्हाळ्याचे आहे. शिस्त, आत्मीयता आणि परस्पर आदर या मूल्यांवर त्यांनी कार्यसंस्कृती उभी केली आहे. त्यामुळे अनेकांच्या दृष्टीने त्या केवळ डॉक्टर नाहीत, तर मार्गदर्शक आणि कुटुंबवत्सल नेतृत्व आहेत.

महिला दिनाच्या निमित्ताने डॉ. सोनालीताई कुटे यांचे कार्य हे आधुनिक काळातील स्त्रीशक्तीचे सुंदर उदाहरण ठरते. वैद्यकीय क्षेत्रातील निष्ठा, सामाजिक जाणीव, साधेपणा आणि सेवाभाव यांच्या बळावर त्यांनी समाजात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. अशा कर्तृत्ववान महिलेला महिला दिनानिमित्त मानाचा मुजरा.









# संघर्षातून उभी राहिलेली संगमनेरची आंतरराष्ट्रीय मेकअप तज्ज्ञ - वनिता बोरुडे



Rachna's
MAKEOVER
Mo.8007301498

महिला दिन हा स्त्रियांच्या कर्तृत्वाचा, जिद्दीचा आणि आत्मविश्वासाचा गौरव करणारा दिवस आहे. समाजातील अनेक महिला अत्यंत सामान्य परिस्थितीतून स्वतःचा मार्ग तयार करत यशाची नवी उंची गाठत आहेत. अशाच प्रेरणादायी महिलांपैकी एक म्हणजे संगमनेरमधील वनिता बोरुडे. सौंदर्य क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत त्यांनी मेहनत, सातत्य आणि गुणवत्तेच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आज त्या केवळ मेकअप कलाकार म्हणून नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील मेकअप तज्ज्ञ आणि केशरचना तज्ज्ञ म्हणूनही परिचित आहेत.

२८ नोव्हेंबर २००९ रोजी Rachna's Studio and Clinic या स्टुडिओची सुरुवात झाली. सुरुवातीला हा एक छोटा उपक्रम होता. अत्यंत कमी भांडवल, मर्यादित साधने आणि अनेक अडचणी यांच्यामध्ये त्यांनी व्यवसायाची पायाभरणी केली. सुरुवातीच्या काळात पार्लरचे काम सांभाळताना त्यांनी ब्लाउज शिवण्याचे कामही केले, कारण घरची जबाबदारी आणि व्यवसाय या दोन्ही गोष्टी समतोल राखणे आवश्यक होते. संघर्षाच्या या काळात त्यांनी कोणतीही अडचण अडथळा होऊ दिली नाही.

सौंदर्य क्षेत्राविषयीची प्रखर आवड आणि काहीतरी वेगळे करण्याची जिद्द यामुळे त्यांनी सतत नवे कौशल्य आत्मसात करण्याचा मार्ग निवडला. व्यवसाय सुरू झाल्यानंतर काही वर्षांतच त्यांनी केसांच्या आरोग्याशी संबंधित विविध कार्यशाळा आणि मार्गदर्शन सत्रांमध्ये सहभाग घेतला. आधुनिक उपचारपद्धती, त्वचा आणि केसांची काळजी, ग्राहकांच्या बदलत्या गरजा आणि सौंदर्य क्षेत्रातील नव्या संकल्पना यांचा त्यांनी सातत्याने अभ्यास केला.

२०१४ मध्ये झींपश येथे त्यांनी मेकअप कार्यशाळा पूर्ण करून व्यावसायिक मेकअपचे प्रशिक्षण घेतले. यानंतर त्यांच्या कामात अधिक परिपूर्णता आली. पुढे २०२० मध्ये चींलरळ येथे Bijal Gada Academy मध्ये एक महिन्याचा मेकअप पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. या प्रशिक्षणामुळे आधुनिक मेकअप शैली, वधू मेकअप, विशेष प्रसंगांतील साजशृंगार आणि व्यक्तिमत्त्वानुसार सौंदर्यसंकल्पना यामध्ये त्यांना अधिक सखोल अनुभव मिळाला.

सौंदर्य क्षेत्रातील ज्ञान अधिक व्यापक करण्यासाठी त्यांनी २०२२ मध्ये सौंदर्य उपचार विषयातील विशेष अभ्यासक्रमासाठी परीक्षा दिली आणि २०२४ मध्ये त्या यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाल्या. त्यानंतरही शिकण्याची उर्मी कायम ठेवत त्यांनी २०२५ मध्ये पुन्हा पुणे येथे सौंदर्यशास्त्र विषयातील पदविका पूर्ण केली. आधुनिक त्वचा उपचार, चेहऱ्याची निगा, त्वचेच्या समस्या आणि सौंदर्यशास्त्रीय उपचार याविषयी त्यांनी अधिक सखोल प्रशिक्षण घेतले.

२०२६ मध्ये केसांच्या आरोग्याशी संबंधित विशेष उपचारपद्धती, केसांची पुनर्वाढ आणि आधुनिक रक्तघटकाधारित उपचार याविषयी विशेष प्रशिक्षण पूर्ण केले. यामुळे केस गळणे, केसांची पुनर्निर्मिती, टाळूची निगा आणि आधुनिक सौंदर्योपचार या क्षेत्रात त्यांनी आधुनिक सेवा सुरू केल्या. सतत शिकत राहण्याची वृत्ती हीच त्यांच्या यशाची मोठी ताकद ठरली.

या संपूर्ण प्रवासातील सर्वात महत्त्वाचा क्षण म्हणजे १२ सप्टेंबर २०२४ रोजी स्वतःच्या जागेत स्टुडिओ उभारण्याचे स्वप्न पूर्ण होणे. अनेक वर्षांच्या परिश्रमांनंतर स्वतःच्या जागेवर उभे राहिलेले हे केंद्र त्यांच्या चिकाटीचे आणि स्वप्नपूर्तीचे प्रतीक ठरले. छोट्या सुरुवातीपासून स्वतःच्या स्वतंत्र जागेपर्यंतचा प्रवास हा त्यांच्या आत्मविश्वासाचा जिवंत पुरावा आहे.

या यशामागे त्यांच्या कुटुंबाचा मोठा वाटा आहे. पती आणि मुली यांनी प्रत्येक टप्प्यावर दिलेला पाठिंबा त्यांच्यासाठी महत्त्वाचा ठरला. घरची जबाबदारी, मुलींचे संगोपन आणि व्यवसाय यांचा समतोल राखत पुढे जाणे सोपे नव्हते; परंतु कुटुंबाच्या विश्वासामुळे त्यांनी प्रत्येक आव्हान स्वीकारले.आज त्यांच्या स्टुडिओमध्ये वधू मेकअप, समारंभासाठी मेकअप, डोहाळेजेवणासाठी साजशृंगार, केशरचना, त्वचा सेवा, आधुनिक त्वचा उपचार, केसांच्या वाढीसाठी उपचार अशा अनेक सेवा उपलब्ध आहेत. उत्कृष्ट सेवा, आधुनिक तंत्रज्ञान आणि ग्राहकांशी जपलेले विश्वासाचे नाते यामुळे स्टुडिओला संगमनेरमध्ये विशेष प्रतिष्ठा मिळाली आहे.

महिला दिनाच्या निमित्ताने वनिता बोरुडे यांची ही यशोगाथा अनेक महिलांसाठी प्रेरणादायी आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी सातत्य, मेहनत, शिकण्याची तयारी आणि कुटुंबाचा आधार असेल तर यशाचा मार्ग नक्की खुला होतो. त्यांच्या प्रवासातून हे स्पष्ट होते की स्वप्न पाहण्याची हिंमत असेल तर त्याला यशाची जोड मिळवणे शक्य असते.





# संस्कार, संघर्ष, कौटुंबिक मूल्ये आणि समाजकार्य यांचा सुंदर प्रवास - डॉ. दीपाली प्रवीणकुमार पानसरे





१६ फेब्रुवारी १९८३ रोजी माझा जन्म कोपरगाव येथे झाला. माझे वडील कॉ. डॉ. राधेश्याम गुंजाळ यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत होमिओपॅथीची वैद्यकीय सेवा सुरू केली. त्या काळात ग्रामीण भागात होमिओपॅथीविषयी फारशी माहिती नव्हती. त्यामुळे सुरुवातीच्या काळात त्यांनी जिल्ह्यातील तालुक्यांच्या बाजाराच्या दिवसानुसार सात दिवस सात तालुक्यांत जाऊन बाह्यरुग्ण सेवा दिली. अपार कष्ट, चिकाटी आणि लोकांप्रती असलेल्या बांधिलकीतून त्यांनी चंदनापुरी घाटाच्या माळरानावर शिक्षण आणि आरोग्य यांचे नंदनवन उभे केले. पुढे होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय, पशुवैद्यकीय शिक्षण, परिचारिका प्रशिक्षण, कृषी शिक्षण आणि इंग्रजी माध्यमाची शैक्षणिक संस्था सुरू करत मोठा शैक्षणिक विस्तार केला; परंतु आपल्या प्रवासाची सुरुवात रुग्णसेवेपासून झाली हे त्यांनी कधीही विसरले नाही. आजही ते शंभरपेक्षा अधिक होमिओपॅथीचे रुग्ण स्वतः पाहतात आणि कोणत्याही कार्यक्रमापेक्षा रुग्णांना अधिक महत्त्व देतात. याचा मला मनापासून अभिमान आहे.

मध्यंतरी त्यांनी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया तर्फे लोकसभा निवडणूकही लढवली; मात्र त्यांना राजकारणापेक्षा समाजकारणात अधिक समाधान लाभले. बालपणापासूनच माझा सहभाग विद्यार्थी चळवळींमध्ये होता. ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनचे शिबिरे घाटात भरायची आणि त्या निमित्ताने मला अनेक अभ्यासू व्यक्तिमत्त्वांना जवळून पाहण्याची संधी मिळाली. कॉ. गोविंद पानसरे यांसारख्या विचारवंतांचा सहवास लाभल्याने नेतृत्व, सामाजिक प्रश्नांवर स्पष्ट भूमिका घेणे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हे संस्कार माझ्या स्वभावातच आले.

घरातील वातावरणही तितकेच कष्टाळू आणि प्रेमळ होते. वडील कामानिमित्त सतत बाहेर असल्याने घराची संपूर्ण जबाबदारी आईने सांभाळली. सात आत्या, चार काका, त्यांचे शिक्षण, लग्नकार्य, नातेवाईकांचा सततचा राबता, घरातील पाहुणचार हे सर्व ती सहजतेने करत असे. रविवारी वसतिगृहातील मुलींना डबे येत नसत तेव्हा त्यांच्यासाठी ती स्वतः स्वयंपाक करत असे. आजही कुरडई, पापड, मसाले, घरगुती पदार्थ ती स्वतः बनवते. पाट्यावर वाटणं, नातवंडांना उटणं लावून अंघोळ घालणं, चुलीवर स्वयंपाक करणं, त्यांना फिरायला घेऊन जाणं–या सगळ्यांत तिचा उत्साह अजूनही तितकाच आहे. त्यामुळे माझ्या तिन्ही मुली तिच्याशी आजीसारख्या नव्हे तर मैत्रिणीसारख्या गप्पा मारतात. तिचे शिक्षण दहावीपर्यंत झाले असले तरी एकदा पाहिलेला रस्ता ती कधी विसरत नाही अगदी परदेशातही. चेहऱ्यावरचे समाधान, सर्वांचे कौतुक करण्याची सवय आणि शांत स्वभाव हे तिचे वैशिष्ट्य आहे.

माझे पहिले ते सातवीपर्यंतचे शिक्षण आदर्श शाळेत झाले. नंतर काही कारणास्तव आम्ही पंचगणी येथे राहायला गेलो आणि आठवीचे शिक्षण तेथे पूर्ण झाले. पुढे आमची सर्व भावंडे भारती विद्यापीठात




शिकली. दहावी सह्याद्री विद्यालयात आणि कनिष्ठ महाविद्यालय ज्ञानमाता येथे झाले. पुढे शासनाच्या प्रवेश प्रक्रियेत माझी निवड आपल्या संस्थेतील बी.एच.एम.एस. अभ्यासक्रमासाठी झाली. मोठ्या कुटुंबामुळे प्रत्येक सुट्टीत एखादे लग्न असायचेच. त्यामुळे नातेवाईकांत मिसळणे, त्यांच्या घरी राहणे, कुटुंब समजून घेणे हे सहज अंगवळणी पडले. मामाच्या गावच्या आठवणी तर विशेष जिव्हाळ्याच्या आहेत. शेतावर जाणाऱ्या महिलांसोबत बैलगाडीतून किंवा ट्रॅक्टरने शेतात जाणे, कांदे लावणे, घास कापणे, सूर्यफुलाच्या बिया काढणे, झाडाखाली सगळ्यांसोबत जेवण करणे हे सारे अनुभव आयुष्य समृद्ध करणारे होते. एका पायली सूर्यफुलाच्या बिया काढल्या की एक रुपया मिळायचा, तो आनंद आजही स्मरणात आहे.

२००६ मध्ये डॉ. प्रविणकुमार पानसरे यांच्या सोबत माझा विवाह झाला. पहिले सहा महिने आम्ही पुण्यात होतो. त्यांची वाय.सी.एम. ला प्रॅक्टीस चालू होती. तर आदित्य हॉस्पिटलमध्ये माझी इंटर्नशीप. आम्हाला आठवड्यातून एक दिवस सुट्टी असायची. परंतु त्या सुट्टीच्या दिवशी आम्ही गावी यायचो. आधल्या दिवशी आम्हा दोघांचीही नाईट शिफ्ट असायची त्यामुळे ते गाडीत झोपायचे. आळेफाटा, चाकण, संगमनेर येथे त्यादिवशी ऑपरेशन ठरलेले असायचे. हॉस्पिटल आले की मी त्यांना उठवायचे. ते ऑपरेशन करायला जायचे तेव्हा मी गाडीत तोपर्यंत झोप काढायचे, असे सहा महिने काढल्यांनतर आम्ही ०१ फेब्रुवारी २००७ मध्ये पोफळे हॉस्पीटल, संगमनेर येथे स्वतःची प्रॅक्टीस केली, त्याच काळात २००९ मध्ये ए.एन.एम. व २०११ मध्ये जी.एन.एम. हे नर्सिंग (ए.एन.एम., जीएनएम., बीएसस्सी नर्सिंग, ओटी टेक्निशिअन कोर्सेस सुरु केले. नंतर २०१५ मध्ये स्वतःचे धन्वंतरी मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये स्थलांतर केले. त्यांच्या उत्तम वैद्यकीय, सामाजिक कार्यामुळे त्यांना अनेक पूरस्कारही मिळालेले आहेत. ह्याच आठवड्यात त्यांना संगमनेर भूषण हा पुरस्कार मिळाला. नंतर 'उमा गौरी वुमेन्स ग्लोबल फाऊंडेशन' ही महिला संस्था चालू केली व या संस्थेच अंतर्गत दहावी नंतरचा एक वर्षांचा ओ.टी. टेक्निशियनचा कोर्स सुरु केला व याच वर्षी बी.एस्सी. नर्सिंग अशापद्धतीने नर्सिंगचे चार कॉलेजेस चालू केले. त्याचबरोबर धन्वंतरी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे मॅनेजमेंट ही बघावे लागते. मी इनर व्हील क्लब ऑफ संगमनेरची पास्ट प्रेसिडेन्ट तसेच जिजाऊ बिग्रेड (अहिल्यानगरची) जिल्हा अध्यक्ष आहे. हे सर्व मिळवतांना अनेक अडचणी आल्यात परंतू सासर आणी माहेरची साथ यामुळे सगळं कसं कळत नकळतं घडत गेले. पुढे परिचारिका प्रशिक्षणाचे विविध अभ्यासक्रम सुरू झाले आणि २०१५ मध्ये धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये स्थलांतर झाले. वैद्यकीय आणि सामाजिक कार्यामुळे त्यांना अनेक सन्मान मिळाले असून नुकताच 'संगमनेर भूषण' पुरस्कार मिळाला आहे. यानंतर महिलांसाठी 'उमा गौरी महिला जागतिक प्रतिष्ठान' सुरू करून आरोग्य व शिक्षण क्षेत्रात नवे उपक्रम राबवले. दहावीनंतरच्या मुलींसाठी शस्त्रक्रिया सहाय्यक अभ्यासक्रम सुरू केला आणि पुढे परिचारिका शिक्षणाची चार महाविद्यालये उभी राहिली. या सर्वांसोबत रुग्णालयाचे व्यवस्थापनही सांभाळावे लागते. मी इनरव्हील क्लबच्या स्थानिक शाखेची माजी अध्यक्षा आहे तसेच जिजाऊ ब्रिगेडमध्ये जिल्हास्तरावर जबाबदारी सांभाळत आहे. लग्नानंतर मोठ्या कुटुंबात आल्यावर नात्यांची श्रीमंती अधिक जवळून अनुभवली. घरातील सर्व मंडळी एकत्र येण्याची परंपरा आजही कायम आहे. आमच्या कुटुंबातील ज्येष्ठ 'जिजी' या शंभरी पार केलेल्या मातृसत्ता आहेत. त्यांच्या अनुभवातून मिळणारे चार शब्द आजही घरातील प्रत्येकासाठी प्रेरणा असतात. त्यांचे प्रेम, शिस्त, जिव्हाळा आणि घरातील प्रत्येकावर असलेले लक्ष पाहून नेहमीच आश्चर्य वाटते. आम्ही चार भावंडे आहोत आणि मी सर्वांत मोठी असल्याने नियोजनाची सवय लहानपणापासून लागली. माझी बहीण डॉ. पूनम ढगे यांनी होमिओपॅथीत उच्च शिक्षण घेतले आहे. दुसरी बहीण डॉ. सीमा हासे यांनी संशोधन क्षेत्रात प्रगती केली आहे. भाऊ संस्थेचे व्यवस्थापन पाहतो, तर वहिनी आर्थिक नियोजन आणि शाळेची जबाबदारी सांभाळते. कुटुंबातील ५१ जणांना घेऊन पंढरपूर येथे नेण्याचा अनुभव अविस्मरणीय ठरला. तसेच घरातील ज्येष्ठ मंडळींना घेऊन जगन्नाथ मंदीर येथे केलेला प्रवास जीवनातील सर्वात आनंददायी क्षणांपैकी एक ठरला. बस, रेल्वे, रिक्षा आणि विमान अशा विविध प्रवाससाधनांतून इतक्या ज्येष्ठांना सुरक्षित नेण्याचा अनुभव वेगळाच होता.

आजवरचा हा संपूर्ण प्रवास संघर्षमय असला तरी समाधान देणारा आहे. या वाटचालीत डॉ. प्रवीणकुमार पानसरे, माझ्या तिन्ही मुली, सासर–माहेरचे संस्कार, ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि सर्वांचे सहकार्य हा माझा खरा आधार आहे. महिला दिनाच्या निमित्ताने मागे वळून पाहताना जाणवते कष्ट, प्रेम, संस्कार आणि कुटुंबाची साथ असेल तर आयुष्यातील प्रत्येक टप्पा अर्थपूर्ण होत जातो.






# निरोगी सौंदर्याचा मंत्र स्त्रीच्या आत्मविश्वासाला नवी झळाळी




जागतिक महिला दिन हा स्त्रीशक्तीचा गौरव करण्याचा दिवस आहे; पण त्याचबरोबर प्रत्येक महिलेला स्वतःच्या आरोग्याविषयी सजग होण्याची आठवण करून देणारा दिवसही आहे. स्त्री म्हणजे केवळ एक व्यक्ती नव्हे, तर संवेदनशीलता, सामर्थ्य, सहनशीलता आणि सौंदर्य यांचा सुंदर संगम आहे. ती कुटुंबाची आधारवड असते, समाजाला दिशा देणारी प्रेरणा असते आणि संस्कृतीची जपणूक करणारी शक्ती असते. परंतु या सर्व भूमिका पार पाडताना अनेकदा ती स्वतःच्या आरोग्याकडे, त्वचेच्या निगेकडे आणि केसांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करते. प्रत्यक्षात स्वतःची काळजी घेणे हा दिखावा नसून आत्मसन्मानाचा महत्त्वाचा भाग आहे. स्वतःसाठी वेळ देणे, शरीराच्या गरजा समजून घेणे आणि योग्य काळजी घेणे ही प्रत्येक महिलेची आवश्यक जबाबदारी आहे.

त्वचा ही आपल्या शरीराचे संरक्षण करणारी पहिली नैसर्गिक कवच आहे. बाह्य वातावरणातील उष्णता, धूळ, प्रदूषण, सूर्यप्रकाश, ताणतणाव, अपुरी झोप, अयोग्य आहार आणि हार्मोन्समधील बदल यांचा परिणाम सर्वप्रथम त्वचेवर दिसून येतो. त्वचा निरोगी असेल तर चेहऱ्यावर तेज दिसते, आत्मविश्वास वाढतो आणि व्यक्तिमत्त्व अधिक खुलते. म्हणूनच महिलांनी त्वचेची काळजी ही रोजच्या जीवनाचा एक भाग बनवणे अत्यावश्यक आहे. त्वचेच्या प्रकारानुसार सौम्य स्वच्छता करणे, योग्य आर्द्रता टिकवून ठेवणे, उन्हात बाहेर पडताना संरक्षण करणे, भरपूर पाणी पिणे, ताजे फळे, भाज्या आणि सुकामेवा यांचा आहारात समावेश करणे आणि पुरेशी झोप घेणे या साध्या गोष्टी त्वचेच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

अनेक महिलांना मुरूम, त्वचेवर काळपटपणा, डाग, डोळ्यांभोवती काळी वर्तुळे, सुरकुत्या किंवा त्वचेचा कोरडेपणा अशा समस्या जाणवतात. अनेकदा या समस्या केवळ बाह्य नसतात, तर शरीरातील अंतर्गत बदलांचे संकेत असतात. त्यामुळे अशा वेळी योग्य तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक असते. वेळेवर योग्य उपचार केल्यास त्वचा पुन्हा निरोगी, स्वच्छ आणि तेजस्वी बनू शकते.

केस हे स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहेत. निरोगी, दाट आणि मजबूत केस स्त्रीच्या आत्मविश्वासात भर घालतात. आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे केस गळणे, केस विरळ होणे, कोंडा, अकाली पांढरे होणे, टाळू कोरडी पडणे किंवा केसांची वाढ मंदावणे अशा समस्या मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. यामागे हार्मोनल असंतुलन, रक्तातील घटकांची कमतरता, पोषणातील असमतोल, ताणतणाव, आनुवंशिक कारणे आणि अनियमित दिनचर्या ही प्रमुख कारणे असतात.

केसांच्या आरोग्यासाठी योग्य आहार, पुरेसे प्रथिने, लोहयुक्त अन्न, वेळेवर झोप, मानसिक शांतता आणि टाळूची योग्य निगा आवश्यक असते. अनेक वेळा घरगुती उपायांपेक्षा तज्ज्ञ तपासणी करून कारण शोधणे अधिक महत्त्वाचे असते. टाळूची तपासणी, आवश्यक रक्ततपासण्या आणि वैद्यकीय मार्गदर्शन यांच्या साहाय्याने केसांचे आरोग्य पुन्हा सुधारता येते.

आजच्या प्रगत वैद्यकीय क्षेत्रामुळे त्वचा आणि केसांच्या समस्यांवर सुरक्षित व परिणामकारक उपाय उपलब्ध आहेत. आधुनिक सौंदर्यचिकित्सा आणि आयुर्वेद यांची सांगड घातल्यास अधिक चांगले आणि टिकाऊ परिणाम मिळतात. त्वचेवरील डाग कमी करणे, चेहऱ्याचे पुनरुज्जीवन, वय वाढल्याने होणारे बदल नियंत्रित करणे, केसगळती कमी करणे, नवीन केसांची वाढ प्रोत्साहित करणे, त्वचेची स्वच्छता आणि पोषण वाढवणे अशा विविध उपचारपद्धती आज उपलब्ध आहेत. मात्र हे उपचार तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच करणे अत्यावश्यक आहे.

महिलांनी सौंदर्य म्हणजे केवळ बाह्य आकर्षण आहे, असा विचार न करता ते आरोग्याशी जोडून पाहिले पाहिजे. निरोगी त्वचा, सुदृढ केस आणि प्रसन्न मन हेच खरे सौंदर्य आहे. मानसिक आरोग्याचाही त्वचा आणि केसांवर मोठा परिणाम होतो. सततचा ताण, चिंता, अपुरी विश्रांती आणि भावनिक थकवा यामुळे शरीरावर परिणाम होतो. म्हणून योग, ध्यान, सकारात्मक विचार आणि स्वतःसाठी काही शांत क्षण राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक महिलेला एक छोटा संकल्प करता येईल–मी माझ्या आरोग्याला प्राधान्य देईन, स्वतःसाठी वेळ काढेन, माझ्या शरीराच्या गरजा समजून घेईन आणि शास्त्रीय पद्धतीने त्वचा व केसांची काळजी घेईन. कारण निरोगी स्त्रीच खऱ्या अर्थाने आत्मविश्वासी, तेजस्वी आणि सुंदर असते.

सौंदर्य म्हणजे केवळ चेहऱ्यावरील आकर्षण नाही; ते आत्मविश्वास, आरोग्य, सकारात्मकता आणि अंतर्मनातील समाधान यांचा सुंदर संगम आहे. या महिला दिनी प्रत्येक स्त्रीने स्वतःकडे प्रेमाने पाहावे, स्वतःच्या आरोग्याची जबाबदारी स्वीकारावी आणि स्वतःच्या अस्तित्वाचा अभिमान बाळगावा. निरोगी सौंदर्य हीच आत्मसन्मानाची खरी ओळख आहे.



# तिच्या अस्तित्वाचे नवीन आकाश - अकोल्याच्या मातीत उभी राहिलेली स्त्रीशक्ती सौ. पुष्पाताई किरण लहामटे









जागतिक महिला दिन हा स्त्रीशक्तीच्या कार्याचा, संघर्षाचा आणि समाजातील योगदानाचा सन्मान करण्याचा दिवस आहे. समाजातील अनेक महिला शांतपणे, सातत्याने आणि समर्पणाने काम करत असतात. त्या प्रकाशझोतात कमी दिसतात; पण त्यांच्या कार्याचा परिणाम समाजाच्या प्रत्येक स्तरावर जाणवत असतो. अशाच सामाजिक, संघटनात्मक आणि प्रेरणादायी कार्यातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे अकोले तालुक्यातील सौ. पुष्पाताई किरण लहामटे. आ. डॉ. किरण लहामटे यांच्या सहचारिणी म्हणून त्यांची ओळख असली तरी आज त्या स्वतःच्या कार्यातून महिलांमध्ये, युवकांमध्ये आणि ग्रामीण समाजात एक प्रभावी नेतृत्व म्हणून पुढे येताना दिसत आहेत.

अकोले तालुका हा भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण, डोंगराळ आणि आदिवासी बहुल भाग आहे. या भागातील विकासकामे, लोकांच्या अडचणी, महिलांचे प्रश्न, रोजगाराची गरज आणि सामाजिक बदलाची आवश्यकता या सर्व गोष्टी अत्यंत जवळून समजून घेत सौ. पुष्पाताई लहामटे यांनी आपले कार्य विस्तारले आहे. ग्रामीण आणि आदिवासी समाजात महिलांना संघटित करणे, त्यांना आत्मविश्वास देणे आणि शासकीय योजनांशी जोडणे हे त्यांच्या कार्याचे मुख्य केंद्र राहिले आहे. केवळ कार्यक्रम आयोजित करणे एवढ्यावर त्यांचे काम मर्यादित नसून, महिलांच्या आयुष्यात प्रत्यक्ष बदल घडवण्याचा प्रयत्न त्यांच्या प्रत्येक उपक्रमातून दिसतो. महिलांचे बचत गट उभारणे हा त्यांच्या कार्यातील महत्त्वाचा भाग आहे. ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करायचे असेल तर त्यांना एकत्र आणून सामूहिक उपक्रम उभे करणे आवश्यक असते, ही जाणीव त्यांनी लवकर ओळखली. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना केवळ बचतीची सवय लागली नाही, तर विविध शासकीय योजनांची माहिती, अनुदानाच्या संधी, लघुउद्योगाची दिशा आणि स्वावलंबनाची नवी दारे खुली झाली. अनेक महिलांनी या माध्यमातून स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू केला, घरगुती उत्पादनांना बाजारपेठ मिळवली आणि कुटुंबाच्या अर्थकारणात हातभार लावला.

महिलांच्या आर्थिक प्रगतीबरोबरच त्यांचे कौशल्य विकसित होणेही तितकेच महत्त्वाचे आहे, या विचारातून विविध प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले. शिवणकला प्रशिक्षण, पाककला कार्यशाळा, अगरबत्ती तयार करणे, दागिने आणि केसांचे अलंकार तयार करणे, मेहंदी प्रशिक्षण, सौंदर्यविषयक कार्यशाळा अशा अनेक उपक्रमांतून महिलांना कौशल्याधारित संधी मिळाल्या. विशेष म्हणजे या प्रशिक्षणांमुळे ग्रामीण महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला आणि मीही काही करू शकते ही भावना अधिक बळकट झाली. आरोग्यविषयक प्रश्नांवरही सौ. पुष्पाताई लहामटे यांनी विशेष भर दिला आहे. महिलांना अनेकदा स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळत नाही. ग्रामीण भागात आरोग्याविषयी जागरूकतेचा अभावही दिसतो. त्यामुळे महिलांसाठी आरोग्य शिबिरे आयोजित करून तपासणी, मार्गदर्शन आणि आवश्यक वैद्यकीय सल्ला उपलब्ध करून देण्यात आला. या शिबिरांमुळे अनेक महिलांना योग्य वेळी आरोग्य तपासणीची संधी मिळाली. आरोग्य, पोषण, स्त्रीआरोग्य, मानसिक स्वास्थ्य याविषयीही जागरूकता निर्माण झाली.

युवक आणि युवतींसाठीही त्यांनी अनेक विधायक उपक्रम राबवले आहेत. उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने मार्गदर्शन शिबिरे, व्याख्याने, व्यवसायासाठी कर्ज मिळवून देण्यासाठी सल्ला, स्वयंरोजगाराच्या संधी यावर सातत्याने काम सुरू आहे. ग्रामीण भागातील तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता स्वतः काहीतरी उभे करावे, यासाठी प्रेरणा देणारे कार्यक्रम आयोजित केले जातात. तरुणांसाठी क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करून क्रीडा संस्कृतीला चालना देण्यात आली. खेळातून संघभावना, शिस्त आणि नेतृत्वगुण विकसित होतात, या भूमिकेतून हे उपक्रम महत्त्वाचे ठरतात. महिलांच्या सामाजिक सहभागाला नवे व्यासपीठ देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित केले गेले. मोठ्या प्रमाणावर दांडिया महोत्सव, मंगळागौर स्पर्धा, युवती संवाद, बाईक रॅली अशा कार्यक्रमांतून महिलांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. या कार्यक्रमांमुळे महिलांना सार्वजनिक जीवनात आत्मविश्वासाने सहभागी होण्याची संधी मिळाली. महिलांच्या नेतृत्वक्षमतेला चालना देणारे हे उपक्रम अकोले तालुक्यात विशेष चर्चेत राहिले.

क्रांती प्रतिष्ठान या माध्यमातून अनेक उपक्रम अधिक संघटित पद्धतीने राबवले जात आहेत. या संस्थेअंतर्गत महिलांसाठी विविध स्पर्धा, संवाद, प्रशिक्षण आणि सामाजिक कार्यक्रम आयोजित होत आहेत. धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवन यांचा समतोल राखत स्थानिक परंपरांनाही व्यासपीठ देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

विशेष उल्लेख करावा लागेल तो कळसूबाई महोत्सवाचा. स्थानिक संस्कृती, आदिवासी परंपरा, पारंपरिक खाद्यसंस्कृती आणि महिलांच्या सहभागाचा सुंदर संगम या महोत्सवात दिसतो. महिलांनी महिलांसाठी आयोजित केलेला हा महोत्सव म्हणजे अकोले तालुक्यातील स्त्रीशक्तीचे जिवंत दर्शन आहे. या महोत्सवात बचत गटांच्या उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री आयोजित केली जाते. त्यामुळे महिलांना बाजारपेठेचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो आणि त्यांच्या उत्पादनांना प्रोत्साहन मिळते. लाडकी बहीण योजनेसारख्या उपक्रमांत महिलांना आवश्यक कागदपत्रे, नोंदणी प्रक्रिया आणि माहिती मिळावी म्हणून प्रत्यक्ष मदत केली जाते. ई-केवायसीसारख्या तांत्रिक प्रक्रियेत अनेक ग्रामीण महिलांना अडचणी येतात; अशा वेळी त्यांना हात धरून मार्गदर्शन करण्याचे कामही सातत्याने केले जात आहे. धार्मिक आणि सामाजिक एकात्मतेसाठी आई घाटनादेवी दर्शन यात्रा, महिलांसाठी सामूहिक भेटी, संवाद कार्यक्रम आयोजित केले जातात. या माध्यमातून महिलांना एकमेकांशी जोडले जाण्याची संधी मिळते. समाजातील प्रश्न समजून घेऊन सामूहिक उपाय शोधण्याची दिशा तयार होते.

रुग्णसेवा हाही त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा भाग आहे. गरजूंना उपचारासाठी मदत, वैद्यकीय मार्गदर्शन, संपर्क आणि आवश्यक सहाय्य पुरवण्याचे कामही सतत केले जाते. एखाद्या कुटुंबाला अडचण आली की त्यांना तातडीने आधार देणे, ही त्यांची कार्यपद्धती अनेकांना जवळची वाटते. सौ. पुष्पाताई लहामटे यांचे कार्य पाहताना स्पष्ट जाणवते की त्यांनी महिला संघटन, सामाजिक जाणीव, ग्रामीण विकास आणि लोकसंपर्क यांचा अत्यंत समतोल साधला आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व शांत, संयमी आणि सर्वांना आपलेसे करणारे आहे. त्यामुळेच महिलांमध्ये त्यांच्याविषयी विशेष विश्वास निर्माण झाला आहे. महिला दिनाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याकडे पाहिले तर हे स्पष्ट दिसते की त्या केवळ सार्वजनिक जीवनातील सक्रिय व्यक्ती नाहीत, तर ग्रामीण समाजातील महिलांना नवी दिशा देणारे प्रेरणास्थान आहेत. त्यांचे कार्य म्हणजे महिलांना संधी, आत्मविश्वास आणि व्यासपीठ देण्याची सातत्यपूर्ण चळवळ आहे. म्हणूनच त्यांच्या प्रवासाकडे अनेकजणी आशेने पाहतात-कारण तिच्या अस्तित्वाचे हे खरेच नवीन आकाश आहे.







# ग्रामीण शिक्षणासाठी कार्य करणाऱ्या : डॉ. सुष्मिता राधाकृष्ण विखे पाटील





ग्रामीण भागाच्या विकासासाठी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे, ही जाणीव डॉ. सुस्मिता विखे पाटील यांना आहे. त्यामुळे त्यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी विविध उपक्रमांना पाठबळ दिले आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, शैक्षणिक सुविधा वाढाव्यात आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना प्रगतीची संधी मिळावी यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, संस्कार आणि सामाजिक जबाबदारी यांची जाणीव निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच उद्योजकतेचे धडे मिळावेत, त्यांच्यामध्ये उद्योजकतेची बीजे रोवली जावीत तसेच उद्योगधंद्यांमध्ये येणाऱ्या अडीअडचणींची जाणीव व्हावी आणि त्यातूनच नोकरी देणारे उद्योजक तयार व्हावेत या उद्देशाने लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधीने सन्मानित) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, प्रवरानगर या संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील या मागील दोन वर्षांपासून संस्थेच्या विविध कला, विज्ञान, वाणिज्य, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, औषधनिर्माणशास्त्र, कृषी व संलग्न महाविद्यालये अशा विविध शाखांमधील विद्यार्थ्यांसाठी बिझनेस एक्स्पोचे आयोजन करीत आहेत. २०२४ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या एक्स्पोमध्ये ८५० विद्यार्थ्यांनी १५० पेक्षा अधिक स्टॉल्स उभारून उद्योग क्षेत्राकडे ओढा असल्याचे दाखवून दिले. यामध्ये विद्यार्थ्यांच्या उद्यमशीलतेतून सुमारे १ कोटी रुपयांची उलाढाल झाली. तसेच मागील वर्षीच्या म्हणजे दुसऱ्या वर्षीच्या एक्स्पोचे आयोजन ऑक्टोबर २०२५ मध्ये व्होकल फॉर लोकल म्हणजे स्थानिक उत्पादने तयार करून त्यांची स्थानिक पातळीवरच विक्री करण्याचा संदेश देत करण्यात आले. त्यामुळे स्थानिक रोजगारांना चालना मिळून भारतीय अर्थव्यवस्था मजबूत होण्यास निश्चितच मदत होणार आहे. या एक्स्पोमध्ये विविध तांत्रिक, अतांत्रिक व कृषी संबंधित सर्व शाखांचे जवळपास १७० स्टॉल्समधून ९५० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जवळपास दीड कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल केली आहे.

विद्यार्थ्यांबरोबरच त्यांच्या पालकांनाही व परिसरातील नागरिकांना नेहमीच अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांतून व्यावसायिकतेचे धडे मिळतातच, शिवाय मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असल्याचे यातून दिसून येते. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था ही नेहमीच नाविन्याचा ध्यास घेऊन विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यात अग्रेसर असते. तसेच पुढील वर्षी हा उपक्रम सुरू ठेवताना काही अनुभवी उद्योजकांची व्याख्यानेही आयोजित करण्याचा त्यांचा मानस आहे. भविष्यकाळात प्रवरेने सुरू केलेल्या या बिझनेस एक्स्पोचे अनुकरण महाराष्ट्रातील विविध महाविद्यालये व संस्था करतील, त्यामधूनच अनेक नवीन उद्योजक तयार होतील. यातूनच स्थानिक रोजगारांना चालना मिळून भारतीय अर्थव्यवस्था मजबूत होण्यास व देश आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्यास मदत होणार आहे.

विखे पाटील परिवाराने नेहमीच समाजासाठी दिशादर्शक असे कार्य केले आहे आणि करीत आहे. विविध शाखांमधील विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी शिकण्या-शिकविण्याबरोबरच समाजोपयोगी संशोधन केले पाहिजे, संशोधन पेपर प्रसिद्ध केले पाहिजेत, असा डॉ. सुस्मिता विखे पाटील यांचा आग्रह असतो. संशोधन करताना विविध बाबींचा अभ्यास करावा लागतो, त्यामुळे विद्यार्थ्यांनाही चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करता येते. त्यातूनच महाविद्यालयाचा निकाल वाढीसाठी व प्लेसमेंटसाठी चांगला परिणाम दिसून येतो. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सेमिनार, परिषदांचे आयोजन करण्याकडे डॉ. सुस्मिता यांचा विशेष कल असतो.

शिक्षण क्षेत्रात प्रशिक्षण कार्यक्रम हा प्रत्येक शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या जीवनातील अविभाज्य भाग आहे. विशिष्ट कौशल्ये, ज्ञान किंवा क्षमता विकसित करण्यासाठी प्रशिक्षण ही एक आवश्यक बाब आहे. याकरिता डॉ. सुस्मिता विखे पाटील या नेहमीच प्रयत्नशील असतात. त्यांनी मागील दोन-तीन वर्षांपासून सर्व शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. यामुळे शिक्षकांना शैक्षणिक क्षेत्रातील नवनवीन पद्धती आत्मसात करून विद्यार्थ्यांची गुणवत्ता व दर्जा सुधारण्यासाठी अतिशय चांगला उपयोग होत आहे. या धकाधकीच्या जीवनामध्ये आणि नेहमीच्या कामाच्या ताणतणावापासून संस्थेमधील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना एक विरंगुळा मिळावा याकरिता डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी सेवकांसाठी कौटुंबिक स्नेहभोजन आयोजित केले. यातून अनेक वर्षांपासून एकत्रित कार्यरत असलेल्या सेवकांच्या गाठीभेटी होतच असतात, परंतु सेवकांच्या कुटुंबीयांचाही आपापसात जिव्हाळा निर्माण व्हावा, ओळखी व्हाव्यात, एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण व्हावी हा उद्देश त्यामागे आहे. यामध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रम, खेळांच्या स्पर्धा आयोजित करून एक कौटुंबिक वातावरण तयार होण्यास मदत होत आहे. विद्यार्थ्यांना काही अडीअडचणी असल्यास व्यवस्थापन मंडळाशी विद्यार्थ्यांना थेट संपर्क साधता यावा याकरिता अनेक विद्यार्थी आणि पालकांकडे त्यांनी स्वतःचा मोबाईल क्रमांक दिलेला आहे. ज्या विद्यार्थ्यांना किंवा पालकांना शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित काही अडचणी असल्यास ते डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्याशी संपर्क करून आपल्या अडीअडचणी मांडू शकतात. यामुळे अनेक प्रश्नांच्या मुळाशी जाऊन माहिती मिळण्यास, शिक्षण पद्धतीमध्ये काही बदल करणे आवश्यक असल्यास त्या बाबींचा सखोल अभ्यास करून त्याप्रमाणे बदल करणे सोपे होते.

विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच संस्कारक्षम बनविले पाहिजे, शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक परंपरेचे जतन व्हावे, भारतीय संस्कृतीची माहिती व्हावी, शिक्षणाबरोबरच माणुसकीही शिकविली पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. याकरिता डॉ. सुस्मिता विखे पाटील नेहमीच प्रयत्नशील असतात. 'एक गाव एक गणपती' उपक्रमांतर्गत सर्व शाखांमध्ये गणेशोत्सव, प्रवरा शारदीय नवरात्रोत्सव, रावणदहन आणि विशेष उपक्रम म्हणजे आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना दिंडीचा आणि वारीचा अनुभव घेता यावा, त्यांच्यामध्ये आध्यात्मिक भाव निर्माण व्हावा याकरिता त्यांनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने जवळपास चाळीस हजार विद्यार्थी व पालकांचा सहभाग असलेला वारी पंढरीची - ज्ञानगंगा प्रवरेची हा अतिशय दिमाखदार सोहळा पार पाडला. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात पंढरीचा सोहळा अनुभवता आला. त्यांच्या या उपक्रमाचे नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक, माजी मंत्री श्री. आण्णासाहेब म्हस्के पाटील, सौ. शालिनीताई विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी तोंडभरून कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रालाही महत्त्व दिले पाहिजे. अनेक क्षेत्रांत खेळाडूंसाठी राखीव जागाही असतात. त्यामध्येही विद्यार्थी करिअर करू शकतात, त्यामधूनच अनेक विद्यार्थी देशाच्या संरक्षण क्षेत्रात जाऊ शकतात अशी त्यांची धारणा आहे. मोठमोठ्या शहरांमध्ये खेळाच्या अनेक सोयी-सुविधा उपलब्ध असतात, परंतु ग्रामीण भागामध्ये त्याप्रमाणात कमी सोयी-सुविधा असतात. याचा विचार करून डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून नुकतीच प्रवरा स्पोर्ट्स अकॅडमीची स्थापना केली आहे. यामधूनही अनेक खेळाडू आपल्या खेळाची चमक दाखवत आहेत. या अकॅडमीच्या माध्यमातून अनेक खेळाडू राज्य व राष्ट्रीय पातळीवर चमक दाखवू शकतील, असा विश्वास त्यांना आहे. संस्थेच्या ११० शाखा, चाळीस हजारांहून अधिक विद्यार्थी-पालक आणि जवळपास सहा ते सात हजार सेवकांना बरोबर घेऊन आजच्या स्पर्धेच्या युगातील शिक्षणाचे हे शिवधनुष्य त्या लीलया पेलताना दिसतात. यातूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची चुणूक दिसून येते.

डॉ. सुस्मिता विखे पाटील यांचे कार्य हे शिक्षण, समाजकारण आणि लोकसेवा यांचा सुंदर संगम आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी शिक्षणाला प्राधान्य देत त्यांनी समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व हे आधुनिक काळातील प्रेरणादायी नेतृत्वाचे उदाहरण आहे.



**प्रा. साईप्रसाद प्रमोद कुंभकर्ण**
संपर्क : ९०११८९०२७९
(सहाय्यक प्राध्यापक,
इतिहास विभाग,
पद्मश्री विखे पाटील कला,
विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, लोणी)








# निर्मला गुंजाळ : नेतृत्व, संघर्ष आणि स्वावलंबनाची प्रेरणादायी वाटचाल

महिला दिन म्हणजे केवळ शुभेच्छांचा दिवस नाही, तर समाजात आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या कर्तृत्ववान स्त्रियांच्या कार्याचा गौरव करण्याचा दिवस आहे. घुलेवाडी ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच आणि नंतर जिल्हा परिषद सदस्या म्हणून कार्य करत, तसेच टूर्स अँड ट्रॅव्हल्स क्षेत्रात यशस्वी पाऊल टाकत स्वावलंबनाची नवी दिशा दाखवणाऱ्या निर्मला गुंजाळ यांचे कार्य खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे.

**ग्रामपंचायत सरपंच म्हणून लोकाभिमुख नेतृत्व**

घुलेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी निवड झाल्यानंतर निर्मला गुंजाळ यांनी विकासाची स्पष्ट दिशा ठरवली. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते आणि महिला सक्षमीकरण या मुद्द्यांवर त्यांनी ठोस पावले उचलली. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक कल्याणकारी योजना राबवण्यात आल्या. गावातील महिलांना बचतगटांद्वारे स्वावलंबी बनवणे, तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

**जिल्हा परिषद सदस्या म्हणून व्यापक दृष्टी**

ग्रामपातळीवरील कार्यातून मिळालेल्या अनुभवाच्या जोरावर त्यांनी जिल्हा परिषद सदस्या म्हणूनही उल्लेखनीय काम केले. शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला. शाळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी, आरोग्य शिबिरे आयोजित करण्यासाठी आणि महिला-बालकल्याण योजनांचा विस्तार करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या कार्यशैलीत पारदर्शकता, लोकांशी संवाद आणि तळागाळातील समस्यांची जाण यामुळे त्या लोकांमध्ये विश्वासार्ह नेत्या म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या.

**टूर्स अँड ट्रॅव्हल्स क्षेत्रातील यशस्वी प्रवास**

राजकारण आणि समाजकारणातील यशस्वी वाटचालीनंतर त्यांनी उद्योजकतेकडे पाऊल टाकले. टूर्स अँड ट्रॅव्हल्स या क्षेत्रात प्रवेश करत त्यांनी स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय उभा केला.

आज त्यांच्या माध्यमातून देशभर तसेच जगभरातील विविध पर्यटनस्थळांना लोक प्रवास करत आहेत. धार्मिक स्थळे, ऐतिहासिक पर्यटन, निसर्गरम्य ठिकाणे आणि आंतरराष्ट्रीय सहलींचे सुयोग्य नियोजन करून त्यांनी अनेक कुटुंबांना आनंददायी प्रवासाचा अनुभव दिला आहे. प्रवास ही केवळ फिरण्याची गोष्ट नसून तो संस्कृती, परंपरा आणि अनुभवांचा सेतू आहे, ही जाणीव त्यांनी लोकांपर्यंत पोहोचवली. विशेष म्हणजे महिलांसाठी सुरक्षित आणि नियोजित






सहली आयोजित करून त्यांनी महिला प्रवाशांमध्ये विश्वास निर्माण केला.

**स्वावलंबनाचा आदर्श**

निर्मला गुंजाळ यांचा प्रवास म्हणजे एका सामान्य ग्रामीण स्त्रीपासून प्रभावी लोकप्रतिनिधी आणि यशस्वी उद्योजिका होण्यापर्यंतची प्रेरणादायी कहाणी आहे. त्यांनी सिद्ध केले की जिद्द, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेची भावना असेल तर कोणतेही क्षेत्र दूर नाही. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना सार्वजनिक जीवनात आणि व्यवसाय क्षेत्रात पुढे येण्याची प्रेरणा मिळाली आहे.

**महिला दिनानिमित्त अभिवादन**

महिला दिनाच्या निमित्ताने निर्मला गुंजाळ यांच्या कार्याला सलाम! त्यांचे नेतृत्व, समाजकारणातील योगदान आणि उद्योजकतेतील यश हे स्त्रीशक्तीचे उत्तम उदाहरण आहे. त्यांचा प्रवास अनेक महिलांसाठी आत्मविश्वास, स्वाभिमान आणि स्वावलंबनाचा दीपस्तंभ ठरो, हीच महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.



# 'ती' स्वतःच एक सुवर्णलेणं: कर्तृत्व, झळाळी आणि स्वावलंबन - वैशाली महेश मयूर



भारतीय संस्कृतीत सोन्याला केवळ एक धातू म्हणून नाही, तर 'मंगल्याचे प्रतीक' मानले जाते. पिढ्यानपिढ्या स्त्री आणि सोने यांचे एक अतूट नाते राहिले आहे. पण आज २१ व्या शतकात हे नाते केवळ दागिने परिधान करण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. आजची स्त्री स्वतः सोन्यासारखी तावून सुलाखून निघाली आहे आणि आपल्या कर्तृत्वाने समाजाला नवी झळाळी देत आहे. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने, स्त्रियांच्या या देदीप्यमान प्रवासाचा घेतलेला हा आढावा.

**दागिन्यांच्या पलीकडची 'ती'**

पूर्वी स्त्रीला सोन्याचे दागिने हे केवळ सौंदर्यासाठी किंवा आपत्कालीन परिस्थितीतील 'स्त्रीधन' म्हणून दिले जात. पण आज परिस्थिती बदलली आहे. आजची स्त्री दागिने घडवणारी कलाकार आहे, ती सोन्याचा व्यापार करणारी उद्योजिका आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ती स्वतःच्या हिंमतीवर सोने खरेदी करणारी 'आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र' व्यक्ती आहे. दागिन्यांची चमक ही तिच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वासापुढे आता फिकी वाटू लागली आहे.

**उद्योजिका म्हणून माझा प्रवास आणि अनुभव**

ज्वेलरी व्यवसायात पाऊल ठेवताना मला जाणवले की, हा व्यवसाय केवळ नफा-तोट्याचा नाही, तर तो विश्वासाचा आहे. एक महिला म्हणून जेव्हा मी ग्राहकांशी संवाद साधते, तेव्हा त्यांच्या डोळ्यांतील कौतुक आणि विश्वास मला अधिक बळ देतो. दागिन्यांचे डिझाइन निवडण्यापासून ते शुद्धतेची खात्री देण्यापर्यंत, स्त्रियांची सूक्ष्म नजर (Attention to detail) या व्यवसायात खूप महत्त्वाची ठरते. चूल आणि मूल सांभाळून व्यवसायाचे 'बॅलन्स शीट' सांभाळणे हे आव्हानात्मक नक्कीच आहे, पण अशक्य मुळीच नाही.

**स्त्रीशक्ती: संयम आणि कष्टाचे प्रतीक**

सोने जसे अग्नीत तापल्याशिवाय शुद्ध होत नाही आणि त्याला आकार मिळत नाही, तसेच स्त्रियांचे आयुष्य असते. कौटुंबिक जबाबदाऱ्या, समाजाचे निकष आणि स्वतःची स्वप्ने या सर्वांच्या कसरतीत स्त्री तावून सुलाखून निघते आणि शेवटी एका लखलखत्या अलंकारासारखी झळाळून उठते. आज प्रत्येक क्षेत्रात- मग ते राजकारण असो, संरक्षण असो वा व्यापार- महिलांनी आपली नाममुद्रा उमटवली आहे.

**आर्थिक साक्षरता: काळाची गरज**

या महिला दिनी मला सर्व भगिनींना एक आवर्जून सांगावेसे वाटते, ते म्हणजे 'आर्थिक साक्षर' व्हा. स्वतःचे उत्पन्न मिळवणे आणि त्याची योग्य गुंतवणूक करणे ही काळाची गरज आहे. गुंतवणुकीसाठी आजही सोन्याला पहिली पसंती दिली जाते, कारण ते संकटाच्या काळात आधार देते. पण त्याही पलीकडे, तुमच्या कष्टाचे चीज व्हावे यासाठी स्वतःच्या पायावर उभे राहणे हाच खरा 'स्त्रीत्वाचा गौरव' आहे. महिला दिन म्हणजे केवळ एक दिवसाचा सोहळा नाही. तो आहे प्रत्येक स्त्रीच्या संघर्षाचा सन्मान. चला, या निमित्ताने आपण निश्चय करूया की, आपण केवळ सोन्याचे दागिने परिधान करून न थांबता, आपल्या गुणांनी आणि कर्तृत्वाने समाजासाठी एक 'सुवर्णलेणं' ठरूया. स्वतःमधील सुप्त गुणांना ओळखा, त्यांना पैलू पाडा आणि जगासमोर आपली एक वेगळी ओळख निर्माण करा.

**दागिन्यांनी सजते ती केवळ काया,**

कर्तृत्वाने उजळते ती खरी माया! स्वप्नांना क्षितीजाकडे नेण्याची ताकद असणारी

आपल्या ओम् मयुर ज्वेलर्स मधे येणार्या ग्राहकांपैकी ९०% सहभाग महिलांचा असतो. तसेच येथे कार्यरत असणार्या कर्मचार्यांपैकी ९९% महिला कर्मचारी आहेत. ज्या पूर्ण घर संभाळून कुटूंबाची पूर्ण जबाबदारी संभाळत ओम मयूर ज्वेलर्स मध्ये काम करण्याची जबाबदारी व्यवस्थित पार पाडत आहे. संगमनेर या ठिकाणी सराफी व्यवसायामध्ये काम करण्यासाठी महिला कर्मचारी वर्ग प्रथमतः ओम मयूर ज्वेलर्स मध्येच कार्यरत होत्या व त्यांना सांभाळणार्या सुद्धा पहिल्या महिला आपल्या ओम मयूर ज्वेलर्सच्या सौ. वैशाली महेश मयूर'' या आहेत. या ठिकाणी कार्यरत असणार्या महिला फक्त संगमनेर शहरातील होत्या. परंतू आता खेडेगाववरून जसे जवळे कडलग, रायतेवाडी, वेल्हाळे, घुलेवाडी, अशा ठिकाणांवरून सुद्धा महिला आज येथे येतात.



**सौ. वैशाली महेश मयूर**
संचालिका,
ओम मयूर ज्वेलर्स,
संगमनेर

## मिताली ब्रायडल वर्ल्ड - संगमनेरमधील विश्वासार्ह सौंदर्य केंद्र

महिला दिनाच्या निमित्ताने संगमनेरमधील महिलांमध्ये विशेष विश्वास मिळवलेले मिताली ब्रायडल वर्ल्ड हे सौंदर्य केंद्र विशेष उल्लेखास पात्र ठरते. आजच्या काळात सौंदर्य आणि आत्मविश्वास यांचा परस्परांशी जवळचा संबंध आहे, आणि योग्य सौंदर्यसेवा महिलांच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक उठाव देते. मिताली ब्रायडल वर्ल्ड हे संगमनेरमधील प्रतिष्ठित सौंदर्य केंद्र असून विशेषतः वधू सजावट, त्वचेची निगा, केसांची सजावट आणि विविध सौंदर्य उपचारांसाठी ओळखले जाते. विवाह, सण, समारंभ, वाढदिवस किंवा विशेष कार्यक्रमांसाठी येथे महिलांना त्यांच्या गरजेनुसार सेवा दिली जाते.

येथील अनुभवी कार्यसंघ प्रत्येक ग्राहकाच्या चेहऱ्याची रचना, त्वचेचा प्रकार आणि प्रसंग लक्षात घेऊन योग्य सजावट करतो. वधू मेकअपसह केसांची आकर्षक मांडणी, त्वचेवरील उपचार, हात-पायांची निगा आणि विशेष प्रसंगांसाठी सजावट अशा विविध सेवा येथे उपलब्ध आहेत. हे केंद्र संगमनेरच्या नाशिक रोड परिसरात सोयीस्कर ठिकाणी असून सकाळी साडेनऊ ते संध्याकाळी साडेसहा या वेळेत सेवा उपलब्ध असते. स्वच्छता, दर्जेदार सेवा आणि ग्राहकांशी जिव्हाळ्याने वागणे ही या केंद्राची विशेष ओळख आहे.

महिला दिन हा प्रत्येक महिलेच्या आत्मसन्मानाचा दिवस आहे. सौंदर्य म्हणजे केवळ बाह्य रूप नव्हे, तर आत्मविश्वास आणि आनंदाचे प्रतिबिंब आहे. मिताली ब्रायडल वर्ल्ड महिलांना स्वतःसाठी वेळ देण्याची आणि आत्मविश्वासाने उजळून दिसण्याची संधी देते.




# जमदाडे गुरुजी म्हणजे समाज परिवर्तनाचे शिल्पकार...








शिक्षक म्हणजे केवळ वर्गात जाऊन शिकवणारी व्यक्ती नव्हे तर विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारा एक शिल्पकार होय. एका प्रामाणिक शिक्षकाची भूमिका ज्ञानापुरती मर्यादित नसते ती समाज निर्मितीशी जोडलेली असते. जेव्हा एखादा शिक्षक निष्ठेने आपले कार्य करतो तेव्हा तो समाजाची खरी संपत्ती ठरतो. जमदाडे सरांची १८ वर्षापासूनची ज्ञानदानाबरोबर संस्कार घडविण्याची प्रक्रिया अजुनही अखंड सुरु आहे. शिक्षक म्हणजे प्रगत राष्ट्र घडविणारा देशाचा खरा शिल्पकार. जो केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करून आदर्श नागरिक घडवतो.

स्वार्थविरहित सेवा, विषयाच सखोल ज्ञान, संयम आणि विद्यार्थ्यांच्या प्रती सहानुभूती हे त्यांचे प्रमुख गुण असतात. समाज घडविण्याची जबाबदारी पेलणारा असा शिक्षक अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा दीपस्तंभ ठरतो आणि हा दीपस्तंभ म्हणजे आमचे आदरणीय जमदाडे गुरुजी. सरांच्या बाबतीत सांगायचे झाले तर सरांना मी इयत्ता ७ वी मध्ये शिकत असल्यापासून ओळखतो. सर मला घरी येऊन शिकवत असत. घरी येऊन मला शिकवण्यामागील कारण असे होते की मी अभ्यासात खूप कच्चा होतो. त्यामुळे घरच्यांनी सरांना आमच्या मुलाला दहावीपर्यंत चांगले तयार करावे असा आग्रह धरला.

सरांचा स्वभाव खूप कडक होता. माराण्या अगोदर सरांच्या आवाजानेच विद्यार्थ्यांना भीती वाटायची. सरांची शाळा सुटली की सर संध्याकाळी किंवा कधी सकाळी सायकलवर हनुमान नगर येथे मला शिकवण्यासाठी येत असे. सध्याच्या काळात सायकलवर घरी येऊन शिकवणारा शिक्षक मी पहिल्यांदाच पाहिला. माझ्याबरोबरच इतर मुलांचाही क्लास सर घरी जाऊन घेत असे. सरांच्या सानिध्यात चार वर्ष कसे गेले कळलेच नाही. आणि जेव्हा बोर्डाचा निकाल आला तेव्हा घरच्यांना आणि बाकी सगळ्यांना आश्चर्याचा धक्का बसला. कारण की, सातवीमध्ये दोन दोन विषयात नापास होणारा गौरव हा दहावी बोर्डात ८० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला होता परंतु सरांना माझ्यावर विश्वास होता की हा चांगले गुण मिळवणार. कारण त्यांनी तेवढे कष्ट मला घडवण्यात घेतले होते आणि मी सुद्धा प्रामाणिकपणे त्यानुसार माझा अभ्यास करत होतो.

तुटपुंज्या पगारावर एका शाळेवर सर नोकरी करायचे. त्यावेळी आम्हाला ते माहीत नव्हते. शाळेवर शिकवत असणारा शिक्षकांना खूप पगार असतो एवढेच आम्हाला माहीत होते. दहावी सुटल्यानंतर जेव्हा सहज सरांशी काही दिवसांनी भेट झाल्यावर कळले की सर एका शाळेवर ७०० रुपये महिन्यांनी काम करतात. ऐकून थोडं वाईट वाटले की शाळेत सर मुलांना दिवसा तर शिकवायचे परंतु दहावीच्या मुलांची नाईट स्टडी सुद्धा घ्यायचे. सातशे रुपये पगार असणारी व्यक्ती जर दिवसरात्र मुलांना शिकवत असेल तर माझे भाग्यच की मला सरांचा सहवास लाभला.

स्वतःचा पगार किंवा सुट्ट्यांचा विचार न करता तसेच स्वतःच्या कुटुंबाची कोणतीच परवा न करता विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी स्वतःचा वेळ देणारा शिक्षक म्हणजे जमदाडे सर. सरांची मुलांसाठी असलेली निस्वार्थ सेवा आणि समर्पण उल्लेखनीय आहे. सरांचे वर्तन हे त्यांच्या कृतीतून दिसायचे. त्यांचा भारदस्त आवाज आणि बोलताना होणारे वेगवेगळे शब्दप्रयोग त्यामुळे सर कडक स्वभावाचे आहेत हे सगळ्यांना माहीत होते. सरांची शिस्त आणि कठोर परिश्रम यामुळे सरांनी माझ्यासारख्या हजारो मुलांमध्ये नैतिक धैर्य व नैतिक मूल्य रुजवले. त्यामुळे आम्ही भविष्यात संकटांना सामोरे जाण्यास सक्षम झालो. ज्याप्रमाणे माझ्यातील अभ्यासाची क्षमता ओळखून माझ्यात सरांनी बदल घडवला तसाच बदल सरांकडे शिकण्यासाठी येणाऱ्या मुलांमध्ये देखील घडवला.

सरांचे एक वाक्य नेहमी आठवते ते म्हणजे एक मार्क कमी मिळाला तरी चालेल पण चुकीच्या मार्गाने जाऊ नका, वाईट संगत धरू नका आणि आई-वडिलांच्या नावाची बदनामी होईल असे वर्तन करू नका.

लाली पावडर लावणाऱ्या मुली आणि बिनकामाचे बोंबलत हिंडणारे मुलं सरांची शिस्त आणि कडक स्वभाव यामुळे क्लासला कधी आलेच नाही. परंतु सर बाहेरून जेवढे कडक तेवढेच आतून प्रेमळ आहेत. कारण अभ्यास करणाऱ्या मुलांना ते नेहमी प्रोत्साहन देत असतात तसेच शिकण्याची इच्छा असणाऱ्या मुलांच्या पाठीशी सदैव उभे असतात. हा माझा अनुभव आहे. अभ्यासाबरोबरच विविध सण उत्सव साजरे करून सरांनी मुलांमध्ये मोठमोठ्या थोर महापुरुषांचे विचार रुजवले.

सर नेहमी म्हणतात की एखादी व्यक्ती जर चांगले मार्गदर्शन करत असेल तर तुम्ही त्यांचे विचार आचरणात आणले पाहिजेत. समोरील व्यक्ती लहान असो वा मोठी त्यांचे चांगले विचार असतील, त्यांचे चांगले आचरण असेल तर आपण ते आत्मसात केले पाहिजे. मी जरी शिक्षक असलो तरीसुद्धा माझ्या एखाद्या विद्यार्थ्याचे चांगले गुण मी आत्मसात करतो. कारण शिक्षक सुद्धा निरंतर विद्यार्थी असतोच असे त्यांचे मत होते. सर जरी जुन्या विचारसरणीचे असले तरी बदलत्या काळानुसार त्यांनी स्वतःला अपडेट केले होते. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून त्यानुसार मुलांना मार्गदर्शन केले आहे. आणि हाच त्यांच्या कार्याचे भाग आहे. प्रामाणिक शिक्षक हा समाजाचा आधारस्तंभ आहे. त्यांच्या निस्वार्थ सेवेमुळेच सुजाण पिढी घडत असते. अशा शिक्षकांमुळेच राष्ट्राच्या भविष्याची इमारत मजबूत होते म्हणून समाजातील प्रत्येकाने असे शिक्षकांचा आदर करणे आवश्यक आहे.

**शेवटी सरांबद्दल एक कविता लिहावीशी वाटते......**

**पुस्तकी ज्ञानपलीकडे**
**जीवनाचे पाठ आम्हास शिकवले.**
**संस्काराचे मोती देऊन**
**स्वप्न आमचे फुलविले**
**आज तुमच्यामुळेच सर**
**आभाळ ठेंगणे वाटते**
**सरांच्या रूपाने आम्हास**
**दिशा दाखवणारी एक माऊली भेटते**



**गौरव पोपट गोरे**
BE Mechanical,
MBA.Operation